सोलापूर
www.dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, ०६ मे २०२४ | वर्ष दुसरे | अंक ४५ | पाने : ८ | किंमत रु. ६/-




## बीड येथे कारमध्ये सापडले तब्बल एक कोटी

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या काळात आचारसंहिता लागू झाल्याने निवडणूक आयोग राजकीय नेते व राजकीय पक्षांच्या प्रत्येक हालचालीवर व वक्तव्यावर बारीक नजर ठेवून आहे. आचारसंहितेचा भंग होत नसल्याची दखल आयोगाकडून घेतली जात आहे. यासाठी ठिकठिकाणी निवडणूक आयोगाचे पथक, पोलीस अन् आयकर विभागाची नजर कायम आहे. मात्र, तरीही द र निवडणुकीप्रमाणे यावेळेसही मोठ्या प्रमाणात अवैध रक्कम आढळून आली आहे. काही दिवसांपूर्वी दादर परिसरात एका कारमध्ये १ लाख ८० हजारांची रोकड आढळली होती. यानंतर आता बीडमध्ये इनोव्हामध्ये तब्बल एक कोटींची रोकड सापडली आहे. यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

बीडमधील गेवराई तालुक्यातील खामगावमध्ये असलेल्या जिल्ह्याच्या बॉर्डरवर चेक पोस्टवर इनोव्हामध्ये काल रात्री तब्बल एक कोटी कॅश सापडली. ही दहा लाख रुपयापेक्षा अधिकची रक्कम असल्याने ही रक्कम कोषागार कार्यालयाकडे सुपूर्त केली जाणार आहे. आयकर विभागाचे अधिकारी छत्रपती संभाजीनगर येथील बँकेच्या शाखेतून ही रक्कम काढली गेली होती की नाही याची माहिती घेणार आहेत. संभाजीनगरमधील द्वारकादास मंत्री बँकेच्या शाखेतून ही रक्कम बीड येथील बँकेच्या मुख्य शाखेत आणली जात असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. यावेळी या पैशासोबत संभाजीनगर येथून पैसे बाळगण्याचे परवानगी पत्र होते असे पोलिसांचे म्हणणे आहे.

# मोदींच्या नेतृत्वाखाली शिवशाही- रामराज्य

### संविधानावरुन टीका करणाऱ्या विरोधकांना नितीन गडकरींचं प्रत्युत्तर

सोलापूर : सोलापूरमध्ये महायुतीची सभा होतेय. या सभेला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी संबोधित केलं. या सभेत बोलताना नितीन गडकरी यांनी इंडिया आघाडीच्या टीकेला उत्तर दिलं. भाजप पुन्हा सत्तेत आलं तर ते देशाचं संविधान बदलतील, अशी टीका विरोधक करत असतात. त्याला गडकरींनी प्रत्युत्तर दिलं.मी फक्त बोलणारा लीडर नाही. मी सांगतो ते लिहून घ्या. इथे पत्रकार बसलेत. इथे बसलेल्या कोणीही माझी ब्रेकिंग न्यूज लावून दाखवावी कारण मी जे बोलतो ते करून दाखवतो. देशात कोणीही पक्ष, नेता आणि सरकार कोणीही देशाचे संविधान कोणीही बदलू शकत नाही. मात्र देशाच्या घटनेत दुरुस्ती करता येते. काँग्रेसने ८० वेळा घटना तोडण्याचे पाप केलं, असं म्हणत नितीन गडकरी यांनी विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं.

**स्मार्ट व्हिलेज तयार करायचंय**

मळणी यंत्र ज्याप्रमाणे गावागावात आले त्याप्रमाणे आता गावात ड्रोन येतील. शेतकऱ्यांचा पाणी डिपॉझिट केलं पाहिजे. धावणाऱ्या पाण्याला चालायला लावा. चालणाऱ्याला थांबायला लावा. थांबलेल्या पाण्याला जमिनीला प्यायला लावा. ग्रामीण भागातील ३० टक्के लोकसंख्या कमी झाली. साहेबांची मुलगी काय म्हणते शेतकरी नवरा नको म्हणते. स्मार्ट शहर नव्हे तर स्मार्ट व्हिलेज तयार करायचं आहे, असंही गडकरी म्हणाले.

आपल्या गाड्या चालणार आहेत. देशात इलेक्ट्रिकची गाडी, कार, स्कूटर मी आणली. शेतकऱ्याला इंधन दाता बनवण्याचं काम आम्ही केलं. आम्ही इथेनॉल आणले नसते तर पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या उसाच्या पैसे वर्षभर मिळाले नसते, असं नितीन गडकरी म्हणाले.

### छत्रपती शिवाजी महाराज आमचे आदर्श- गडकरी



जात, पंथ, भाषा या आधारावर कोणतेही डिस्क्रिमिनेशन आम्हाला मान्य नाही. आमचा आदर्श छत्रपती शिवाजी महाराज आहेत. आमच्या आई-वडिलांपेक्षाही छत्रपती शिवरायांवर आमचा जास्त विश्वास आहे. शिवरायांनी अनेक लढाया जिंकले मात्र त्यांनी कधीही कोणती मशिद नाही पाडली. शिवाजी महाराज जेव्हा जिंकले त्यावेळी शत्रू पक्षातील आया बहिणी त्यांच्या ताब्यात आल्या. मात्र त्यांनी ओटी भरून त्यांना माघारी पाठवलं. छत्रपती शिवाजी महाराज हे सेक्युलर होते. देशात मोदींच्या नेतृत्वाखाली शिवशाही आणि रामराज्य आणण्याचा प्रयत्न आम्ही करतो, असंही नितीन गडकरी म्हणाले.

# राज्यात केवळ २८ टक्केच पाणीसाठा शिल्लक

### अनेक धरणांमध्ये शून्य टक्के पाणीसाठा



मुंबई : सध्या राज्यात उकाडा प्रचंड वाढला असून पाणी आटत (थरींशी डर्हीीरसश) चालले आहे. राज्यांतील अनेक गावांत पाणीटंचाईची फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी पाण्यासाठी डोक्यावर हंडे, घागरी दिसत आहेत, तर काही ठिकाणी पाण्याचे टँकर सुरु झाले आहेत. राज्यातील पाणीसाठी हा केवळ २८ टक्के इतका खाली आला आहे. तर मराठवाड्यातील (ारीींहुरवर) पाणीसाठा १२ टक्क्यांवर आला आहे. अनेक धरणांमध्ये शून्य टक्के पाणीसाठा आहे.

राज्यातील पाण्याची समस्या गंभीर होत आहे. वाढत्या उष्णतेमुळे पाण्याची मागणी वाढत असताना धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने घट होत आहे. दरम्यान, मराठवाड्यात गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. सध्या जायकवाडीत फक्त ७.७४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षी याच काळात निम्म्याहून अधिक धरण भरलेलं होतं.

**या जिल्ह्यातील धरणांमध्ये शून्य टक्के पाणीसाठा**

बीड, धाराशीव आणि लातूरमध्ये अनेक छोट्या आणि मध्यम स्वरुपाच्या धरणांमध्ये शून्य टक्के पाणीसाठा आहे. पश्चिम महाराष्ट्रात देखील धरणसाठा २३ टक्क्यांवर आला आहे. मागील वर्षी याचवेळी जलसाठा ३० टक्के होता. दरम्यान, कोयना धरणात ३० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. कोयनेतून होणाऱ्या वीजनिर्मीतीत देखील घट होत असल्याचं पाहायला मिळत आहे. उत्तर महाराष्ट्रात देखील ३०.४३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. तर गंगापूर धरणात ४४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. तर दुसरीकडे भंडारदरा, निळवंडे आणि मुळा धरणातील पाणीसाठा २५ टक्क्यांच्या खाली आहे.

**विदर्भातील धरणांमध्ये बऱ्यापैकी पाणीसाठा**

दरम्यान, विदर्भासाठी दिलासादायक बातमी आहे. ती म्हणजे विदर्भातील धरणांमध्ये बऱ्यापैकी पाणीसाठा आहे. त्यामुळे नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली आहे. नागपूर विभागात जलसाठा ४० टक्क्यांवर तर अमरावती विभागातील धरणांमध्ये पाणीसाठा ४४ टक्क्यांवर आला आहे. तर कोकणातील पाणीसाठा ४२ टक्क्यांपर्यंत खाली उतरला आहे.

## हिंदू नेत्यांच्या हत्येचा कट, गुजरातमधून मौलवीस अटक

सुरत : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरत गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. देशातील हिंदू नेत्यांना जीवे मारण्याची धमकी देण्याचा कट रचल्याचा आरोप असलेल्या मोहम्मद सोहेल उर्फ मौलवी अबुबकर तेमोल (वय २७) याला सुरत गुन्हे शाखेने अटक केली आहे. सुरतचे पोलिस आयुक्त अनुपम सिंह गेहलोत यांनी सांगितले की, मौलानाच्या मोबाईल फोनवरून अनेक महत्त्वाची माहिती पोलिसांना मिळाली आहे. अटक करण्यात आलेला मौलवी पाकिस्तानच्या संपर्कात होता. त्या ठिकाणावरुन शस्त्रास्त्रे मिळवण्याचा त्याचा प्रयत्न होता. आरोपी मौलाना देशातील नुपूर शर्मा, टी राजासह या हिंदू नेत्यांवर हल्ला करून त्यांची हत्या करण्याचा कट रचला होता.

# लग्न समारंभास जाणारा पिकअप पलटी; २९ जखमी



**तभा वृत्तसेवा**

**नायगाव, ५ मे –** नांदेड-देगलूर राज्य महामार्गावर किनाळा ता.बिलोलली बसस्थानकावर समोरून येणा-या दुचाकीस्वारास वाचवण्याच्या प्रयत्नात टेम्पो चालकाने अचानक ब्रेक मारल्याने पिकअप टेम्पो पलटी होऊन टेम्पोतील २९ जन जखमी झाल्याची घटना ५ मे रोजी सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास घडली.

वैजापूर (पार्डी) ता. मुदखेड येथील नागरिक शहापूर ता.देगलूर येथील लग्न समारंभास एम.एच.२६, ए.डी.६५७२ क्रमांकाच्या पिकअप टेम्पोतून जात असताना नांदेड-देगलूर राज्य महामार्गावर किनाळा ता. बिलोली बसस्थानकावर समोरून येना-या दुचाकीस्वारास वाचवण्याच्या प्रयत्नात पिकअप चालकाने अचानक ब्रेक मारल्याने पलटी होऊन २९ जन जखमी झाले आहेत.

जखमीत दशरथ गणपत राहेरकर,करणसींग राहेरकर,ओंकार नागलपल्ले,संदीप शंकर हबिलवार,राहूल राहेरकर, गंगाधर विठ्ठल, पिंकू माधव,ज्ञानेश्वर नामदेव ,पांडुरंग गुनाजी , आनंदा सुभाष, साई शंकर, सुनिल पालेवाड,अक्षय सकिरगे,यश सोनाजी,ओंकार नागमपल्ले,ऋषिकेश राहेरकर, बापुराव गोपाल सावळीकर,धुरपतबाई गणपती राहेरकर, सुशांत प्रभु नागलपल्ले,शकुंतला गंगाधर, बालाजी नागलपल्ले,संदीप शंकर, शंकर यलमवाडे,गनेश माधव शिंदे ,आदर्श शिवाजी आरपे अदींचा समावेश असून जखमींना ग्रामीण रुग्णालय नायगाव येथे उपचार करून गंभीर दुखापत असलेल्यांना शासकीय रूग्णालय नांदेड येथे हलविण्यात आले आहे.

## अयोध्येला श्रीरामांचे दर्शन, पंतप्रधानांचा २ किमीचा रोड शो



नवी दिल्ली: लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान ७ मेला होत आहे. याआधी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी अयोध्येत जातील. अयोध्येत ते आधी श्रीरामांचे दर्शन घेतील. त्यानंतर रोड शो करतील. याआधी त्यांनी महर्षी वाल्मिकी आंतरराष्ट्रीय एअरपोर्टच्या लोकार्पणादरम्यान अयोध्येत रोड शो केला होता. लोकसभा निवडणूक २०२४च्या दरम्यान पंतप्रधान पहिल्यांदा अयोध्येत जात आहेत.

पंतप्रधान मोदी सध्या लोकसभा निवडणुकीसाठी जोरदार प्रचारसभा घेत आहेत. ते दररोज देशाच्या विविध भागांमध्ये जाऊन रोड शो तसेच सभा घेत आहेत. यातच रविवारी ५ मेला ते अयोध्येला पोहोचत आहेत. खरंतर ते अयोध्येला निवडणुकीच्या प्रचाराला जात आहेत मात्र आपल्या कार्यक्रमाआधी ते राम मंदिरात भगवान रामांचे दर्शन घेतील.

भाजपचे उमेदवार लल्लू सिंह यांच्या समर्थनार्थ करणार रोड शो

अयोध्या पोहोचल्यावर पंतप्रधान मोदी राम मंदिरात पुजा-अर्चा करतील.

# प्रचाराच्या शेवटच्या दिवशी जय पवार अंतरवाली सराटीत जरांगेंच्या भेटीला

जालना : लोकसभा निवडणुकीसाठी अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणार्या बारामती लोकसभा मतदारसंघात आज प्रचाराचा शेवटचा दिवस आहे. राष्ट्रवादीतील फुटीमुळे देखील बारामतीकडे जनतेची विशेष नजर आहे. या ठिकाणी पवारांमध्येच अटीतटीचा सामना होणार असून त्यासाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे. दरम्यान, प्रचाराच्या शेवटच्या दिवशी अजित पवारांकडून एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. अजित पवार यांचे चिरंजीव जय पवार यांनी आज सकाळी अचानकपणे अंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. त्यामुळे राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या असून या गुपचूप भेटीमागील नेमकं कारण काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



मनोज जरांगे यांच्या भेटीला जाणार असल्याचा थांगपत्ता कोणालाही लागू न देता जय पवार आज सकाळी मुंबईतून हेलिकॉप्टरने थेट छत्रपती संभाजीनगरला पोहोचले. तेथून कारने ते अंतरवाली सराटी येथे पोहोचले. याठिकाणी जय पवार यांनी अर्धा तास वाट पाहिल्यानंतर मनोज जरांगे यांच्याशी त्यांची भेट झाली. यानंतर आगतस्वागतचा कार्यक्रम पार पडला. जय पवार यांनी ही केवळ सदिच्छा भेट असल्याचे सांगितले. मात्र, या दोघांमध्ये नेमकी काय चर्चा झाली, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी पुकारलेल्या आंदोलनामुळे ते माध्यमांवर बराच काळ चर्चेत होते. त्यांच्या उपोषणामुळे राज्य सरकारने अखेर त्यांच्या मागण्या मान्य करत मराठा आरक्षण देऊ केले. मात्र, त्यानंतर जरांगेंच्या मागण्या बदलत गेल्या. शिवाय या मागण्या मान्य करत नसल्याचा आरोप त्यांनी सरकारवर केला आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप केले. या प्रकारामुळे भाजप नेत्यांनी त्यांच्यावर प्रचंड संताप व्यक्त केला. तर सरकारनेही त्यानंतर जरांगेंना गांभीर्याने घेतले नाही. जरांगेंचं आंदोलन काही काळ थांबलं. तेव्हापासून राज्य सरकार आणि मनोज जरांगे पाटील यांच्यात कोणतीही चर्चा झालेली नाही. मात्र, आज अजित पवार यांचे चिरंजीव अचानक मनोज जरांगे यांच्या भेटीला पोहोचल्याने यामागे नेमके काय कारण असावे, याविषयी तर्कवितर्क लढवले जात आहेत.

## ब्रिटनमधील सर्वात वजनदार व्यक्तीचा वयाच्या ३३ व्या वर्षी मृत्यू!

लंडन : ब्रिटनमधील सर्वात वजनदार माणूस म्हणून ओळखला जाणारा जेसन हल्टन याचे काल ४ मे रोजी निधन झाले. शरीराच्या स्थूलपणामुळे वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी त्याला जगाचा निरोप घ्यावा लागला. शरीरातील अतिरिक्त चरबीमुळे त्याचे अवयव निकामी होत गेले. जेसनवर उपचार सुरु होते, पण त्याचे अवयव उपचारांना प्रतिसाद देत नसल्याने त्याला वाचवता आले नाही, असे डॉक्टरांनी सांगितले. आठवड्याभरानंतर जेसनचा ३४ वा वाढदिवस होता. पण त्याआधीच त्याची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. जेसनचे वजन ३१८ किलो होते. त्याला सरे काउंटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.




# ब्राझीलमध्ये पावसाचा हाहाकार! ५७ हून अधिक मृत्यू तर हजारो बेपत्ता

### शहरातून वाहणारी गुआइबा नदी ५.0४ मीटर किंवा १६.५ फूट इतकी प्रचंड पूर उंचीवर आहे, ती ४.७६ मीटरच्या धोक्याच्या पातळीपेक्षा जास्त

ब्राझिलिया : एकीकडे राज्यात उन्हाचा तडाखा बसत आहे, तर ब्राझीलमध्ये पावसाने धुमाकूळ घातला आहे. ब्राझीलमध्ये मुसळधार पावसामुळे पूर आणि भूस्खलनामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दक्षिणेकडील रिओ ग्रांदे डो सुल या राज्यात त्याचा सर्वाधिक कहर होत आहे. मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणचे रस्ते वाहून गेले आहेत. पुरामुळे हजारो लोकांना घरे सोडावी लागली आहेत.

ब्राझीलमध्ये या आठवड्यात झालेल्या पावसामुळे ५७ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. त्याचबरोबर हजारो लोक बेपत्ता आहेत. बचाव पथक बचाव कार्यात गुंतले आहे. नुकतेच आलेल्या आकडेवारीनुसार विनाशकारी पुरामुळे २८१ नगरपालिका प्रभावित झाल्या आहेत आणि किमान ७४ लोक जखमी झाले आहेत.

६७ हजारांहून अधिक लोकांचं नुकसान झालेल्या भागात स्थानिक सरकारने आपत्तीची स्थिती घोषित केली आहे आणि ४,५०० हून अधिक लोक तात्पुरत्या आश्रयस्थानांमध्ये आहेत. काही भागात छतांपर्यंत पाणी पोहोचले आहे. बचाव पथके लोकांचा आणि पाळीव प्राण्यांचा शोध घेण्यात व्यस्त आहेत. काल



सकाळी, जोरदार पावसामुळे गुआइबा सरोवरातील पाण्याची पातळी पाच मीटरने वाढली, ज्यामुळे राज्याची राजधानी पोर्टो अलेग्रेला धोका निर्माण झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**रिओ ग्रांदे डो सुलला पुराचा मोठा फटका**

रिओ ग्रांदे डो सुल राज्यात पाण्याची पातळी झपाट्याने वाढत आहे. याचा परिणाम नदीच्या बंधाऱ्यांवरही होत आहे. १.४ दशलक्ष लोकसंख्येचे आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर असलेल्या पोर्टो अलेग्रेला पुराचा विशेष फटका बसला. येथे, शहरातून वाहणारी गुआइबा नदी ५.०४ मीटर किंवा १६.५ फूट इतकी प्रचंड पूर उंचीवर आहे, ती ४.७६ मीटरच्या धोक्याच्या पातळीपेक्षा जास्त आहे. पुरामुळे घरापासून ते रस्त्यांपर्यंत सर्व काही पाण्याने भरलेले आहे. शहरातील रस्त्यांना तलावाचे स्वरूप आले आहे. रस्त्यांवर बोटी फिरत आहेत. बुडून घरे उद्ध्वस्त झाली आहेत. रस्त्यावर इकडे-तिकडे वाहनेही अडकली आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हयाचे तापमान ४२.६ अंशावर

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यात तापमानात दिवसेंदिवस वाढ होत असून शनिवारी (दि.०४) ४२.६ अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद करण्यात आली.

मागील अनेक दिवसांपासून तापमानात वाढ होत आहे. उन्हाळ्या तीव्र झळा जाणवत आहेत. वातावरणात प्रचंड उकाडा निर्माण झाला असून नागरीक कमालीचे हैराण झाले आहेत. जिल्ह्यात उन्हाच्या झळा दिवसेंदिवस अधिक तीव्र होत असून शनिवारी (दि.४) तापमानाचा पारा ४२.६ अंशावर पोहाचल्याने नागरिकांना उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागत आहे. विशेष बाब म्हणजे आज नोंदवलेले हे तापमान यंदाच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक तापमान आहे.

### श्री.रेणूकामाता मल्टीस्टेटच्या लोन मेळाव्यास प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी:** श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडीट सोसायटी अहमद नगर शाखा परभणी येथे शुक्रवार ३ मे रोजी आयोजित केलेल्या लोन मेळाव्यास चांगला प्रतिसाद मिळाला असून यापुढे सोमवार ते शनिवार अशी वर्षभर तात्काळ लोन सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे, अशी माहिती शाखाधिकारी संदीप वाघमारे यांनी दिली. श्री रेणुकामाता मल्टीस्टेट चे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत भालेराव यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रात आता सर्वत्र सोमवार ते शनिवार वर्षभर लोन सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध केली आहे. पर्सनल लोन ३० हजार, ५० हजार व १ लाख यासाठी ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. याचबरोबर कॅश क्रेडिट लोन, होम लोन, मॉर्गेज लोन व वाहन तारण लोन आदी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रासह देशात ९ राज्यात १३० शाखांच्या माध्यमातून श्री रेणुकामाता मल्टीस्टेटची यशस्वी घोडदौड सुरु आहे. नुकतीच श्री रेणुका मल्टीस्टेट ग्रुपने डीमार्ट सुविधा उपलब्ध केली असून त्याचाही ग्राहकांना फायदा होणार आहे.

दरम्यान, या कर्ज मेळाव्यास श्री रेणुकामाता मल्टीस्टेटचे वरिष्ठ व्यवस्थापक दीपक मेढे उपस्थित होते. कर्ज मेळाव्याच्या यशस्वीतेकरीता शाखेतील पासिंग ऑफिसर सौ. मयुरी लव्हेकर, गोविंद बुद्रुककर, कावेरी काळे, तेजस वाघमारे, मंदार फुटाणे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून एक पाणी पाळी सोडा- विलास बाबर

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्ह्यात तापमानात दिवसेंदिवस वाढ होत असून पाणी पातळीत घट होतांना दिसत आहे. त्यामुळे जनावरांना पिण्यासाठी व चाऱ्यासाठी जायकवाडी धरणातून डाव्या कालव्यात एक पाणी पाळी सोडावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे (ग्रामीण) सरचिटणीस विलास बाबर यांनी केली आहे.

जायकवाडी विभाग क्रमांक २ च्या कार्यकारी अभियंत्यांना शुक्रवारी (दि.०२) बाबर यांनी एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, जिल्ह्यात सध्या तीव्र पाणी टंचाई असून जिल्ह्यास भिषण दुष्काळाला समोर जावे लागत आहे, हे निदर्शनास आणून दिले. जायकवाडीच्या डाव्या कालव्याला आलेल्या पाण्यामुळे शेतकऱ्यांनी जनावरांसाठी बारा पिके घेतली असून ती चारा पिके वाढीच्या उपस्थित आहेत. परंतु, ती जगली पाहिजेत यासाठी पाण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे १५ मे पर्यंत जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून एक पाणी पाळी सोडावी जेणेकरुन चाऱ्यासह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचीही सोय उपलब्ध होईल, असेही बाबर यांनी या निवेदनाद्वारे म्हटले.

### श्रीस्वामी समर्थ केंद्रात अखंड नाम सोहळा

**जिंतूर,/प्रतिनिधी:** श्रीस्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त जिंतूर सेवा केंद्र या ठिकाणी अखंड नाम योग्य सप्ताह व सामुदायिक गुरुचरित्र पारायण सोहळा सुरू आहे. श्रीस्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त २९ एप्रिलपासून जिंतूर स्वामी समर्थ केंद्रात स्थापित देवता हवन, नित्य स्वाहाकार, श्रीगणेश याग, श्री मनोबोध याग, नित्य स्वाहाकार स्वामी याग, नित्य स्वाहाकार चंडीयाग, नित्य स्वाहाकार, श्री गीताई याग, नित्य स्वाहकर, श्री रुद्र याग, मल्हारी याग, नित्य स्वाहाकार बली पुशहुती आदी धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. यात मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील भाविकांची उपस्थिती होती. नामजप सोहळ्याची सांगता सोमवारी धार्मिक कार्यक्रमांनी होणार असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. सेवेकरी केंद्रप्रमुख विश्वनाथ वाघ , अमित घुगे, मुळ शास्त्री मुकेश मुथा संभाजीनगर,आबासाहेब देशमुख, आहेर भोकर ,लखुजी जाधव ,माधव मोरे ,वसंतराव देशमुख ,उद्धवराव देशमुख ,मंचकराव देशमुख , सचिन रायपत्रीवार, कोल्हाळ , पिन्टू अप्पा, रवी घुगे ,चौहान ताई.



# न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्या प्रकरणात सरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल

**जिंतूर/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील मारवाडी येथील विलास गणेशराव देशमुख यांनी जिंतूर न्यायालयात अनंता बन्सीधर देशमुख, पवन प्रसादराव देशमुख आणि मदन प्रभाकर देशमुख यांचे विरुद्ध त्यांनी संगणमत करून ग्रामपंचायतचे पाईपलाईन फोडण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून त्यांचा भाऊ कल्याण गणेशराव देशमुख यांचा खून करून पुरावा नष्ट केल्याबद्दल फौजदारी व्यवहार संहिता कलम १५६ (३) नुसार ॲड. मनोज सारडा यांच्यामार्फत प्रकरण दाखल केले .सदर प्रकरणात माननीय न्यायाधीश श्रीमती वेदवती आद्य देशपांडे यांनी पोलीस स्टेशन बोरी यांना प्रकरणात भादवी ३०२ व इतर कलमा अन्वये संबंधितावर गुन्हा दाखल करून अहवाल सादर करावा. असे आदेश दिले आहेत. घटनेची थोडक्यात माहिती अशी की, दिनांक १८ नोव्हेंबर २०२३ रोजी मयत कल्याण देशमुख यांनी मारवाडी येथील ग्रामपंचायतची पाईपलाईन फोडली या कारणावरून सरपंच अनंता देशमुख व त्यांचे सहकारी पवन आणि मदन यांचे सोबत त्यांचा वाद झाला. त्यावेळी सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी कल्याण तुझी पाहून घेतो असे धमकावले. त्यानंतर दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी नऊ वाजता फिर्यादी त्याच्या शेतात जात असताना आरोपी त्यांना गावातील मंदिराजवळ भेटले आणि कल्याणला समजावून सांगा की ? आमच्या नादाला लागू नको. नाहीतर परिणाम वाईट होतील असे म्हणून कल्याणच्या घराच्या दिशेने गेले. फिर्यादी दुपारी शेतातून परत आला

#### मारवाडी येथील खून प्रकरण!

असता त्यास त्याच्या आईने सांगितले की कल्याणच्या शेजारी राहणाऱ्या महिलेने आरोपी यांनी घरात मारहाण केली आहे. त्यावरून फिर्यादी यांनी आरोपी यांना त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधून तुम्ही कल्याणला का मारले असे विचारणा केली. असता त्यांनी केवळ आम्ही त्याला थापड बुक्क्या मारल्या असे सांगितले त्यामुळे फिर्यादी व त्याची आई कल्याणच्या घराकडे गेले . त्या ठिकाणी तो जाण्यापूर्वीच बोरी पोलीस स्टेशनचे फौजदार खिल्लारे साहेब व कर्मचारी आलेले होते. त्या ठिकाणी आल्यानंतर फिर्यादी यास त्याच्या भावाची बॉडी घराच्या छताला स्कार्फ बांधून लटकवलेली दिसली तसेच जमिनीवर रक्त सांडेल दिसले. त्या ठिकाणी पोलिसांनी घटनास्थळाचे फोटो घेतले आणि प्रेत खाली घेतले. ज्या ठिकाणी घटना घडली त्या ठिकाणी खोलीमध्ये कोणतेही स्टूल अथवा उंच चढण्याइतपत वस्तू नव्हती. मयताची पत्नी माहेरी मौजे पुंगळा ता जिंतूर येथे गेलेली असल्यामुळे फिर्यादीने सदरची घटना वनिता देशमुख यांना कळवली. त्यानंतर प्रेत सरकार दवाखाना बोरी येथे आणले गेले होते. बोरी येथे दवाखान्यात प्रेत आल्यानंतर आरोपी यांनी संगणमत करून फिर्यादीचा भाऊ कल्याण याने मराठा आरक्षणाच्या निर्णयाबाबत शासन उशीर करत असल्यामुळे जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या लढ्याला पाठिंबा म्हणून आत्महत्या केल्याची वावडी उठवली. त्या रात्री फिर्यादी पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यात गेला असता पोलिसांनी त्यास पोलीस स्टेशनमध्ये बसून ठेवले. आणि त्यांची फिर्याद दिनांक २० नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी लिहून घेतली सदरची फिर्यादी देत असताना आरोपी अनंता देशमुख यांनी त्याच्या मोबाईलवरून फिर्यादीला त्याच्या मोबाईलवर संपर्क साधून गुन्हा दाखल करू नका. आपण मिटवून घेऊ अशी विनंती केली .सदरचे मोबाईल रेकॉर्डिंग सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर व पोलिसांना दिली. परंतु पोलिसांनी त्याबाबत कोणतीही गंभीर कार्यवाही केली नाही. तसेच तुमच्या तक्रारीप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे असे सांगून फिर्यादीस प्रेत गावाकडे घेऊन जावा अंत्यविधी ऊर्का असे म्हणून घरी जाण्यास सांगितले. त्यानंतर धार्मिक विधी पूर्ण झाल्यावर फिर्यादी पोलीस स्टेशनला आले असतात त्यांना माहिती मिळाली की सरला गाडेकर या पोलीस अधिकाऱ्याने आरोपी यांच्यासोबत संगणमत करून कोणताही गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे फिर्यादी याने पाठपुरावा करून पोलीस उपाधीक्षक जिंतूर, पोलीस अधीक्षक परभणी आणि विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड,गृहमंत्री, मुंख्यमत्री मुंबई यांचे कडे लेखी तक्रार दिली. परंतु त्यानंतर देखील गुन्हा दाखल होत नसल्यामुळे शेवटी त्यांना न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय जिंतूर येथे तक्रार दाखल करावी लागली. सदरची तक्रार दाखल करत असताना मयतावर झालेल्या पोस्टमार्टम अहवालात संशयास्पद पुराव्याची माहिती, आरोपी यांच्यासोबत मोबाईल मध्ये झालेले संभाषण व इतर सर्व पुरावे दाखल करण्यात आले. फिर्यादी यांचे तर्फे ॲड. मनोज सारडा यांचा युक्तिवाद आणि प्रकरणात दाखल प्रथम दर्शनी सर्व पुराव्यांचा विचार करून न्यायाधीश श्रीमती वेदवती आद्य देशपांडे यांनी आरोपी यांचे विरुद्ध भादवी ३०२ व इतर कलमा अन्वये गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिनांक ०३/०५/२०२४ रोजी दिले आहेत. प्रकरणाचा क्रमांक फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ४४/२०२४

**विशेष म्हणजे प्रस्तुत प्रकरणात सरला गाडेकर यांना तत्कालीन पोलीस अधीक्षक यांनी सखोल चौकशी करून गुन्हा दाखल करण्याबाबत तोंडी आदेश दिलेले होते. असे असताना त्यांनी प्रस्तुत प्रकरणात आरोपी यांच्या राजकीय व आर्थिक दबावापोटी गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे प्रकरणाची चौकशी सी,आय,डी,मार्फत होऊन दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ ते आज पर्यंत सरला गाडेकर यांच्या मोबाईल मधून आरोपी व त्यांच्या नातेवाईकांसोबत झालेल्या संभाषणाची सीडीआर, सीसीटीव्ही कॅमेरा मधील फुटेज तपासून आरोपींना वाचवण्यासाठी पुरावा नष्ट करण्यास मदत केल्याबद्दल त्यांचेवर देखील गुन्हा दाखल करून न्याय द्यावा. असे फिर्यादी यांनी वार्ताहर यांना बोलताना सांगितले आहे. जर वरिष्ठांनी संबंधित फौजदाराविरुद्ध कार्यवाही न केल्यास लवकरच माननीय उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर येथे याचिका दाखल करणार असल्याचे सांगितले आहे.**

### शेतकऱ्याचे ५० हजार चोरट्यांनी केले लंपास

#### -तूळजा भवानी मल्टीस्टेट पतसंस्थेतील घटना

#### -चोरटे सिसिटिव्हीत कैद

**सेलू,/प्रतिनिधी-**शहरातील तूळजा भवानी मल्टीस्टेट को ऑपरेटीव्ह सहकारी पतसंस्थेत बचत खात्याच्या पासबूक वर इंट्री करण्यासाठी रांगेत उभ्या असलेल्या शेतक-याच्या पिशवीतून ५० हजार चोरट्यांनी चालाखीने लंपास केल्याची घटना शनीवार ४ रोजी घडली.शहरातील मध्यावर्ती तूळजा भवानी अर्बन को ऑपरेटिव्ह पतसंस्थेची शाखा आहे.शनिवारी रायपूर येथील खातेदार शेतकरी मूंजाभाऊ सूंदर गाडेकर यांनी एक लाख रूपये शाखेतून काढून पासबूक वर इंट्री करण्यासाठी रांगेत उभे असतांना संधीचा फायदा घेत त्यांच्या जवळील पिशवीतून ५० हजार चोरट्यांनी लंपास केले.सदरिल घटनेचे सिसिटिव्ही फूटेज मिळाले असून दोन संशयीतांवर गून्हा दाखल करण्यात आला असून घटनेमूळे पेरणीच्या तोंडावर शेतक-याची अडचण निर्माण झाली आहे.घटनेचा तपास पोलिस निरिक्षक दिपक बोरसे यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरिक्षक देशमूख हे करत आहेत. दरम्यान चोरीच्या घटनेत मोठया प्रमाणावर वाढ झाली आहे, त्यामुळे नागरिकांनी तसेच बँकेच्या वतीने सर्व योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे यावेळी बोलल्या जात आहेत.

## आई-वडिलांनीच केली स्वत:च्या मुलीची हत्या

### पालम तालुक्यातील नाव्हा येथील घटना : आंतरजातीय विवाहास विरोध

**पालम/प्रतिनिधी-** आंतरजातीय प्रेम विवाहाला विरोध करीत भावकीतील नातेवाईकांच्या सहाय्याने आई-वडिलांनी स्वत:च्या मुलीस जीवे मारल्याची धक्कादायक घटना पालम तालुक्यातील नाव्हा येथे घडली आहे. दरम्यान, या प्रकरणात ८ जणांवर खून करून पुरावा नष्ट केल्याबद्दल पालम पोलिस ठाण्यात शुक्रवारी (दि.३) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साक्षी बालासाहेब बाबर (वय १९) असे खून झालेल्या युवतीचे नाव आहे. साक्षी हीचे गावातीलच परजातीतील युवकासोबत प्रेमसंबंध जमलेले होते. सदर मुलीने आंतरजातीय विवाह करू नये याकरिता तिच्या या विवाहाला पालकांनी विरोध केला होता. परंतु तरी ही युवती तिच्या आंतरजातीय विवाह करण्यावर ठाम राहिलेली होती. या गोष्टीचा राग मनात धरुन दि.२१ एप्रिल रोजी रात्री १० ते दि.२२ एप्रिल रोजी पहाटेच्या दरम्यान नाव्हा येथे त्या युवतीच्या आई-वडीलांनी जीवे मारण्याच्या उद्देशाने तिला ठार केल्याचे समोर आले आहे. याच रात्री कोणालाही माहिती होवू न देता भावकीतील निवडक लोकांना त्यांनी समवेत घेऊन संगनमत केले आणि त्या युवतीचा मृतदेह नाव्हा येथील स्मशानभूमीत जाळून तो पुरावा नष्ट केल्याची धक्कादायक माहिती समोर आली. त्या मुलीचा अंत्यविधी नातेवाईक करत असताना अनेकजण तेथे हजर होते, त्यांना या अपराधाची माहिती असतानाही पोलिसांना याबाबत न कळवता सदर अपराधास सहाय्य केल्याने पोलिस निरीक्षक रावसाहेब गाडेवाड यांच्या फिर्यादीवरून त्या युवतीचे वडील बालासाहेब भिमराव बाबर, आई रुक्मीनबाई बाबर, अच्युत दत्तराव बाबर, राजेभाऊ रखमाजी बाबर, अशोक रुस्तुमराव बाबर, आबासाहेब रुस्तुमराव बाबर, गंगाधर योगाजी बाबर, गोपाळ अशोक शिंदे अशा ८ जणांवर पालम पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, घटनास्थळी अप्पर पोलीस अधिक्षक यशवंत काळे, डिवायएसपी डॉ. समाधान पाटील, निरीक्षक रावसाहेब गाडेवाड यांनी भेट देवून पाहणी केली. तपास डिवायएसपी डॉ. पाटील हे करीत आहेत.



### अभिनेता भालेराव यांना शिर्डीत पुरस्कार

**परभणी,/प्रतिनिधी:** शिर्डी येथे - ओम साई विकास प्रतिष्ठाण व बि.बि.सी.फिल्म प्रोडक्शन संस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील गुणवंत कलावंत कलाकार यांचा शिर्डी येथे दि.३ मे शुक्रवार रोजी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

परभणी जिल्ह्यातील जिंतुर तालुक्यातील येलदरी कॅम्प येथिल अभिनेता तथा पत्रकार यांना सिध्द संकल्प लॉन साकुरी शिर्डी येथे राष्ट्रीय स्तरावरील साईकलारत्न समाज भुषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले

अशोक ल. भालेराव याच्या अभिनय व पत्रकार क्षेत्रातील योगदान व चित्रपट निर्माता दिग्दर्शक गीतकार अतुल चौबे यांच्या हीच पोरगी पाहिजे या चित्रपटात महत्वपूर्ण भूमिका व विविध लघुपट व्हिडिओ सॉंग्स यामध्ये केलेल्या कार्याची दखल घेऊन अशोक भालेराव यांना राष्ट्रीय स्तरावरील,साई कलारत्न समाज भुषन हा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

संस्था चे अध्यक्ष सुदाम दादा संसारे पदाधिकारी यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल अशोक भालेराव यांचे कला साहित्य संगीत पत्रकार क्षेत्रात साहित्य क्षेत्रातील मान्यवरांकडून कलावंत व मित्र परिवाराकडून कौतुक होत असून त्याचे अभिनंदन होत आहे

## कल्याण नावाचा मटका घेणाऱ्यांना अटक; -सेलू व वालूर येथील घटना

**सेलू/प्रतिनिधी-** कल्याण नावाचा मटका घेणा-यांना अटक -सेलू व वालूर येथील घटना घडली आहे.

सेलू तालूक्यात अवैध धंद्याना आवर घालण्यासाठी पोलीस अँक्शन मोड मध्ये आल्याचे पाहावयास मिळत असून शहरासह तालूक्यातील ग्रामीण भागात पोलीस अवैध धंद्यावर कारवाही करत असून शनीवार ४ रोजी शहरासह वालूर येथे कल्याण नावाचा मटका जूगार घेणा-या तीघांवर कारवाही करून अटक करण्यात आले आहे.शहरात घडी टावर परीसरात कल्याण नावाचा मटका जूगार घेणा-या सत्यनारायण शर्मा कडून मटक्याचे आकडे लिहिलेला कागद ,पेन व ७०० रूपये चा ऐवज तर वालूर येथून बस स्थानक परिसरात कृष्णा झाकणे व सूमित कलाल यांच्याकडून लोकांना दिलेल्या चिठ्ठ्या व ३ हजार ९० रूपये रोख व १० हजार किंमतीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आले आहे .सदरिल कारवाही पोलीस निरिक्षक दिपक बोरसे यांच्या मार्गदर्शनानूसार पोलीस तपास मूलगीर व हिंगे यांच्याकडे देण्यात आला आहे.

-वाळू माफिया जोमात

मटका ,जूगार या अवैध धंद्यावर कारवाही होत आसतांना मात्र तालूक्यामध्ये अवैध वाळूचा उपसा रात्रंदिवस वाळू माफिया करत असून शहरासह ,ग्रामीण भागात सूद्धा नागरीकांना त्रास सहन करावा लागत असून या वाळू माफियावर सूद्धा कारवाहीसाठी पोलीस प्रशासनांनी अँक्शन मोडमध्ये येण्याची मागणी होत आहे.

## वनामकृवितील नाहेप केंद्रात कृषि ड्रोन अभ्यासक्रम

### १८ मे पासून अभ्यासक्रमास सुरुवात : कुलगूरु डॉ.इंद्रमणि एक विषय शिकविणार

**परभणी/प्रतिनिधी-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथील नाहेप केंद्राद्वारा सहा महिन्याचा कृषि ड्रोन तंत्रज्ञानावरील व्यावसायिक व संशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठाच्या वर्धापन दिनापासून म्हणजेच १८ मे पासून सुरु होणार आहे.

या अभ्यासक्रमाकरिता सेरेब्रोस्पार्क इंनोवेशन्स पुणे व वनामकृवि परभणी यांच्या मध्ये करार झाला असून या अभ्यासक्रमाकरिता रिमोट पायलट लायसन्स धारक अथवा अभियांत्रिकी शाखेतील पदवीधर उमेदवार पात्र आहेत. या अभ्यासक्रमात ड्रोन तंत्रज्ञानावरील मूलभूत अभ्यासक्रम व कृषी उपयुक्तता ज्यामधे पिक निरिक्षण सेन्सर प्रणालीतून ड्रोन द्वारा विविध कार्य, पीक रोग तपासणी, फवारणी सारखी विविध कार्य करण्याकरिता संरचना व निर्मिती सारख्या शेतीविषयक नवीन ड्रोन तंत्रज्ञान शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि हे स्वतः या अभ्यासक्रमात एक विषय शिकविणार आहेत.




अभ्यासक्रमातील कृषी विषयक ड्रोन तंत्रज्ञान अभ्यासक्रम तयार करताना कुलगुरु इंद्रमणि यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके आणि नियंत्रक प्रवीण निर्मळ यांची प्रमुख उपस्थिती होती. या अभ्यासक्रमाची माहिती ://... या संकेतस्थळावर ऊपलब्ध असून सदरील अभ्यासक्रमाकरिता इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज गूगल फॉर्म द्वारे संकेत स्थळावर नोंदीत करावा. या अभ्यासक्रमानंतर विविध कृषी ड्रोन उत्पादक कंपनी, शासकीय कार्यालय, सुरक्षा मंत्रालय, ई. सारख्या क्षेत्रात नौकरी वा स्वत:चा व्यवसाय असा फायदा होऊ शकतो. मागील ४ वर्षापासुन नाहेप केंद्राने कृषी ड्रोन क्षेत्रात भरपूर कार्य केलेले असून संशोधन विद्यार्थ्यांना तंतोतंत कृषी व्यवसायकता साधण्यासाठी संधी उपलब्ध करून दिल्या आहेत व विविध १२ देशात ५५ संशोधन विद्यार्थ्यांना तसेच २५ प्राध्यापकांना एक ते तीन महिने प्रशिक्षणासाठी पाठविले व त्यावर संशोधन प्रकाशने झाली.

सेरेब्रोस्पार्क इंनोवेशन्स, पुणे ड्रोन संरचना, उत्पादन व कृषि संबंधित सेवा कार्य करीत असून पाच वर्षाचा करार कालावधी दरम्यान कृषी ड्रोन संशोधन, चालक, चाचणी व दुरुस्ती सारख्या कार्याकरिता वनामकृवि सोबत कार्य करणार असून या करारातून दोन्ही संस्थांना निश्र्चित कार्य प्रणाली करण्यास आश्वासित केले.

नाहेप चे प्रमुख अन्वेषक डॉ. गोपाळ शिंदे यांनी प्रास्ताविक व संशोधन करण्यासंबंधी करारा बाबत माहिती दिली. याप्रसंगी उप अन्वेषण डॉ. डी. डी. टेकाळे, डॉ. गोदावरी पवार, डॉ. प्रवीण कापसे, डॉ. विशाल इंगळे, डी. व्ही. पाटील यांची उपस्थिती होती. या अभ्यासक्रम व करार कार्यात इंजी. श्रद्धा मुळे, संशोधन सहाय्यक व इंजी. विशाल काळबांडे यांनी सहभाग नोंदविला.

**जाहिर प्रगटन**

श्रीमती ए आर फक्राबादकर ५वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, परभणी यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३३६/२०२४

सुधा वि. निरंक

Petitioners:- 1-) Sudha W/o Purushottamrao Pande, Age-76 Occu-household.R/o Trimurti Nagar, Uttar Baju Gandhi Nagar, Parbhain Tq.& Dist. Parbhani.2-) Sangita W/o Pradeep Mandlik Age-52 Occu-household. R/o Balaji mandir ke pass, Flat No.06 Maithali, Plot No.70 Tilak Nagar, Kranti Chowk S.O Aurangabad,3-)Mukund s/o. Purushottamrao Pande, Age-43 Occu-Service R/o Nath nagar, Parbhani.

V/s

Respondent:-Nil.

Claim:- वारसा प्रमाणपत्र[ Legal Heirship Certificate ] मिळणेबाबत...

ज्याअर्थी अर्जदार यांनी अँड. एस.पी. कुलकर्णी वकील यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे की, मयत १.) Purushottamrao Ramkrishna Pande हे दिनांक ११/१२/२०२३ रोजी रोजी त्यांचे राहते घरी परभणी येथे मयत झालेले आहेत. त्यांना अर्जदारा च्या व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. वारसा प्रमाण पत्र [ Issue Legal Heirship Certificate, in the Name of Petitioners for Legal Recognition & other official Purpose. ] मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे

त्याअर्थी, सदर अर्जाबाबतचा कोणाचा काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० (तीस)दिवसाच्या आत आपला आक्षेप या न्यायालयात दाखल करावा नसता अर्जदाराचे म्हणने ग्राहय धरुन त्यांच्या तर्फे निर्णय देवून अर्जदारांच्या नावे वारसा हक्काचे प्रमाण पत्र दिले जाईल.आदेशान्वये

एम.आर. टेकाळे
क. लिपीक,
५वे सह दिवाणी न्यायालय क. स्तर, परभणी

स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर परभणी.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, ०६ मे २०२४ वर्ष दुसरे अंक ४५ पाने : ८ किंमत रु. ६/- Date : Mon. 06 May 2024 Volume 02 Issue 45 Page 8 Price : 6/-




## आरोग्य व स्वास्थ्य उपक्रम 'सुश्रुत' लाँच

पुणे - ॲमेझॉन इंडियाने आज ट्रक ड्रायव्हर्ससाठी सर्वसमावेशक आरोग्य व स्वास्थ्य उपक्रम 'सुश्रुत'च्या लाँचची घोषणा केली. ॲमेझॉन ३५० हून अधिक ट्रकिंग सहयोगींसोबत काम करते, जे हजारो ट्रक ड्रायव्हर्सना काम देतात. या उपक्रमाचा रस्त्यावर बहुतांश वेळ ड्रायव्हिंग करत काम करणाऱ्या या ट्रक ड्रायव्हर्सच्या आरोग्यविषयक गरजांना प्राधान्य देण्याचा मनसुबा आहे. तसेच, हा उपक्रम दीर्घकालीन आरोग्य पद्धतींबाबत जागरूकता निर्माण करेल, ज्याचा ट्रक ड्रायव्हर्स आणि त्यांच्या कुटुंबियांना फायदा होईल. बेंगळुरू, मानेसर (हरियाणा) आणि देशांच्या इतर भागांमध्ये ट्रक ड्रायव्हर्ससाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामध्ये ७० हून अधिक आरोग्यविषयक घटकांची तपासणी करण्यात येणार आहे.

## फर्टिलिटी क्लीनिक ची सुरुवात

पुणे -फर्टिलिटीसाठी आयुर्वेद, तंत्रज्ञान, सामग्री आणि समुदाय यांचे अनोखे मिश्रण असलेली भारतातील पहिली आयुर्वेद फर्टिलिटी कंपनी गायनोवेदा यांनी पुण्यात त्यांचे दुसरे फर्टिलिटी क्लिनिक सुरु केले आहे. १० दशलक्ष जोडप्यांचे पालकत्वाचे स्वप्न पूर्ण करण्यात मदत करून त्यांच्या जीवनावर प्रभाव टाकण्याचा कंपनीचा मानस आहे. अनेक जोडप्यांना पालकत्व प्रदान करण्याचे त्यांचे ध्येय पूर्ण करण्याच्या दृष्टीने हे पुण्यातील क्लीनिक एक महत्वाचे पाऊल आहे. गायनोवेदा एक अग्रगण्य प्रजनन समाधान प्रदाता आहे जो आयुर्वेदासह नैसर्गिक गर्भधारणा सक्षम करतो. हे जोडप्यांची सुरक्षितता, परिणामकारकता आणि सर्वांगीण कल्याण यावर लक्ष केंद्रित करते.त्याचे उपचार १००% नैसर्गिक आहेत, हानिकारक दुष्परिणाम टाळतात आणि आयुर्वेदावर अवलंबून असतात, प्रजनन आरोग्यासाठी एक नैसर्गिक वैदिक औषध देण्याचे कार्य गायनोवेदा करत आहे. हा सुरक्षित, गैर-आक्रमक पर्याय व्यक्तींना त्यांच्या आरोग्याशी तडजोड न करता प्रभावी उपचार घेण्यास सक्षम बनवतो, ज्यामुळे प्रजनन उद्योगात गायनोवेदा हा एक मौल्यवान पर्याय बनतो. मासिक पाळी आणि पुनरुत्पादक आरोग्य विकारांसाठी भारतातील ६००००० हून अधिक महिलांचा गायनोवेदा वर विश्वास आहे.

## वीवो ने वी३0ई लाँच केला

नवी दिल्ली : वीवो , या नाविन्यपूर्ण जागतिक स्मार्टफोन ब्रँडने आज भारतात त-डशीळशी लाइनअपमध्ये आपली नवीनतम जोड लाँच केली - वीवो वी३०ई , ५५००एमएएच बॅटरीसह भारतातील सर्वात पातळ स्मार्टफोन. डिव्हाइसमध्ये एक विभाग-अग्रणी ५०एमपी सोनी आईएमएक्स८८२ ओआईएस मुख्य कॅमेरा, स्टुडिओ गुणवत्ता ऑरा लाइट आणि पुढील आणि मागील कॅमेऱ्यांसाठी ४घ व्हिडिओ रेकॉर्डिंग क्षमता देखील आहेत. वी३०ई मध्ये उत्कृष्ट इन-हँड फीलसाठी अल्ट्रा-स्लिम ३डी-वक्र डिस्प्लेसह एक आकर्षक डिझाइन देखील आहे. हे वेल्वेट रेड आणि सिल्क ब्लू रंगांमध्ये उपलब्ध आहे, जे स्मार्टफोनची आकर्षक रचना वाढवते. ८जीबी+१२८जीबी व्हेरियंटसाठी रु. २७,९९९ आणि ८जीबी+२५६जीबीव्हेरिएंटसाठी रु. २९,९९९ च्या किंमतीसह, स्मार्टफोन ९ मे २०२४ पासूनफ्लिपकार्ट,वीवो इंडिया ई-स्टोर आणि सर्व भागीदार रिटेल स्टोअरवर विक्रीसाठी उपलब्ध होईल.

## स्पिनएक्सट्रीम ने प्राइम टेबल टेनिसचे विजेतेपद पटकावले

पुणे : स्पिनएक्सट्रीम ने टीम क्लिपर्स विरुद्धचा सामना जिंकून प्राइम टेबल टेनिस सीझन २ चे विजेतेपद पटकावले. पलावान शहरातील ऑलिम्पिक स्पोर्ट्स सेंटरमध्ये अंतिम सामना झाला. दोन बलाढ्य संघांमधील या रोमांचक सामन्यात ८ संघातील ५६ अव्वल खेळाडूंचे दमदार कौशल्य पाहायला मिळाले. स्पिनएक्सट्रीम ने क्लिपर्सचा ६-५ गुणांसह पराभव करून हा विजय मिळवला आहे. प्राइम टेबल टेनिसचे सीईओ अभिषेक जैन यांनी स्पिनएक्सट्रीम चे त्यांच्या आश्चर्यकारक विजयाबद्दल अभिनंदन केले. लीगच्या यशाबद्दल आणि सहभागी असलेल्या प्रत्येकाच्या टीमवर्क आणि उत्कटतेचे त्यांनी कौतुक केले. स्पिनएक्सट्रीमच्या सिद्धेश पांडेने देखील संघाच्या सामूहिक प्रयत्नांना अधोरेखित करताना सर्व प्रशिक्षक आणि त्यांच्या सततच्या पाठिंब्याबद्दल त्यांचे आभार मानले.

## घरत कुटुंब आलंय आपल्या भेटीला, 'घरत गणपती' २६ जुलैला मराठी रुपेरी पडद्यावर



'कुटुंब'हा आपल्या प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा विषय. कुटुंबातील,नात्यागोत्यातील प्रत्येकाशी आपलं प्रेमाचं, स्नेहाचं एक वेगळं नातं असतं. मराठी चित्रपटांतूनही कौटुंबिक विषय अतिशय उत्तमतेने हाताळलेले आपण पाहतो. आंबे, सुपारी, केळी, फणसाच्या बागा, काजू, कोकमाची झाडं असा निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या कोकणाच्या पार्श्वभूमीवर घडणारी घरत कुटुंबाची मजेशीर गोष्ट आपल्याला आगामी 'घरत गणपती' या चित्रपटातून पहायला मिळणार आहे. मनोरंजन क्षेत्रात तडाखेबंद कलाकृतींनी आपलं वेगळं स्थान निर्माण करणारे पॅनोरमा स्टुडिओज सविनय सादर करत आहेत नॅविअन्स स्टुडिओ यांच्या सहकार्याने मराठी चित्रपट 'घरत गणपती'. हा भव्य चित्रपट २६ जुलैला आपल्या भेटीला, आपल्या जवळच्या चित्रपटगृहात येत आहे.

# अंशा-अंशाने वाढतोय पारा, उन्हाचा तडाखा न्यारा! शहर ४१.६

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगरसह उन्हाचा चटका वाढल्याने मराठवाड्यात होरपळ कायम असून, यापुढे ती वाढत जाणार आहे. भाजून काढणारा उन्हाचा तडाखा आणि उकाडा असह्य होत आहे. शहरासह मराठवाड्यातील नागरिक उष्ण व दमट हवामानाचा अनुभव घेत असून, तुरळक ठिकाणी उष्ण लाटेचा इशारा म्हणजे येलो अलर्ट देण्यात आला आहे.

शुक्रवारी शहराचे कमाल तापमान ४०.४ अंश सेल्सिअस, तर किमान २५.६ अंश सेल्सिअस एवढे होते. शनिवारी, ४ मे रोजी शहराचे तापमान एक अंशाने वाढून ते ४१.६ अंश सेल्सिअस एवढे झाले. किमान तापमान २४.८ अंश सेल्सिअस एवढे होते.

अंशा-अंशाने वाढतोय पारा

१० मे पर्यंत अंशा-अंशाने तापमानाचा पारा चढणार असून,



ऐन निवडणूक काळात रस्त्या-रस्त्यांवर रणरणत्य उन्हात अघोषित संचारबंदी जाणवू लागली आहे. ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांनी सांगितले, दक्षिण छत्तीसगडपासून दक्षिण तमिळनाडूपर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा कायम आहे. राज्यात आकाश अंशत: ढगाळ होत आहे. यातच स्वच्छ सूर्यप्रकाश जमिनीवर येत असल्याने उन्हाचा चटका वाढला आहे.

'कमाली'ची होरपळ !

दरम्यान, मराठवाड्याच्या बहुतांश भागात उन्हाचा चटका कायम असल्याने बीड, जालना, नांदेड, हिंगोली, परभणी आदी अनेक ठिकाणी तापमान चाळिशीपार आहे. रविवार, ५ मे रोजी शहरासह मराठवाड्यात उष्ण व दमट हवामानाचा, तर मराठवाड्यातील धाराशिव आणि लातूरसह तुरळक ठिकाणी उष्ण लाटेचा इशारा देण्यात आला आहे. उर्वरित राज्यात उन्हाचा चटका, उकाडा कायम राहण्याची शक्यता आहे. या भागांतही तापमानाचा पार चढता राहणार असल्याचे डॉ. साबळे म्हणाले.

## अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी उद्योजक मनोज पवार आले धावून

### आपल्या वाहनातून पोचवलं रुग्णालयात; नातेवाईकांनी मानले आभार

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.०६ एप्रिल - शहरातील उद्योजक तथा समाजसेवक मनोज पवार गुरुवारी बादली ता.वैजापूर येथून लग्नसमारंभ आटपून कन्नड कडे येत असताना रस्त्यात दिसलेल्या अपघातातील जखमी दांपत्यांना मनोज पवार यांनी,आपल्या स्वतः च्या वाहनात बसवून आणले व त्यांना तातडीने वैद्यकीय मदत मिळवून दिली. या घटनेमुळे मनोज पवारांच्या संवेदनशीलतेचा अनुभव अपघातग्रस्तांसह येथील नागरिकांना गुरुवार रोजी आला. तातडीने मदत मिळाल्याने अपघातग्रस्तांच्या नातेवाईकांनी



उद्योजक मनोज पवार यांचे आभार मानले.

उद्योजक मनोज पवार वैजापूर तालुक्यातील लग्न समारंभ उरकून कन्नडकडे येत असताना दुपारी वैजापूर-कन्नड रोडवरील हसनखेडा या गावालगत त्यांना अपघात झाल्याचे दिसले त्यावेळी त्यांनी तत्काळ आपल्या दोन्ही गाड्या थांबविल्या आणि त्यांच्या लक्षात आले की,कन्नड तालुक्यातील शिवराई येथील ज्ञानेश्वर औटे आणि सौ.मिनाबाई ज्ञानेश्वर औटे रा.शिवराई हे दांपत्य वैजापूरला लग्नाला गेले होते वापस घराकडे परततांना गाडीचा झोक जाऊन गाडीवरून पडले आणि गंभीर जखमी झाले.

या दांपत्यांना झालेल्या अपघातात महिला व पुरुषाच्या तोंडाला व हात पायांना जबर मार लागल्याचे मनोज पवार यांना दिसले. यावेळी मनोज पवार यांनी जास्त वेळ न घालता अपघातग्रस्तांना तातडीने आपल्या वाहनात बसवले आणि त्यांच्यासोबत त्यांचा एक सहकारी अपघातग्रस्तांना पुढील वैद्यकीय उपचारासाठी कन्नड ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. यामुळे जखमींवर तत्काळ उपचार सुरू झाले. यावेळी त्यांच्या नातेवाईकांनी उद्योजक तथा समाजसेवक मनोज पवार आणि मित्र मंडळातील सदस्यांचे आभार मानले आहेत.

## विश्वनेते नरेंद्र मोदी यांची अहमदनगरमध्ये विजय संकल्प सभा



अहमदनगर : विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विजय संकल्प सभेची जय्यत तयारी महायुतीच्या वतीने करण्यात आली असून, प्रधानमंत्र्यांच्या स्वागतासाठी अहमदनगर शहर सज्ज झाले आहे. मागील लोकसभा निवडणूकीच्या वेळी याच मैदानावरुन मोदींनी संबोधित केले होते. या आठवणींना उजाळा देवून महायुतीचे उमेदवार खा.डॉ. सुजय विखे पाटील यांच्या विजयाचा निर्धार पुन्हा एकदा या ऐतिहासिक सभेतून होणार आहे.

शहरातील संत निरंकारी भवन शेजारील मैदानावर मंगळवार दिनांक ७ मे २०२४ रोजी दुपारी १ वाजता ही सभा होणार आहे. सुमारे १ लाख नागरीकांच्या उपस्थित सभा होण्याच्या दृष्टीने महायुतीच्या वतीने नियोजन करण्यात येत आहे. या सभेला मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुती मधील घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवार खा.डॉ. सुजय विखे पाटील आणि शिर्डी लोकसभा मतदार संघातील उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या निवडणूक प्रचारार्थ या महासंकल्प विजय सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी मैदानावर भव्य सभामंडप उभारण्यात आला असून, १ लाख नागरीकांच्या बसण्याची व्यवस्था या मंडपात करण्यात आली असून, उन्हाची तिव्रता लक्षात घेवून सभामंडपामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. भव्य अशा स्टेजवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आगमन झाल्यानंतर ते उपस्थितांना मार्गदर्शन करतील.

## सात दशकानंतर आचार्य श्री महाश्रमण यांचे शहरात आगमन

### सात ते ११ मे पर्यंत शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

छत्रपती संभाजीनगरः जैन श्वेतांबर तेरापंथ धर्म संघाचे अकरावे आचार्य श्री महाश्रमण यांचे ८१ साधुसंतांसह मंगळवारी सात रोजी गोलवाडीत आगमन होणार आहे. आचार्य संघाच्या मार्गदर्शनाखाली ११ मे पर्यंत शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आचार्यश्री महाश्रमण अक्षय तृतीया प्रवास व्यवस्था समितीचे अध्यक्ष सुभाष नहार यांनी दिली. यावेळी डॉ. अनिल नहार, सकल जैन समाजाचे महासचिव महावीर पाटणी यांची प्रमुख उपस्थिती होती.



पुढे बोलताना ते म्हणाले की, जैन शेतांबर तेरापंथ धर्म संघाचे नवे आचार्य श्री तुलसीजी हे ६९ वर्षांपूर्वी महावीर जयंती निमित्त शहरात आले होते. त्यावेळी त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले होते. त्यानंतर आता पहिल्यांदा अकरावी आचार्य श्री महाश्रमणजींचे शहरात आगमन होत आहे.

आचार्य श्री महाश्रमणजी यांचे ८१ साधू संतांच्या मार्गदर्शनाखाली शहरात ७ ते ११ मे दरम्यान धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील प्रेसिडेंट लोन येथे गुरूवारी ९ मे रोजी सायंकाळी सात वाजता तप अनुमोदना गीत कार्यक्रम होणार आहे. सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम शुक्रवारी १० मे या दिवशी अक्षय तृतीया वर्षात तपपार्ना महोत्सव होणार आहे. त्याचप्रमाणे दररोज पहाटे चार वाजता उपासना, सामायिक, स्वाध्याय, मंगल पाठ, प्रवचन, सायंकाळी प्रतिक्रमण आणि अर्हत वंदना असे कार्यक्रम होणार आहेत. या सोहळ्याचे आयोजन आचार्य महाश्रमणजी अक्षय तृतीया प्रवास व्यवस्था समिती तर्फे करण्यात आले आहे. मंगळवारी गोलवाडी येथे श्री जैन श्वेतांबर तेरापंथी सभा तर्फे उभारण्यात आलेल्या तेरापंथ भवन चा लोकार्पण सोहळा आचार्य श्री महाश्रमणजी यांच्या हस्ते मंगळवारी सात मे रोजी होणार आहे.

## कोल्हे दाम्पत्यांची तब्ब्ल सहाशेच्यापार लग्नाना हजेरी

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.०६ मे :- राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते संतोष कोल्हे,तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी राष्ट्रवादी जिल्हा महिला अध्यक्षा स्वाती कोल्हे यांनी लगकार्यानिमित्त अख्खा तालुका पिंजून काढला आहे. सकाळी सात ते रात्री बारा पर्यंत तालुक्यात असलेल्या कार्यकर्त्यांनाच्या लग्नासाठी उपस्थिती लावली आहे. तबबल सहाशे तीसच्या वर उभय दाम्पत्यांनी लग्नास उपस्थिती लावली असून युवा समाजसेवक योगेश कोल्हे यांनीही त्यात भर घातली आहे.

स्वाती कोल्हे या कन्नड नगरपालिकेच्या प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा राहिल्या असून महिलावर्गात त्यांचा दांडगा संपर्क आहे, संतोष कोल्हे यांनाही नगराध्यक्ष पदाचा प्रदीर्घ अनुभव आहे. मोठा मित्रपरिवाराचा गोतावळा आहे. त्यांच्याकडे कार्यकर्ता नसून मित्रपरिवारच त्यांचं कार्यकर्ता आहे.शिवाय लहान बंधू युवा समाजसेवक तथा उद्योजक असलेले योगेश कोल्हे यांचाही दांडगा जनसंपर्क असून शहरातील व तालुक्यातील कोणत्याही कार्यकर्त्यांचे काम असो ते दिवस रात्र उपलब्ध असतात. एकूणच कन्नड तालुक्यातील तांडे, वाड्या, वस्त्या, प्रत्येक गावागावात त्यांचा जनसंपर्क असल्याने आग्रहाचे निमंत्रण त्यांना मिळत असते संतोष कोल्हे, स्वाती कोल्हे आणि योगेश कोल्हे अर्थात कोल्हे कुटूंबियाणे जवळपास सहाशे तीस च्या वर लग्नाना हजेरी लावली आहे.

## धूत हॉस्पिटलमध्ये ट्रान्सकॅथेटर ऑर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लांटेशनने यशस्वी उपचार : डॉ. विलास मगरकर

### कमी जोखमीमुळे ज्येष्ठ नागरिक रुग्णांना मिळाला दिलासा

छत्रपती संभाजीनगर- वाढते वय पाहता हृदयाशी संबंधित शस्त्रक्रिया करण्यास बहुतांश सर्जननी नकार दिलेला असताना अत्यंत कमी जोखमीची ट्रान्सकॅथेटर ऑर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लांटेशन सर्जरीद्वारे दोन ज्येष्ठ नागरिक रुग्णांना सेठ नंदलाल धूत हॉस्पिटलच्या तज्ञांमुळे दिलासा मिळवून देण्यात यश आले आहे. विशेष म्हणजे भारतीय बनावटीच्या वॉलचा वापर यामध्ये झाल्याने तुलनात्मक दृष्ट्या कमी खर्चात हे शक्य झाले, अशी माहिती हृदयरोग विभाग प्रमुख डॉ. विलास मगरकर यांनी दिली.



हृदयाच्या गंभीर आजारांना तोंड देत असलेल्या रुग्णांच्या जीवनावर ट्रान्सकॅथेटर ऑर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लांटेशन च्या परिवर्तनात्मक प्रभावावर प्रकाश टाकणारी उल्लेखनीय माहिती यावेळी देण्यात आली. जालना जिल्ह्यातील हरदखेडा येथील महादेव मंदिरात पुजारी म्हणून सेवा करणाऱ्या ८२ वर्षीय ज्येष्ठ नागरिक रुग्णाला हृदयरोग असल्याचे समोर आल्यावर गावातील नागरिकांनी त्यांना धूत हॉस्पिटलमध्ये निदान व उपचारासाठी आणले. त्यांची अँजिओग्राफी, सिटी स्कॅन, सोनोग्राफी अशा तपासण्या करण्यात आल्या. यावेळी हृदयापासून निघणाऱ्या व संपूर्ण शरीराला रक्तपुरवठा करणाऱ्या महाधमनी (एव्होर्टा) या मुख्य रक्तवाहिनीवर आणि हृदयाच्या झडपेच्या खालील व वरील बाजूस कॅल्शिअम आढळून आले. दरम्यान, रुग्णाची आर्थिक परिस्थिती नाजूक होती आणि सर्जरी खूप खर्चिक होती. त्यामुळे ग्रामस्थांनी मदतनिधी जमा करण्याची तयारी केली. ही बाब लक्षात घेऊन धूत हॉस्पिटलच्या वतीने मानवतेच्या दृष्टिकोनाचा विचार करत त्यांच्या शस्त्रक्रियेचा खर्च, फीस तसेच हॉस्पिटलमध्ये राहण्याचा खर्च न घेता केवळ सर्जरीदरम्यान लागणाऱ्या मटेरियलचाच खर्च घेत अत्यंत अत्याधुनिक अशा ट्रान्सकॅथेटर ऑर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लांटेशनद्वारे रुग्णाला दिलासा मिळवून दिला. असे डॉ. विलास मगरकर यांनी सांगितले.

यूनियन बैंक ऑफ इंडिया भारत सरकार का उपक्रम
Union Bank of India A Government of India Undertaking
क्षेत्रीय कार्यालय - अहमदनगर
प्लॉट नं. ३,४,८ व ९, पहीला मजला, नागापूर पुलाजवळ, नगर-मनमाड रोड, नागापूर, अहमदनगर ४१४१११ फोन ०२४१-२९९०२४५

भाडेतत्वावर जागा पाहीजे

युनियन बँक ऑफ इंडियाला १) करन्सी चेस्ट करीता अहमदनगर शहर एरिया (जि. अहमदनगर) मध्ये ४000 स्क्वे फुट (+ - 10%) २) रांजणगाव खुरी शाखा, गाव रांजणगाव खुरी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर करीता सर्व सुविधा असलेली १२०० (+ - 10%) सर्व सुविधा असलेली कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in / ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in वर उपलब्ध आहे.

इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. २७/०५/२०२४ दुपारी ४.00 वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. ०६/०५/२०२४
अहमदनगर

क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय, अहमदनगर
ARL

# गंधवतीचा अक्षय्य सोहळा

असं म्हणतात की, 'क्षय होत नाही वा होऊ नये अशी इच्छा असते ते म्हणजे अक्षय्य...!' या अर्थाने मराठी पंचांगाप्रमाणे वैशाख महिन्यातील शुद्ध तृतीयेला साजरा होणारा अक्षय्य तृतीयेचा दिवस महत्त्वपूर्ण म्हणायला हवा. या दिवसाला भारतात निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळी नावे आहेत. आज आपण त्याचा फारसा ऊहापोह करायला नको, पण एक धावता धांडोळा घ्यायचा झाला तर बंगालमध्ये अक्षय्य तृतीयेला 'वसुबारस' मानून गाय-गोऱ्ह्याचे कौतुक केले जाते. आपल्याकडे ग्रामीण भागात अक्षय्य तृतीयेला 'आखिती' म्हणतात. 'आखिती' हा देशी भाषेतला उच्चार आहे. वर्षातील साडेतीन मुहूर्त सर्वात शुभ मानले जातात. 'अक्षय्य तृतीया' हा त्यापैकी एक आहे. काही ठिकाणी तो अर्धा मुहूर्त मानला जातो तर काही ठिकाणी एक पूर्ण मुहूर्त मानला जातो. या परमशुभ दिवशी कोणतेही शुभकार्य करण्यास हरकत नसते. कारण ते यशस्वी होणार याची खात्री असते.

दुसरी कल्पना अशी की, काही जण अक्षय्य तृतीयेच्या दिवशी त्रेतायुगाचा प्रारंभ झाल्याचे मानतात तर काही जण हा सत्ययुगाचा प्रारंभ मानतात. ओडिशामध्ये या दिवशी 'चंदनयात्रा' सजते. या दिवशी चंदनाच्या लेपाने अभ्यंगस्नान केले जाते. काही ठिकाणी या दिवशी मदनमोहनाची मूर्ती पालखीतून मिरवून तिची पूजा संपन्न होते. आपल्याकडे या दिवशी परशुरामाचा जन्म झाला असे मानतात आणि त्या निमित्ताने चिपळूणला मोठी यात्रा भरते. वेगवेगळ्या ठिकाणी या दिवसाचे वेगवेगळे पारंपरिक महत्त्व समोर येते. हा वैष्णव संप्रदायाकडे कलणारा दिवस मानला जातो.

मे महिन्याच्या सुरुवातीच्या काळात येणारा हा दिवस... या काळात रखरखीत ऊन असते. बोलीभाषेत या तापणाऱ्या दिवसांना 'वैशाख वणवा' असेही म्हणतात. रानात वणवा लागावा तसा सूर्य तापत असतो. सध्या आपण याचाही अनुभव घेत आहोत. तेव्हा रखरखीत उन्हाळ्याचे हे दिवस. संपूर्ण सृष्टी रसरसलेली, तापलेली असते; याच वेळी वसंत ऋतूची पालवीही फुटत असते. सृष्टीचे हे मोठे मजेशीर कौतुक आहे. एकीकडे भाजून काढणारे ऊन, झाडांची पाने शिशिरात आधीच गळून गेलेली असतात. नंतर ऐन चैत्रात उन्हाचा तडाखा वाढतो तेव्हा मात्र कोवळी पालवी फुटायला लागते. काही झाडांना मोहर लगडतो. आंबा, शेवगा बहरतो. म्हणजेच एकीकडे काही गोष्टी नाहीशा होत असतात तर दुसरीकडे नवी सृष्टी निर्माण होण्याच्या कोवळ्या खुणाही याच काळात दिसत असतात. म्हणूनच हा 'वसंतोत्सव' मानला जातो. हा काळ संपूर्ण उत्तरेत आणि बंगालमध्ये 'वसंतोत्सव' म्हणूनच साजरा केला जातो. तिथे या ऋतूमध्ये राधाकृष्ण क्रीडा खूप मोठ्या प्रमाणावर रंगतात आणि खेळल्या जातात. कृष्ण ही विष्णू संप्रदायातील देवता आहे, हे येथे उल्लेखनीय.

दुसरीकडे या काळात रानात धूळपेरणी (उन्हाळ्यातील पेरणी) केली जाते. विशेषतः अक्षय्य तृतीयेला वेलभाज्यांची टोकणी केली जाते. म्हणजेच लहान लहान पिशव्यांमध्ये बीजे भरून टोकणी करतात आणि त्याला थोडे पाणी घालतात. पुढे ही रोपे फुटत असतानाच पावसाळा सुरू होतो. वळिवाचा एखाद-दुसरा पाऊस पडून गेला की, ही बीजे मुळे धरू लागतात आणि त्याला अंकुरही फुटू लागतात. म्हणजे झाडांना पालवी फुटत असते, मोहर येत असतो तर बीजे टोकणीतून अंकुरही फुटत असतात. एकीकडे ही निर्मिती होत असते तर दुसरीकडे उष्णतेमुळे जमीन भाजून संहारही होत असतो. म्हणजेच संहार आणि सर्जन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आपल्याला सृष्टिचक्रातील या काळात बघायला मिळतात. या सगळ्या वसंत आगमनाच्या खुणा असतात.

याच चैत्र-वैशाखाच्या काळात उत्तरेत आणि बंगालमध्ये 'दोलोत्सव' पार पडतात. त्यामध्ये अन्नपूर्णा देवीला पाळण्यात घालून झोके दिले जातात. 'दोलोत्सव' साजरा करत तिला झुलवले जाते. आपल्याकडे जुन्या परंपरेनुसार अन्नपूर्णा देवीची डोलाऱ्यामध्ये स्थापना करून पूजा केली जाते. त्या निमित्ताने हळदी-कुंकवाचा समारंभ केला जातो. त्यावेळी उन्हाळ्यात आवश्यक असणारा आणि सृष्टीने आपल्याला आपसूक दिलेला आहार सेवन केला जातो. या काळात एकीकडे भूमीतील पाणी नाहीसे होते खरे; फळे मात्र रसदार येत असतात. मग हळदी-कुंकवाच्या निमित्ताने बरोबरीच्या मित्र-मैत्रिणींना काकडी, कलिंगड, टरबूज आदी रसदार फळांचे वाटप केले जाते. थंडगार पन्हे दिले जाते. पारंपरिक धर्म वा कर्मकांड मानणारी मंडळी या काळात ब्राह्मणाला दक्षिणा, घडा तसेच शीतपेय देतात. अशा वेगवेगळ्या मार्गांनी हा रंगोत्सव साजरा होतो. तो 'रसरंग' या सुंदर नावाने ओळखला जातो.

आणखी एक गंमत म्हणजे या काळात येणारी सगळी फुले अतिशय सुगंधी असतात. म्हणजे उन्हाळा कडक तितका मोगरा, चाफा यासारख्या फुलांचा गंध मादक... म्हणजेच एकीकडे निसर्ग पाणी आटवतो, पण फळांमध्ये पाणी येते. झाडे सुकतात, पण नवी पालवी येते. दुसरीकडे सृष्टीमध्ये नानाविध गंध दरवळतात. म्हणजेच जणू पृथ्वीतून सगळे गंध फुलांमध्ये उतरत असतात आणि त्यानंतरच पाऊस येतो. वळिवाचा पाऊस पडल्यानंतर या तापलेल्या मातीतून गंध दरवळतो. जणू या मृद्गंधाच्या आधारे सृष्टी गंधोत्सव साजरा करत असते. पाने, फुले आणि मातीमधून हा गंधोत्सव साजरा होतो. म्हणूनच अशा मातीला, जमिनीला आपण 'गंधवती' म्हणतो. थोडक्यात, हा निसर्गाशी बांधलेला एक उत्सव आहे. पण हाच नव्हे, तर आपल्याकडचे सगळेच उत्सव निसर्गाशी बांधलेले आहेत. निसर्ग बदलतो तसे माणसाचे जगणे बदलत असते. मग कधी आपण त्याला देवाधर्माचे, रूढी-परंपराचे अधिष्ठान देतो आणि एखादी देवता त्याची अधिष्ठात्री असल्याचे मानतो.

एकंदरच क्षय झाला असे वाटत असतानाच पुन्हा उसळून नवी निर्मिती होते, असा हा अक्षय्य तृतीयेचा, संहार आणि सर्जन यांच्या संधिकाळाचा हा काळ. सुप्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे यांचे आजोबा ऋग्वेदी यांच्या 'आर्यांच्या सनांचा इतिहास' या पुस्तकात सर्व सण सामाजिक उत्सव आहेत, परंतु त्यांना धार्मिक अधिष्ठानही दिले गेले, असे म्हटले आहे. सग्यांनी, प्रियकर-प्रेयसीने एकमेकांच्या संगतीत राहणे आणि सगळ्या साधनांद्वारे मनातील प्रेमभाव वृद्धिंगत करणे याला ते एक प्रकारचा 'प्रणयोत्सव' म्हणतात. राधा-कृष्णाची गीत, सर्जनाची गीते रंगणे हा त्याचाच एक भाग आहे. या अर्थी हा सुफलनाचा काळ असतो. या काळात फलन होण्याची लक्षणे दिसतात. आपण त्याला सामाजिक विधिविधानांचे अधिष्ठान देतो. म्हणजेच त्याला धर्माचे, सामाजिकतेचे, प्रणयाचे अधिष्ठान देतो. त्यामुळेच आपण ग्रामीण भागात गेलो तर या काळात प्रणयाची गाणीही रंगताना दिसतात. विशेषतः लावण्यांमधून हा प्रणयरंग मोठ्या प्रमाणात व्यक्त होताना दिसतो.




निसर्गातील संहार आणि सर्जन याच्या सीमारेषेवरचे असे उत्सव जगाच्या पाठीवरील जवळपास सगळ्या संस्कृतींमध्ये निरनिराळ्या नावांनी साजरे होतात. उदाहरणार्थ, ख्रिश्चन लोकांमध्ये साजरा होणारा 'ईस्टर' नामक सणही एक प्रकारे वसंतोत्सवच असतो. थोडक्यात, हा भारतीय परंपरेतील 'व्हॅलेंटाईन सिझन' असतो, असे मला गमतीने म्हणावेसे वाटते. सृष्टीतील तसेच मानवी जीवनातील नवसर्जन सात्त्विक पद्धतीने होण्यासाठी रसरंगांची बरसात करणारा हा काळ आहे. तो अक्षय टिकावा, त्यातील प्रेमभाव, सर्जनभाव, निर्माणभाव अक्षय राहावा आणि आपणही जगावे व लोकांना जगू द्यावे हीच भावना यात दिसते. म्हणून पाण्याचे दुर्भिक्ष्य असताना ब्राह्मणाला शीतपेयाचे दान द्यावे, असे म्हटले जाते. दुसरीकडे लोकजीवनात ग्रामीण तसेच शहरी भागात याच काळात पाणपोया सुरू होतात. जनावरांच्या पाण्याची व्यवस्था केली जाते. सर्वसामान्य माणसेही पक्ष्यांसाठी दारात छोटे घडे भरून ठेवतात. परळामध्ये पाणी ओतून ठेवतात. कारण 'जगा आणि जगू द्या' हे सूत्र आपण मानतो. पाणी आणि माती याशिवाय कोणाचेही जगणे अपूर्ण आहे. म्हणून माणूस, प्राणी, पक्षी आणि प्रणय या सगळ्यांची सांगड घालणारा हा काळ महत्त्वाचा आहे.

अर्थात सृष्टिचक्राने आपली अखंडता कायम राखणे ठरवले असले, तरी बऱ्याचदा माणूस स्वार्थासाठी, विकासाच्या नावाने हे सृष्टिचक्र भकास करू पाहतो. याचे अतिशय उग्र रूप सध्या आपण सगळेच अनुभवत आहोत. सृष्टिचक्रात नको ती ढवळाढवळ केल्यामुळे पर्जन्यमान, उष्णतामान, वनस्पती निर्मिती, पीक-पाणी या सगळ्यांवर विपरीत परिणाम होताना दिसत आहे. आता या सगळ्याला सावरण्याचे काम मनुष्यच करणार आहे. मात्र, माणसाने ते लवकर केले नाही तर सृष्टीच्या या अनमोल देणगीअभावी माणूस भिकारी होईल, वंचित होईल आणि पुढच्या पिढ्या कदाचित गर्तेतही जाऊ शकतील. म्हणूनच पुढील पिढ्यांचा विचार करून तरी माणसाने सावध होऊन निसर्गाचा समतोल टिकवण्यासाठी कार्यरत होणे गरजेचे आहे. विशेषतः पाणी, वनस्पती आणि वातावरणाचे रक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे इथे आवर्जून सांगावेसे वाटते. कारण हे सगळे घटक अक्षय राहिले तरच अक्षय्य तृतीयेला अर्थ आहे. अन्यथा सगळेच निरर्थक होईल.

**डॉ. तारा भवाळकर**
लेखिका ज्येष्ठ अभ्यासक आहेत

# अक्षय राहाव्यात सत्प्रवृत्ती

आपल्याकडे साडेतीन मुहूर्त अत्यंत शुभ मानले जातात. 'अक्षय्य तृतीया' हा त्यापैकी एक. या दिवशी कोणतेही चांगले काम करण्याचा प्रारंभ करावा, असे म्हटले जाते. असे विशेष महत्त्व असल्यामुळेच या दिवशी लग्न, मुंज वा खास पूजा केल्या जातात. थोडक्यात, या दिवशी एखादे चांगले कृत्य घडावे अशी आपली इच्छा असते. अक्षय म्हणजे ज्याला क्षय नाही असा... या अर्थाने अक्षय सुख मिळावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. कोणालाच दु:ख नको असते. म्हणूनच अक्षय सुखाची कामना करत हा दिवस साजरा होतो. मात्र, स्वत:साठीच नव्हे तर प्रत्येकासाठी ही कामना करावी, असे म्हणावेसे वाटते. हा केवळ आपल्यापुरते पाहण्याचा काळ नाही, याची जाणीव प्रत्येकाने ठेवायला हवी.

***सर्वांसी सुख लाभावे, जशी आरोग्यसंपदा***
***कल्याण व्हावे सर्वांचे, कोणी दु:खी असू नये***

असे आपल्याला शाळेत शिकवले गेले आहे. डबा खाण्यापूर्वी सर्वांनी एकत्र म्हणायची ही प्रार्थना होती. आमच्याच नव्हे, तर सगळ्यांनीच ही वा या अर्थाची प्रार्थना म्हटली असेल.

***सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः ।***
***सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखभाग्भवेत्।***

असेही आपण म्हणतो. ज्ञानेश्वरांनीही 'सुखिया झाला...' असे म्हटले आहे. अशा प्रकारे सर्व चांगल्या गोष्टी अक्षय राहण्याची कामना करणारी अक्षय्य तृतीया आहे. तिचे महत्त्व जाणून या दिवशी सगळ्यांनीच चांगली कामे करण्याचा संकल्प करणे गरजेचे आहे. समाजहिताची, समाजस्वास्थ्याची, समाजकल्याणाची कामे करणे ही आजची सगळ्यात मोठी गरज आहे. आजही जातिभेद नष्ट होण्याचा विषय ऐरणीवर येणे गरजेचे आहे. त्यासाठी सगळ्यांनी एकत्र येत प्रयत्न करू या. हा कनिष्ठ, तो उच्च हा भेद आता तरी संपायला हवा. नाही म्हणायला आता तो कमी होतो आहे. पूर्वीपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर वा त्यांच्यासारख्या समाजसुधारकांनी त्यासाठी अथक प्रयत्न केले. पण हा भेद अद्याप समूळ नष्ट झालेला नाही, ही खंत आहे. गावागावांमध्ये अजूनही जातिभेदाला प्रोत्साहन देणाऱ्या, भेदाभेदाची मुळे जपणाऱ्या घटना वा कृती आपण पाहतो. एखाद्याला वरून पाणी देणे, तांब्याला स्पर्श न करू देणे असे प्रकार पाहायला मिळतात. ते नक्कीच खुपणारे आहे. त्यामुळे यंदाची अक्षय्य तृतीया साजरी करताना हा भेदाभेद नष्ट करण्याच्या चांगल्या कामाला आपल्या सोसायटीपासूनच सुरुवात करायला हवी. सोसायटीतील सदस्यांनी कथित खालच्या व्यक्तीला पाणी दिले, आपण घरी खातो ते खायला दिले, घरात प्रवेश दिला तर बघता बघता भेदाच्या भिंती गळून पडतील. माझ्याबद्दल बोलायचे तर, सोसायटीतील गुरख्याला आमच्याकडे मुक्त प्रवेश असतो. सुरुवातीला त्याला विशेष वाटायचे. मात्र, मला वा मुलींना हे खूप स्वाभाविक वाटायचे. या संस्कारातच मी मुलींना तसेच विद्यार्थ्यांना घडवले. त्यामुळेच मुलींच्याही घरात आता कोणतेही भेदभाव पाळले जात नाहीत.

सध्या विविधांगाने दु:ख आयुष्यात प्रवेश करतात. ती टाळण्यासाठी आधी आदर्श समाज घडणे गरजेचे आहे. ते साधण्यासाठी बरेच उपाय योजता येतील. उदाहरणार्थ एक सुस्थापित, आपल्या गरजा व्यवस्थित भागवू शकणारे कुटुंब एखादे गरीब कुटुंब नक्कीच दत्तक घेऊ शकते. माझ्या मते, ही सध्याच्या भारतातील सर्वोत्तम परिस्थिती होईल. सधन कुटुंबाने एखाद्या गरजू कुटुंबाचा भार घेतला तर बघता बघता अनेक प्रश्न निकामी निघतील. शेवटी दातृत्व सगळ्यांमध्ये नसते. खरे तर अनेकांची आपल्यापुरते बघण्याचीच वृत्ती असते. मात्र, ती सोडली वा कधी तरी ती सोडण्याची सक्ती केली तर समाज निश्चितच एका वेगळ्या वळणावरून प्रवास करू लागेल.

पूर्वी अनेक घरांनी असे आदर्श घालून दिले आहेत. काळाच्या पुढे चालणारी वा स्वत:आधी समाजाचा विचार करणारी अशी अनेक घरे मी पाहिली आहेत. कित्येक घरांमध्ये आधी घरात काम करणाऱ्या सेवकवर्गाला आधी पोशाख केला जात असे आणि त्यानंतर घरातील मुलांसाठी खरेदी होत असे. या संस्कारांमधून समोर आलेले लोक आजही हे संस्कार निगुतीने जपतात. कारण ते चिरंजीवी असतात. आपल्या आईवडिलांना असे वागताना पाहणारी मुले पुढील आयुष्यात त्याच संस्कार आणि शिकवणीची धुरा वाहतात. म्हणूनच आजच्या पालकांनी मुलांवर असेच संस्कार करणे गरजेचे आहे. एकीकडे सद्भावना अक्षय्य राहायला हव्यात तर दुसरीकडे गुलामगिरीच्या मानसिकतेचा क्षय व्हायला हवा. बायकांकडे बघण्याच्या वाईट दृष्टीचा क्षय व्हायला हवा. सगळी संपत्ती आपल्याकडेच हवी, या मतलबी वृत्तीचा क्षय व्हायला हवा. एखाद्याकडे वाटण्याची क्षमता नसली तर ती येनकेनप्रकारेण आणायला हवी, असे वाटते.

एकीकडे हा संपूर्ण उत्सव सामाजिक अंगाने महत्त्वाचा असतो तर दुसरीकडे उन्हाळा सुसह्य करण्यासाठी तसंच निसर्ग संवर्धनासाठीही महत्त्वपूर्ण असा असतो. पाणवठे हे सृष्टीमधील प्राणकेंद्र आहेत. पाण्याशिवाय जीवन शक्य नाही, सजीवांचं अस्तित्व शक्य नाही. म्हणूनच या दिवशी कुंभामध्ये जल घालून त्याची पूजा करतात आणि हे पाणी सगळ्यांनी प्यायचं आहे, अशी सामुदायिक भावना निर्माण करतात. याचा सरळ अर्थ म्हणजे पाण्यावर आधी सृष्टीतील सर्व प्राण्यांचा हक्क असून त्यानंतर माणसाचा हक्क आहे. आपण नेहमी वाचतो अथवा पाहतो की, जंगलातले प्राणी मानवी वसाहतींकडे येऊ पाहात आहेत. कारण पाणवठे उजाड झाले आहेत. असे असताना प्राण्यांची तहान कशी भागणार, हा साधा प्रश्न आहे. आजही गावागावांत अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सामुदायिक पाणपोया घातल्या जातात. पहिला पाऊस पडेपर्यंत पाणपोया सुरू ठेवायच्या असतात. सगळ्या लोकांना पाणी मिळायला हवे. यात्रेकरू, वाटसरूंना पाणी मिळावे ही त्यामागील भावना असते. ठरावीक लोक पाणी पुरवण्याची जबाबदारी घेतात. पाण्याच्या स्वच्छतेची काळजी घेतली जाते. कारण पाणी हे जीवन आहे तसेच तो सृष्टीमध्ये नवरस निर्माण करणारा घटक आहे. म्हणूनच शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याची दक्षता घेतली गेली तर आरोग्याचा प्रश्न सुटेल. पर्यावरण संतुलन साधले जाईल. लोकांना पाण्याची किंमत कळेल. अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने हाती घेतले जाणारे असे सगळे उपक्रम उपयुक्त ठरतील.

पाण्याबरोबरच सृष्टीची पूजा करताना आंबा या फळाचा नैवेद्य दाखवण्याची प्रथा आहे. आंब्याला 'अमृतवृक्ष' म्हणतात. हे केवळ रसापुरते फळ नाही तर तो तपश्चर्येचा वृक्ष आहे. ज्ञानाच्या संवादाचा वृक्ष आहे. पूर्वीच्या गुरुकुलातल्या चर्चा याच आम्रवृक्षाखाली होत असत. आजही मंगल कार्यात आंब्याच्या डहाळीचे प्रथम पूजन होते. आंब्याचे तोरण बांधल्याशिवाय मंगल कार्य पुढे जात नाही. या साऱ्या गोष्टीचा अर्थ एकच. आपण ज्या झाडाची फळे खातो ते आपण हयातीत लावलेच पाहिजे. पूर्वी गुरुकुलात हा नियमच होता. झाड लावल्याशिवाय तुम्हाला फळ खायचा अधिकार नाही, असे मानले जात असे. ही भावना आपल्या जगण्यातही महत्त्वाची आहे. या दिवशीचा नैवेद्य सामुदायिक असतो. तो प्रसाद म्हणून सगळ्यांना द्यायचा असतो. सृष्टीच्या पूजेला सगळ्यांना बोलवायचे असते. या सगळ्या प्रथा-परंपरांमधून आपण व्यापक होण्याचा संदेश मिळतो. संकुचितपणा नाहीसा करणे आणि व्यापक मनाने वर्तमानाला सामोरं जाणं म्हणजे अक्षय्य तृतीया होय.

थोडक्यात, नकारात्मक गोष्टींचा त्याग करून सगळ्यांना उदात्त प्रेरणेने घेऊन पुढे जाणे म्हणजे ही तृतीया साजरी करणे. 'मी माझ्यापुरते' न पाहता हा 'मी' 'आम्ही' कसा होईल, याचा विचार या दिवशी करायचा असतो. अक्षय्य तृतीया हा चैत्र गौरीच्या हळदी-कुंकूवाच्या समाप्तीचा दिवस असतो. चैत्र शुद्ध तृतीया ते वैशाख शुद्ध तृतीया या काळात चैत्रगौरीचे हळदी-कुंकू केले जाते. यालाही एक विशिष्ट सामाजिक हेतू आहे. सर्व थरातल्या स्त्रियांनी एकत्र यावे, विचारांची देवाणघेवाण व्हावी, स्त्रियांना ज्ञानसंपन्न करावे यासाठी गौरीचे पूजन करतात. गौरी म्हणजे पार्वती आणि गौरी म्हणजेच लक्ष्मी. पार्वतीमध्ये तप आहे तर लक्ष्मीमध्ये ऐश्वर्य आहे. या दोन मूल्यांशिवाय माणसाचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होत नाही, हेच यातून सुचवायचे आहे.

अक्षय्य तृतीयेच्या सणाच्या निमित्ताने मानवी जीवनाचा प्रवास तपातून झाला पाहिजे आणि त्या तपाला ऐश्वर्याची फळे लागली पाहिजेत, हा विचार दिसतो. म्हणूनच या मुहूर्तावर सोने खरेदी करतात. या मुहूर्तावर सोने खरेदी शुभ समजली जाते. अर्थात सोने खरेदी करणे म्हणजे प्रत्यक्ष दुकानात जाऊन सोने खरेदी करणे असा अर्थ नाही तर कष्टातून आपले ऐश्वर्य वाढवण्यालाही जीवनाचे सोने करणे म्हणतात. आपल्याला साध्य करायचे आहे ते मनापासून करत, सतत सकारात्मक वृत्तीने पुढे जाणे हा अक्षय्य तृतीयेचा खरा ठेवा आहे. ही भावना जाणून घेतली तरच आपल्याला या सणाचे महत्त्व सहज लक्षात येईल.

**डॉ. विजया वाड**
ज्येष्ठ लेखिका

# रविवारची पत्रे

## शिक्षण क्षेत्राचे बाजारीकरण

इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या शुल्कात भरमसाट वाढ झाली आहे. नर्सरी ते दहावीपर्यंतच्या शिकवणी शुल्कासह पाठ्यपुस्तके, गणवेश व इतर शैक्षणिक साहित्यांचा खर्च लाखोंच्या घरात पोहोचला आहे. शासकीय शाळांमध्ये शिक्षण व इतर सोयी-सुविधा मिळत नसल्याने पाल्यांना शिकवावे तरी कसे, अशी चिंता पालकांकडून व्यक्त केली जात आहे. इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळा विनाअनुदानित किंवा स्वयंअर्थसहाय्यता तत्त्वावर चालविल्या जातात. त्यामुळे वार्षिक होणारा खर्च विद्यार्थ्यांकडून वसूल केला जातो. बहुतेक शाळांचे शुल्क पाहिल्यास त्या नफा कमावण्याच्या उद्देशानेच सुरू झाल्या असल्याचे स्पष्ट जाणवते. इंग्रजी माध्यमांची शाळा सुरू करणे हा व्यवसाय झाल्याचे मानले जाते. शिकवणी शुल्काच्या नावाखाली घेण्यात येणाऱ्या अंदाजे खर्चात अशी वाढ झाली आहे- नर्सरी ४० हजार, केजी १- ३७ हजार, केजी २ ते पहिली ४५ हजार, चौथी ते पाचवी ५५ हजार, सहावी-सातवी ६५ हजार, आठवी-नववी ७५ हजार तर दहावीचे शिकवणी शुल्क ८५ हजारापर्यंत पोहोचले आहे. नर्सरी पासून दहावीपर्यंतचे शिक्षण शुल्क, पाठ्यपुस्तके, गणवेश व इतर साहित्य असा चार ते पाच लाखांपर्यंत खर्च एका पाल्यावर होत आहे. १३ वर्षांत पालकांना लाखो रुपये शुल्क भरावे लागत असल्याचे निदर्शनास येते. प्रत्येकच पालकाला एवढी मोठी रक्कम जमविणे शक्य नसल्याने व सरकारी शाळा बंद होत असल्याने मुलांना शिकवावे तरी कसे? या विवंचनेत पालक आहेत. दर्जेदार शिक्षणाच्या नावाखाली शिक्षण क्षेत्रात चांगलीच चमकोगिरी वाढली असून या मृगजळाच्या मागे धावत असताना सर्वसामान्य पालकांची आर्थिक ओढाताण होत आहे. समाजाचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर शिक्षण हे महत्त्वाचे आहे आणि त्यातून भारतात शाळा सुरू झाल्या. त्यानंतर हळूहळू ग्रामीण भागांतही शिक्षणाची सुरुवात झाली. गावातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले. विशेष म्हणजे, त्या काळात जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेऊन अनेकांनी उच्च पदावर जाऊन नावलौकिक मिळविले. परंतु, मागील २० ते २५ वर्षांपासून पवित्र अशा शिक्षण क्षेत्राचे व्यापारीकरण सुरू झाले. त्यामुळेच शिक्षण म्हणजे पैसा आणि पैसा म्हणजे शिक्षण हे समीकरण रूढ झाले. टक्केवारीचा बागुलबुवा उभा केला गेला आणि यातूनच शाळेच्या आकर्षक इमारती, विविध अभ्यासक्रम निर्माण केले गेले. अत्याधुनिक साधने, आकर्षक पृष्ठे असलेली पुस्तके, महागडा गणवेश, वर्षभर सर्वांगीण विकासाच्या नावावर सुरू असलेले उपक्रम, त्यात होणारी लाखो रुपयांची उलाढाल यामुळे सामान्य पालक हैराण झाले आहे. परंतु, हे सर्व करूनही आज शिक्षणाचा दर्जा सुधारला आहे काय? हा संशोधनाचा विषय आहे. आज दोन ते तीन किलो वजनाचे दप्तर घेऊन जाणारा 'येस', 'नो मॅम', 'हाय', 'गुड मॉर्निंग' म्हणणारा विद्यार्थी कुठे जात आहे? याचा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. दुसरीकडे उच्चवर्गीय पालक आपले स्टेटस सांभाळण्यासाठी पाल्यांना मोठमोठ्या महागड्या शाळेत पाठवून लाखो रुपये खर्च करीत आहेत.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

## कामगार विमा; एक जीवनदायी योजना

आपल्या भारत देशात संघटित क्षेत्रातील कामगारांसाठी राज्य कामगार विमा योजना आणि त्याचे लाभ हा एक मोठा महत्त्व असणारा विषय आहे. कारखान्यात काम करणारे, नोकरी करणारे, एखाद्या संस्थेमध्ये किंवा निमशासकीय किंवा खाजगी व्यवसायात काम करणारे लोक यांचा समावेश आपल्याला कामगाराच्या व्याख्येत करता येईल. ही कामगार मंडळी देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये परिश्रमाने उत्पादनाच्या आणि उत्पन्नाच्या रूपाने आपले योगदान देत असतात. कारखान्यात किंवा संस्थेमध्ये काम काम करताना बऱ्याचदा जिवावर उदार होऊन कामगारांना काम करावे लागते.



कामगारांच्या जिवाला काही इजा झाली, धोका संभवला, तर तो त्याचा उपचार कसा करणार? उपचाराचा खर्च कोण वहन करणार? कारखानदार तर केवळ नफा कमाविण्यावर भर देत असतात. तसेच कारखान्यात काम करीत असताना त्याला त्याच व्यवसायाशी निगडित असलेला जर कुठला आजार जडला तर त्याने आपला स्वतःचा उपचार कोठे करावा? म्हणून आपल्या देशात कामगाराच्या हिताचे कायदे करण्यात आले. त्यात राज्य कामगार विमा योजना या मोठ्या योजनेचा समावेश होता. कामगारांचे हित जोपासणे त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, कामगारांच्या परिवारालासुद्धा या योजनेचा पूर्ण लाभ मिळावा, म्हणून विशेष तरतुदी केलेल्या आहेत. महिला कामगारांसाठी बाळंतपणाची सुटी आणि बाळंतपण करण्यासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा पुरवणे तसेच जन्मलेल्या बाळाच्या लसीकरणापासून तर तो समजदार होईपर्यंत त्याच्या आरोग्याची काळजी राज्य कामगार विमा योजना अंतर्गत असलेले सेवा दवाखाने घेत असतात. 'कामगार राज्य विमा अधिनियम १९४८' या कायद्याचा व्यापक विचार एका अशा सामाजिक विमा योजना स्वीकारल्या जाण्यासंदर्भात होत्या; ज्यात आजार, प्रसूती, स्थायी-अस्थायी शारीरिक अपंगत्व आणि ज्यामुळे मजुराच्या मजुरीची हानी आणि कौशल्य क्षमतेचा नाश तसेच नोकरीवर दुर्घटनेमुळे मृत्यू आणि यासारख्या आकस्मिक दुर्घटनांपासून कामगारांना सुरक्षा प्रदान करेल. हाच अधिनियम कामगार आणि त्याच्या कुटुंबीयांच्या योग्य आणि चांगल्या उपचाराची जबाबदारी स्वीकारतो. कामगारांच्या वेतनातून अल्प राशी मासिक अंशदान म्हणून कापण्यात येते आणि कारखानदार सामाजिक सुरक्षेसाठी म्हणून या कामगारांसाठी एक राशी जमा करीत असतात. जमा होणाऱ्या याच एकत्रित रकमेतून राज्य कामगार विमा योजनेचे सर्व लाभ विमेदारांना पुरविले जातात. आज देशभर जवळपास सर्व राज्यांमध्ये राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आणि सेवा दवाखाने आहेत. अगदी साध्या सर्दी-तापापासून तर जीर्ण आणि दुर्धर आजारापर्यंत सर्व प्रकारांचे उपचार कोणतेही नवीन शुल्क न आकारता करण्यात येतात. भारतीय कामगारांसाठी राज्य कामगार विमा योजना ही सरकारी योजना एक जीवनदायी योजना आहे, असेच म्हणावे लागेल.

**डॉ. हर्षवर्धन कांबळे**/९८२२५९३७५७

## टी-२० विश्वचषकासाठी पराभूत मुंबई संघातील चार खेळाडू

अमेरिका व वेस्ट इंडीजमध्ये खेळल्या जाणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने तात्पुरता भारतीय संघ जाहीर केला आहे. अंतिम संघ सादर करण्याची अंतिम मुदत २५ मे आहे; त्यामुळे या संघात बदल होऊ शकतो. विश्वचषकासाठीचा भारतीय संघ असा : रोहित शर्मा (कर्णधार), हार्दिक पांड्या (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत (यष्टिरक्षक), संजू सॅमसन (यष्टिरक्षक), शिवम दुबे, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, यझुवेंद चहल, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शिराज. राखीव खेळाडू : शुभमन गिल, रिंकू सिंग, खलील अहमद व आवेश खान. भारतात आयपीएल २०२४ चे टी-२० क्रिकेट सामने सुरू आहेत. या सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्सचा नुकताच आठवा पराभव झालेला आहे. या मुंबई इंडियन्स संघातील रोहित शर्मा, हार्दिक पांड्या, सूर्यकुमार यादव व जसप्रीत बुमराह या चार खेळाडूंची होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेमध्ये निवड झाली आहे. लखनौ येथे झालेल्या लखनौ विरुद्ध मुंबई इंडियन्स या टी-२० सामन्यात रोहित शर्मा (४), सूर्यकुमार यादव (१०), हार्दिक पांड्या (०) अशा धावा काढून बाद झाले आहेत तसेच जसप्रीत बुमराहचा पण फलंदाजी व गोलंदाजीत प्रभाव नव्हता. भारतीय संघाचा अनुभवी कर्णधार रोहित शर्मा याला मुंबई इंडियन्स संघात कर्णधार न करता हार्दिक पांड्याला कर्णधार कसे केले, हे अनाकलनीय आहे. कदाचित या कारणाने तर मुंबई इंडियन्स संघ आयपीएलच्या गुणतालिकेत दहापैकी नवव्या स्थानावर आहे. सध्या सुरू असलेल्या आयपीएल टी-२० सामन्यांमध्ये गोलंदाजांपेक्षा फलंदाजांना जास्त वाव असल्याचे दिसते. सर्व फलंदाज चौकार किंवा षटकार मारण्याच्या प्रयत्नात असतात. षटकार मारताना तो कधी षटकार होतो तर कधी चौकार! थोडक्यात चेंडू उंच मारण्याकडे सर्व फलंदाजांचा कल दिसतो. त्यातही जे अ भारतीय खेळाडू आहेत त्यांचे षटकार बरोबर बॉण्ड्री लाईनच्या बाहेर पडतात. भारतीय फलंदाजांना लवकरात लवकर षटकार व चौकार मारून सामन्यात जास्तीत जास्त धावा करण्याचा मोह आवरता येत नसल्याचे दिसते. हे रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव व हार्दिक पांड्या यांच्या फलंदाजीवरून स्पष्ट दिसून आले. टी-२० सामन्यांमध्ये फलंदाजाने सुरुवातीला दोन-तीन षटके शांतपणे, संयमाने, कौशल्याने व जबाबदारीने खेळणे आवश्यक आहे. नंतर चेंडूवर नजर पक्की झाल्यानंतर चौकार अथवा षटकार मारण्यास हरकत नाही. सध्या सुरू असलेले आयपीएलचे सामने हे पुढे होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेसाठी निवड चाचणी आहे, असे समजावे. या आयपीएल सामन्यांमध्ये जे खेळाडू उत्तम कामगिरी करतील, त्यांची निवड व्हावी, असे वाटते. सध्याच्या डिजिटल सोयीमुळे प्रत्येक खेळाडूच्या कामगिरीचा अहवाल आपल्याजवळ उपलब्ध आहे. अंतिम निवड यादीमध्ये कोणतेही राजकारण, आरक्षण अथवा अवैध प्रकार होता कामा नये तरच विश्वचषक स्पर्धेमध्ये भारत विश्व विजेता होऊ शकतो.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## मतदाराची कर्तव्ये

दैनिक तरुण भारतच्या २८ एप्रिल 'रविवारची पत्रे' या सदरात आलेल्या अनंत मधुकर मुंजे यांचे 'राजकीय पक्षांचाही जबाबदारी आहेच' विचार वाचले. त्यांचे मत समर्पक वाटले. सरकारी यंत्रणा आणि राजकीय पक्षांसोबतच मतदाराचे पण काही कर्तव्य आहेत, ते त्यानेही पाळलेच



पाहिजे. कुठल्याही निवडणूक प्रक्रियेची सुरुवात लोकसभा, विधानसभा निवडणूक जाहीर झाल्याबरोबरच सुरू होते. जसे निवडणूक आयोगाकडून मतदार याद्या अद्ययावत करणे, त्या प्रकाशित करणे, मतदारांना आवाहन करणे आणि फायनल मतदार याद्या जाहीर करून प्रकाशित करणे. या सर्व प्रक्रियेत तीन-चार महिन्यांचा कालावधी नक्कीच लागतो. मतदात्याचे हे कर्तव्यच आहे की, फायनल मतदार याद्या जाहीर झाल्याबरोबर त्याने आपले व आपल्या परिवाराचे नाव मतदार यादीत आहे की नाही हे, तपासून घ्यायला हवे. निवडणूक आयोगाने या याद्या त्यांच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिलेल्या असतात व सांप्रत सर्व नागरिक स्मार्ट फोन वापरतात. केव्हाही, कधीही आणि कुठेही याद्या तपासता येतात. ज्यांच्या जवळ स्मार्टफोन नसतील त्यांनी आपल्या पसंतीच्या राजकीय पक्षाच्या कार्यालयात संपर्क साधून आपले व आपल्या परिवाराचे नाव कुठल्या यादीत आहे, हे सुनिश्चित करून घ्यायला हरकत नाही. मतदाराच्या घरातील एखादा सदस्य जर मतदानाच्या दिवशी त्या तारखेला मतदानासाठी काही कारणास्तव उपस्थित राहू शकणार नसेल तर त्यासाठी निवडणूक आयोगाने काय सोयी केलेल्या आहेत त्या सोयींचा लाभ अवश्य घ्यावा. जसे वैयक्तिक कारणाने अथवा सरकारी कामाने जर त्यादिवशी गावाबाहेर राहणे अपरिहार्य असेल तर पोस्टल बॅलट अथवा ऑनलाईन मतदान करण्यासाठी निवडणूक आयोगाने दिलेले फार्म ६, फार्म ७ भरून घ्यावे. मतदाराचे हे कर्तव्यच आहे की, मतदानाच्या तारखेच्या सात दिवस आधीच त्याने हे सुनिश्चित करून घ्यायला हवे की त्याच्या घरी असणारा एखादा दिव्यांग वा वरिष्ठ नागरिक; जो मतदानासाठी मतदान केंद्रापर्यंत जाऊ शकत नसेल, अशांसाठी निवडणूक आयोगाने दिलेल्या नियम व सोयींचा लाभ घ्यावा. मतदान जसा हक्क आहे तसेच मतदाराचे हे कर्तव्य पण आहे. आपले व आपल्या परिवाराचे एकही मत वाया जाणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावयाची आहे.

**शेखर दारव्हेकर**/९५६१२०२०८४

## मुनिवर्य दधिची ऋषींचे देहदान, अवयवदान!

महापुण्याचे कर्म देहदान व अवयवदान या मानवी शरीराच्या संबंधित श्रेष्ठदान संकल्पांसंबंधी 'पुराण' या धार्मिक, पौराणिक ग्रंथातील साहित्यात उल्लेख आढळतो. त्यात देव आणि दानव (राक्षस) हे एकमेकांच्या अस्तित्वासाठी क्रियाशील होते व त्यांच्यात चढाओढ लागून होती. त्यांच्यात आपापसात युद्ध होत असत; ज्यात देवांचा पराजय निश्चित होता. राक्षसांचे अधिपती वृत्रासुराचे विभिन्न स्तरांवरील अत्याचार वाढत होते. देवांमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली होती. यातून मुक्ती मिळावी म्हणून त्यांनी विभिन्न स्तरावर प्रयत्न करून पाहिला, परंतु ते अपयशी ठरले. त्यांनी इंद्रदेवाकडे धाव घेतली. देवेंद्रही काळजीत पडले. संकटातून मुक्ती पाहिजे असेल तर वृत्रासुराचे अस्तित्व नष्ट करणे हाच एकमेव मार्ग होय. योग मुनिवर्य दधिची ऋषींच्या पाठीच्या मणक्यांद्वारा निर्मित वज्र व इतर विभिन्न अस्थींपासून अस्त्रांची निर्मिती करून वृत्रासुराचा वध होऊ शकतो, हेच त्याच्या मरणाचे रहस्य असल्याचे कळल्यावर इंद्रदेवांनी दधिची ऋषींचा शोध घेण्याची सर्व देवांना आज्ञा केली. सर्व देव शोधकामी लागले. अविरत प्रयत्नांपश्चात त्यांच्या शोधमोहिमेची इतिश्री झाली. दधिची ऋषी एका वृक्षाच्या छायेत दृढ तपश्चर्येत मग्न होते. त्यांनी नेत्र उघडून समोर पाहिले तर तेथे एवढ्या मोठ्या संख्येत हात जोडलेल्या सर्व देवांची उपस्थिती पाहून ते अचंबित झाले. येण्याचे प्रयोजन विचारले. देवतांनी येण्याच्या कारणाचे स्पष्टीकरण केले. प्रस्तुत मागणी एका चांगल्या कारणास्तव असल्यामुळे व त्याद्वारे सर्व देवतांना एका महान संकटातून मुक्ती प्राप्त होणार असल्यामुळे दधिची ऋषींनी प्रस्तुत मागणीला समर्थन दिले. मात्र एक मोठी समस्या निर्माण झाली; ती म्हणजे जीवित अवस्थेत त्यांच्या पाठीचा मणका, कणा व इतर अस्थी वज्र व इतर अस्त्र निर्मितीसाठी त्यांचा देह कसा काय दान करणार? त्यासाठी त्यांचा श्वासोच्छश्वास खंडित करणे अपरिहार्य होते. म्हणजेच 'मरणोत्तर देहदान' हाच एकमेव पर्याय. ही बाब ध्यानात येताच दधिची ऋषींनी योगाद्वारे श्वासोच्छश्वास खंडित करून देहत्याग केला. म्हणजेच त्यांनी देवतांना स्वत:चे देह दान केले.

प्रस्तुत पार्थिवातील मणका व इतर आवश्यक अस्थी विभक्त करून त्यांच्या माध्यमातून गांडीव, पिनाक, सारंग इ. अस्त्रे तयार केली गेली. दधिची ऋषींनी त्यांच्या अस्थींच्या रूपात अवयवदान केले. प्रस्तुत निर्मित अस्त्रांद्वारे देवादिकांनी वृत्रासुरादी दानवांशी युद्ध करून त्यांचा विनाश केला. तसेच कर्णाने त्याची कवच कुंडले काढून दिल्यास त्याच्यावर मृत्यू ओढवणार हे माहीत असूनदेखील कर्णाने स्वत:ची कवच कुंडले दान करून मृत्यू गाठला. बुद्धिदेवता श्रीगजाननाने गजराजाचे मस्तक धारण करणे हेदेखिल अवयवदानातील प्रत्यारोपणाचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. पुराणात उल्लेखित मुनिवर्य दधिची ऋषींचे देहदान व अवयवदान हे अखिल विश्वातील पहिले ज्ञात महान दानकर्म होय!

**रमेश सातपुते**/९४२१७०५३८१

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No 46878/87

# मोदींना पंतप्रधान, दानवेंना मंत्री करणे हेच आमचे ध्येय -अर्जुनराव खोतकर

# महायुतीची गोलापांगरीत विराट जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**

राजकारणात सत्य, चांगुलपणा महत्त्वाचा असून तो ना. रावसाहेब दानवे व आपण स्वतः जपला आहे. आमच्यात मतभेद होतात काही गोष्टी पटत नसल्या म्हणजे फारकत घेतली असे होत नाही, कुठे थांबायचं हे आम्हाला कळतं. संबंध जपणे आणि सांभाळणे हीच भूमिका आपण घेत आलो आहोत असे स्पष्ट करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान तर ना.रावसाहेब पाटील दानवे यांना केंद्रात कॅबिनेट मंत्री करणे हेच आमचे ध्येय असल्याचे शिवसेना उपनेते ,माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी आज जाहीर सभेत बोलताना सांगितले.

जालना लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार ना.रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रचारार्थ गोलापांगरी ता .जालना येथे रविवारी ( ता. ०५) विराट जाहीर सभा संपन्न झाली. यावेळी महायुतीचे उमेदवार ना.रावसाहेब पाटील दानवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ.अरविंदराव चव्हाण, रिपाइंचे मराठवाडा अध्यक्ष ड. ब्रह्मानंद चव्हाण, भास्करराव पाटील दानवे, पंडितराव भुतेकर ,रामेश्वर भांदरगे, बाबा मोरे, डॉ.ज्ञानेश्वर मोरे, राहुल गवारे, रवींद्र ढगे,कालींदा ढगे, शैलेश घुमारे, सिद्धिविनायक मुळे, अतिक खान, भागवत बावणे, मेघराज चौधरी, माऊली देवडे, बाबुराव खरात,सर्जेराव जाधव, नानासाहेब देवडे, दत्तू बागल, उद्धव कावळे ,गणेश कावळे, ज्ञानेश्वर देवडे, वसंतराव शिंदे ,संतोष ढेंगळे, पद्माकर हांडे ,मुकेश चव्हाण, सतीश वाहुळे, सुदर्शन देवडे ,प्रल्हाद खेडेकर, कैलास उबाळे, सुधाकर शिंदे, किशोर पाखरे, मधुकर बोबडे,सिद्धेश्वर जऱ्हाड ,शुभम टेकाळे, दीपक वैद्य, बद्रीनाथ जऱ्हाड ,आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी जालना जिल्ह्यात झपाट्याने झालेल्या विकासात ना.रावसाहेब दानवे यांचा सिंहाचा वाटा आहे ,असे नमूद करत आपल्या एका मतामुळे ते केंद्रात मंत्री होतील याचा विचार करून जनतेने कमळावर मतदान करावे असे आवाहन खोतकर यांनी केले. गोलापांगरी परिसरात महायुती सरकारने केलेल्या विकास कामांचा सखोल आढावा मांडून अमित शहा यांच्या सभेचे निमंत्रण खोतकर यांनी उपस्थितांना दिले.

ड. ब्रह्मानंद चव्हाण यावेळी म्हणाले, विरोधक डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊन भाजप सरकार सत्तेवर आल्यानंतर राज्यघटना बदलली जाईल अशी भीती दाखवत आहेत. वास्तविक संविधानाची शपथ घेणारे नरेंद्र मोदी हे पहिले पंतप्रधान असून निवडून आल्यावर वर्षभर संविधानावर चर्चा करणार असल्याचे मोदींनी जाहीर केले. विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता कमळ निशाणी समोर जोरात बटन दाबा असे आवाहन ड.चव्हाण यांनी केले.



यावेळी अरविंद मोरे , मुकेश चव्हाण, उमेश मोहिते ,मधुकर बोबडे, सतीश वाहुळे, ड.उषा राठोड, संतोष डेंगळे आदींची समायोजित भाषणे झाली.

सूत्रसंचालन ज्ञानेश्वर देवडे यांनी केले तर बाबा मोरे यांनी आभार मानले. सभेस रामेश्वर देवडे,अनिल सरकटे, नरहरी मोरे, मदन गवारे, योगेश चिरखे, कैलास चिरखे, भगवान इंगळे, रामप्रसाद हिवरे, कृष्णा जिगे, अंकुश पडूळ ,जगनराव कावळे, शंकर मोरे, कृष्णा बागल, दिपकराव कावळे, वाल्मीक देवडे, महेश ढवळे ,अशोक वाघ यांच्यासह पंचक्रोशीतील महिला, महायुतीचे पदाधिकारी ,शेतकरी व तरुणांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. जालना जिल्ह्यात रस्ते, वीज, पाणीपुरवठा, सिंचन अशा पायाभूत सुविधांसाठी आपण केंद्रांकडून हजारो कोटींचा निधी खेचून आणत विकास कामे करून दाखवली. आय.सी.टी .ड्रायपोर्ट सारख्या महत्त्वाकांशी प्रकल्पांमुळे जालन्याचे नाव देश आणि जगाच्या नकाशावर आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले असून नेता आणि निती नसलेले विरोधक विकासावर निवडणूक लढवण्यास तयार नाहीत, केवळ माझ्यावर टीका करूनच जनतेची दिशाभूल करत आहेत .त्यांनी टीका करण्यापेक्षा विकासाच्या मुद्द्यावर बोलावं आपण कमी पडलो तर जाहीर सभेत उठबशा मारू असे खुले आव्हान केंद्रीय मंत्री ना.पाटील दानवे यांनी आज विरोधकांना दिले. काँग्रेसच्या राजवटीत आघाडी सरकारमुळे देशात पसरलेल्या अस्थिरतेच्या उदाहरणांसह खरपूस समाचार घेत ना. दानवे यांनी भाजप महायुतीकडे तिसऱ्यांदा प्रधानमंत्री होण्यासाठी नरेंद्र मोदी यांच्या रूपाने नेतृत्व आहे. या उलट काँग्रेस आघाडीकडे पंतप्रधान पदाचा उमेदवार नसून त्यासाठी स्पर्धा आहे, चेहरा नसलेला पक्ष आणि आघाडी मत मागण्यास येत आहेत असे ना. दानवे यांनी नमूद केले. तथापि आपण जालना जिल्ह्यात सहा हजार कोटींचे सिमेंट रस्ते, शहर व ग्रामीण भागात विजेची समस्या निकाली काढण्यासाठी प्रत्येक पाच कि.मी .वर एक ३३ के. व्ही.सबस्टेशन होण्या करिता केंद्राकडून पाचशे कोटींचा निधी आणला असून भविष्यात सौर उर्जेवर गावांना प्रकाश मिळण्यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत असे सांगून कमळ निशाणी समोर मतदान करून मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करावे असे आवाहन ना. दानवे यांनी केले.

## संक्षिप्त

### निवडणूक निरीक्षकांनी मतमोजणी केंद्र व स्ट्राँगरूमची केली पाहणी

### परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे दिले निर्देश



**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जालना लोकसभा मतदारासंघासाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. तर मतमोजणी ४ जून रोजी होणार आहे. या अनुषंगाने निवडणूक निरीक्षक (जनरल) शैलबाला अंजना मार्टीन यांनी शुक्रवारी (दि.३) जालना एमआयडीसी येथील मतमोजणी केंद्र व स्ट्राँगरुमची पाहणी केली. यावेळी त्यांनी विविध बाबींची तपासणी करून केलेल्या योग्य नियोजनाबद्दल जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचे कौतुक केले. मतदान यंत्र या स्ट्राँगरुममध्ये ठेवल्यानंतर परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात यावी, अशी सूचना त्यांनी केली. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, निवासी उपजिल्हाधिकारी तथा स्ट्राँग रूम नोडल ऑफिसर सोहम वायाळ, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता स्मिता पवार महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर, चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. राजपूत हे उपस्थित होते. श्रीमती मार्टीन यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे स्ट्राँगरूममध्ये सर्व व्यवस्था असल्याची पाहणी करून खात्री केली. स्ट्राँगरुम म्हणून निवड केलेला परिसर सुरक्षित करण्याचे त्यांनी सांगितले. मतमोजणी करताना कुठलीही अडचण येऊ नये यासाठी सर्वांसोबत त्यांनी चर्चा करून सर्व नियोजन व्यवस्थित करण्याची सूचना केली. सुरक्षा व्यवस्थे संदर्भात पोलीस अधिकाऱ्यांना सूचना करून पुढील कामाचे योग्य नियोजन करण्याचे निर्देश दिले. मतमोजणी केंद्रावर सुरळीत विद्युत पुरवठा, सीसीटिव्ही यंत्रणा, अग्नीशामक दल, स्वच्छतेसह इतर सर्व आवश्यक सुविधेसोबतच उन्हापासून बचावासाठी शेड व पिण्याचे पाणी या सुविधा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना दिल्या. जालना लोकसभा मतदारसंघ निवडणुकीच्या मतदानासाठी वापरण्यात आलेले ईव्हीएम, व्हीव्हीपॅट आणि इतर साहित्य एम.आय.डी.सी. येथील सरस्वती ऑटो कॉम्पोनेटस येथील स्ट्रॉंग रूममध्ये सुरक्षित ठेवण्याकरीता आणण्यात येणार आहे. या ठिकाणी ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. मतमोजणी केंद्रावरील स्ट्राँग रूम, मतमोजणी कक्ष, ईटीबीपीएस / टपाली मतपत्रिका मोजणी कक्ष, निवडणूक निरीक्षक यांचे कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कक्ष, टॅब्युलेशन कक्ष, मिडीया कक्ष, वाहन पार्किंग व्यवस्था तयार करणे व ईव्हीएम, व्हीव्हीपॅटची सुरक्षा व्यवस्था इथे करण्यात येणार असल्यामुळे याकामी असलेल्या यंत्रणेने सतर्क राहण्याचे निर्देश श्रीमती मार्टीन यांनी दिले.

### शहरात लोककलावंताच्या माध्यमातून मतदार जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

मतदाराना जालना लोकसभा होणार आहे. या अनुषंगाने मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती व्हावी यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ व उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांच्या निर्देशांनुसार व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमंत हारकर तसेच तहसीलदार श्रीमती छाया पवार, तालुका स्वीप नोडल अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी श्रीमती आसावरी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आज शुक्रवारी तहसील कार्यलयाच्या वतीने जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकात लोककलावंतांच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्यात आली. यावेळी कलाकारांनी उत्साही व आनंदी वातावरणात पथनाट्य सादर करून प्रत्येक नागरिकांने आपले अमूल्य मतदान करावे असे आवाहन करण्यात आले.

## महाविकास आघाडीचे डॉ.कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ जालन्यात रखरखत्या उन्हात पदयात्रा

### कन्हैयानगरसह परिसरातील नागरीकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**

जालना लोकसभा मतदार संघातील महाविकास (इंडीया) आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ जालना शहरातील कन्हैयानगरसह परिसरात काढण्यात आलेल्या पदयात्रेस नागरीकांचा रखरखत्या उन्हातही उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून डॉ.काळे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचा निर्धार मतदारांनी केला आहे.

कन्हैयानगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास कॉग्रेस पक्षाच्या जेष्ठ माजी नगरसेविका श्रीमती सावित्रीबाई पगारे यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून जालना शहर जिल्हा कॉग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महेमुद, शिवसेना उबाठा गटाचे शहरप्रमुख बाला परदेशी,महिला कॉग्रेसच्या जिल्हाध्यक्ष श्रीमती नंदा पवार, दिनकर घेवंदे, सपाचे नबी शिपोरकर, रायुकॉचे शहराध्यक्ष राजेंद्र जाधव, संदिप नाईकवाडे, सय्यद अजहर, माजी नगरसेविका मनकर्णाबाई डांगे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेली ही पदयात्रा कन्हैयानगर पुर्ण परिसर, लालबाग, खांडसरी, दादावाडी, हनुमान घाट या भागात काढण्यात आली. या पदयात्रे दरम्यान कॉग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जाहीर नाम्यात दिलेल्या न्यायपत्राचे घरोघरी वाटप करून कॉग्रेस पक्षाची सत्ता केंद्रात स्थापन करण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांना विजयी करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. उपरोक्त परिसरातील नागरीकांनी रखरखत्या उन्हात काढण्यात आलेल्या या पदयात्रेला उत्स्फुर्त प्रतिसाद देत महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार केला.



छाया/जावेद तंबोली

या पदयात्रेत संदिप झारखंडे, बापु साळवे, शेख शमशोद्दीन, शेख इब्राहीम, जावेद अली, सय्यद नुरजहाँ, बाबासाहेब सोनवणे, रहिम तांबोळी, शेख शफिक, इकबाल कुरेशी, शेख जमील, समीर खान, फकिरा वाघ, विभा लाखे, किशोर कदम, गुलाब खान, सुनिल लाखे, करिम बिल्डर, डॉ.सुनिल सोनवणे, संगीता कांबळे, घमेरा निकम, गणेश चांदोडे, अ.रहेमान, बेनीवाले, तौफिक खान यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## लक्ष्मीनारायण जिनिंग मध्ये शॉर्टसर्किटने लागलेल्या आगीने लाखो रुपयाच्या मशनरीचे नुकसान



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा ते जिंतूर रोडवरील लक्ष्मीनारायण जिनिंग मध्ये शॉर्टसर्किटने आग लागून लाखो रुपयांच्या मशीनरीचे नुकसान झाले आहे.या वेळी आगीचे लोळ पहावयास मिळत होते.या विषयी सविस्तर वृत्त असे की,(ता.०३) शुक्रवार रोजी लक्ष्मीनारायण जिनिंग मध्ये दुपारी अंदाजे तीन ते साडे तीनच्या दरम्यान शॉर्टसर्किटने जिनिंग काम करणाऱ्या जिनिंग कामकरणाऱ्या मशिनरीने पेट घेतला आगीत जिनिंग व प्रेसिंग मशनरी आगीत जळून भस्मसात झाली.या वेळी लागलेली आग इतकी भंकर होती की,आगी लोळचे लोड दिसून येत होते. वाढत्या उष्णतेमुळे व लागलेल्या आगी मुळे जिनिंग प्रेसिंग युनिटमध्ये धाजावण्याची कोणी ही हिंमत करत नव्हते.अश्या प्रसंगी मंठा अग्निशामक दलास प्राचार करून आग विझवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्यात आले. तरीदेखील जिनिंग मधील संपूर्ण मशिनरी व इलेक्ट्रिक वायरिंग जळाल्याने खूप मोठे नुकसान झाले आहे.काही दिवसा पूर्वीच मशनरी चे व इलेक्ट्रिकल चे काम करण्यात आले होते आता नव्याने संपूर्ण मशनरी चे काम करावे लागणार असून अंदाजे ५० लाखाचे रु वर नुकसान झाले असल्याचे जिनिंग मालक कपिल शेठ गोयल यांनी सांगितले.

## लोकसभा निवडणूक; काँग्रेस पक्षातर्फे सहा निरीक्षकांची नियुक्ती

### जालना लोकसभा मतदार संघात प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**



जालना लोकसभा निवडणुकीचे नियोजन आणि महाविकास (इंडिया) आघाडीतील पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी समन्वय साधण्यासाठी जालना लोकसभा मतदार संघात विधानसभा निहाय निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या सुचनेनुसार व पक्षाचे प्रांताध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या निर्देशावरून निरीक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.त्यात जालना विधानसभा मतदार संघासाठी आ.मोहनराव हंबर्डे यांची नियुक्ती करण्यात आली असून बदनापूर माधवराव पवार,भोकरदन आ.धिरज देशमुख,सिल्लोड तुकाराम रेंगे पाटील,फुलंब्री बाळासाहेब देशमुख,पैठण आ.सुरेश वरपुडकर यांचा समावेश आहे.विधानसभा निरीक्षकांनी संबंधित विधानसभा मतदारसंघाचा दौरा करून जिल्हाध्यक्ष,विधानसभा क्षेत्रातील प्रदेश पदाधिकारी,जिल्हा पदाधिकारी व महाविकास आघाडीचे नेते,पदाधिकारी यांची बैठक घेऊन इंडिया आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे निवडणुकीत विजयी होतील या दृष्टीने योग्य ते नियोजन करावे असे या पत्रकात प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख यांची जालना लोकसभा मतदार संघातील फुलंब्री विधानसभा क्षेत्रासाठी निरीक्षक म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष मा.श्री नाना भाऊ पटोले यांनी नियुक्ती केली आहे तसेच बाळासाहेब देशमुख यांचे सोबतच आ.धिरज देशमुख (भोकरदन), आ.तथा माजी मंत्री सुरेशराव वरपुडकर (पैठण) , माजी खासदार श्री तुकारामजी रेंगे पाटील (सिल्लोड ) आ.मोहनराव हंबर्डे (जालना) , आ.माधवराव पाटील (बदनापूर) यांचीही विधानसभा निहाय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.निरीक्षकानी संबंधित विधानसभा मतदारसंघाचा दौरा करून जिल्हा अध्यक्ष, प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी,महावीकास आघाडी चे नेते व सर्व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन इंडिया आघाडी चे उमेदवार डॉ कल्याण काळे यांच्या विजयासाठी योग्य ते नियोजन करावे असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

## टेंभुर्णी पोलिसांच्या आशीर्वादाने अवैध देशी दारूचे गल्ली बोळात विक्री सुरू

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी / विष्णु मगर**

सध्या लोकसभा निवडणुक सुरू असल्याने, दारू शौकीनांना सुगीचे दिवस आले आहेत. त्यामुळे गावा गावातील गल्ली बोळात अवैध देशी दारूचे दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली असून, बिन बोभाटा पणे अवैध देशी दारूची विक्री होताना दिसत आहे.

सविस्तर माहिती अशी की, टेंभुर्णी येथे दोन परवाना धारक देशी दारूचे दुकान आहे. या दुकानाच्या मालकडुन खुल्या आम पणे टेंभुर्णी पोलिसांच्या कृपा आशिर्वादाने प्रत्येक गावातील अवैध देशी दारूचे घरपोच माल पोचले जात आहे. विशेष म्हणजे सदरील देशी दारूचे बाक्स हे मोटारसायकल वरून पोलीसासमक्ष वाहतूक केली जात आहे. पण मात्र या सर्व गैर प्रकाराकडे टेंभुर्णी पोलिस दुर्लक्ष करीत आहेत. यावरून असे वाटते की, हप्ते वसुली सुरू असल्यानेच हे सर्व काही घडले जात आहे. सध्या निवडणूक असल्याने जागोजागी निवडणूक आयोगाकडुन चेकिंग केल्या जात

### कारवाई कडे जाणून बुजून दुर्लक्ष

आहेत. तरी पण गावा गावातील गल्ली बोळात अवैध देशी दारु मिळते कशी यांवर आचार व्यक्त केले जात आहे. कारण सध्या निवडणूक असल्याने दिवस भर गावात विविध पक्षांच्या नेत्यांकडून गावातील मतदारांना आकर्षित करण्यासाठी दारुसाठी पैसे दिले जातात. त्यामुळे त्यांना सुध्दा गावा बाहेर न जाता गावातच दारू उपलब्ध होत असल्याने , अवैध दारू विक्रीचे व्यवहार जोमात सुरू आहेत. गावातच दारू मिळत असल्याने हे दारूडे दारू पिऊन धिंगाणा घालत असल्याने यांच्यामुळे महीला वर्गाना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या सर्व प्रकाराची खुद्द पोलिस अधीक्षक बन्सल साहेब यांनी लक्ष घालून संबंधित पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी त्रस्त महिला वर्गाकडून होत आहे.

## भास्करराव दानवे यांच्या नेतृत्वात भाजपाचे घर चलो अभियान

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना लोकसभा मतदार संघातील भाजपा महायुतीचे उमेदवार ना. रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रचारार्थ जालना शहरात भारतीय जनता पक्षाने चांगलीच कंबर कसली असून जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे यांच्या नेतृत्वात प्रत्येक प्रभाग निहाय रॅली, घर चलो अभियान राबविले जात आहे.

शनिवारी ( ता. ०४) शहरातील छत्रपती शिवाजीनगर येथे जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्यास मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.भास्कर आबा दानवे यांच्या नेतृत्वात निघालेल्या रॅलीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घरो-घरी जाऊन मतदारांच्या भेटी घेऊन संवाद साधला.भास्करराव दानवे यावेळी म्हणाले, मागील १० वर्षांच्या कार्यकाळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. त्यासोबतच प्रशासकीय कारभारात पारदर्शकता आणून अनेक लोककल्याणकारी योजनांच्या माध्यमातून कोट्यवधी नागरिकांना लाभ झाला आहे. येत्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार ना. रावसाहेब पाटील दानवे यांना कमळ निशाणी समोरील बटन दाबून विक्रमी मताधिक्क्याने विजय करावे असे आवाहन भास्करराव पाटील दानवे यांनी याप्रसंगी केले. रॅलीत धनराज काबलिये, कपिल दहेकर, प्रतिक दानवे, सुनील राठी, सुभाष सले, अमोल करंजेकर, रोषण चौधरी, विकास कदम, गंभीरराव पडोळ, रोहित नलावडे, राजेश जोशी, लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष विनोद आठवे, अमन मित्तल, रोहित दिपवाल, कैलास दानवे, दत्ता जाधव, डॉ. काळे, संदीप भोसले, योगेश नागरे, दुर्गेश जगताप,सौ. सुशीलाताई दानवे,उषाताई आकात, संध्याताई देठे, विमलताई आगलावे, अरुणाताई जाधव, शुभांगीताई देशपांडे, स्नेहलताई जोशी,पडोळ , यांच्यासह भाजपा महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मतदानासाठी सूक्ष्म नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ एप्रिल**

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाकडून अनेक प्रयत्न केले जात आहेत. यासाठी सूक्ष्म नियोजनही होत आहे. बीड लोकसभा मतदारसंघात चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. यासह ८५ वर्षापेक्षा अधिक वृद्ध, दिव्यांग, निवडणूक कामासाठी इतर जिल्ह्यात कार्यरत, इतर जिल्ह्यातील चौथा टप्प्यातील मतदार बीड जिल्ह्यात कार्यरत, १३ मे रोजी विविध विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राच्या ठिकाणी कर्तव्य पालन करत असणारे मतदार, निवडणुकीच्या काळात विविध कामांवर कार्यरत मतदारांनी मतदान करावे यासाठी आयोगाने वेगवेगळ्या उपाययोजना योजिल्या आहेत.

मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी वेगवेगळे उपाययोजना केले जात आहेत. त्यातच गृह मतदान हा एक विशेष उपक्रम निवडणूक आयोगाद्वारे राबविला जात आहे. बीड लोकसभा मतदारसंघात ३९ हजार २०५ इतके मतदार ८५ वर्षाच्या अधिकच्या वयोगटातील आहेत. यापैकी ३४० आणि एकूण दिव्यांग ८५६२ पैकी ५३ दिव्यांग मतदारांनी गृह मतदानासाठी अर्ज दाखल केला होता. असे एकूण ३९३ मतदार गृह मतदानाचा लाभ घेणार होते. आता ३९१ वृद्ध आणि दिव्यांग गृह मतदानाचा लाभ घेणार आहेत. मतदानाच्या कामी कार्यरत असणारे बीडचे निवासी जे इतर ठिकाणी कार्यरत आहेत, तिथे मतदान ते करू शकतात. यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात इतर दहा जिल्ह्यात बीड मधील निवडणुकीच्या कामावर असणाऱ्या मतदारांना मतपत्रिका त्यांच्या विधानसभा निहाय ठिकाणी पाठविण्यात आलेल्या आहेत. त्या जिल्ह्यातील सुविधा केंद्रात ते निश्चित दिवशी मतदान करून पुन्हा उलट टपाली त्या मतपत्रिका बीड जिल्ह्यात येतील. असे एकूण १०३४ मतदार मतदान करणार आहेत.बीड लोकसभा मतदारसंघात इतर जिल्ह्यातील कार्यरत कर्मचारी ज्यांचे मतदान चौथा टप्प्यातच आहे त्यांच्या मतपत्रिका त्या त्या जिल्ह्यातून येणार असून येथे सुविधा केंद्रात ते मतदान करतील असे एकूण ३६५ मतदार बीड जिल्ह्यात निवडणुकीच्या कामावर आहेत. मतदान झाल्यावर त्या मतपत्रिका संबंधित जिल्ह्यात पाठवण्यात येणार आहेत.बीड जिल्ह्यातीलच रहिवासी जे मतदान पथकाच्या विविध कामात गुंतलेले आहेत. जसे पोलीस, होमगार्ड , व्हिडिओ ग्राफर , वाहन चालक असे एकूण १८०० मतदार त्यांच्या मतदानाचा हक्क यावेळी बीड लोकसभा मतदारसंघातील दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षणाच्या ठिकाणी सुविधा केंद्र उभारले असून येथे ते मतदानाचा हक्क बजावू शकतील. असे प्रशिक्षण ४, ५ मे तथा ११ मे ला होणार आहे.१०, ११ व १२ मे रोजी जिल्हास्तरीय पोस्टल बॅलेट द्वारा ६०० मतदार मतदान करणार आहेत. यासह मतदान केंद्रावर १३ मे रोजी कार्यरत असणारे केंद्राध्यक्ष, मतदार अधिकारी व अन्य कर्मचारी जे निवडणुकीच्या कामावर १३ मे रोजी आहेत. ते ज्या मतदान केंद्रावर कार्यरत असणार आहेत तिथेच करतील. असे एकूण ८२१५ कर्मचारी हे त्यांच्या मतांचा हक्क १३ मे रोजी बजावतील.




## शेतीमालाला भाव वाढवून द्या ! म्हणून टाळ वाजविणारे कुठे गेले?

### बजरंग सोनवणेंनी उपस्थित केला प्रश्न

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.५ एप्रिल**

शेतमालाच्या उत्पादन खर्चाच्या दीडपट हमी भाव मिळावा म्हणून कृषी मूल्य आयोगाचे पाशा पटेल, देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या उमेदवार हे विरोधी पक्षात असताना टाळ वाजवीत दिंडी काढून शेतकऱ्यांचे कैवारी असल्याचा आव आणत होते . तेच आता सत्तेवर असताना आता त्यांचा शेतकऱ्यांप्रती असलेला कैवार कुठे गेला ? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आणि महाविकास आघाडीचे बीड जिल्हा लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ बजरंग बप्पा सोनवणे, प्रदेश उपाध्यक्ष बबन भाऊ गित्ते, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, ड. अजय बुरांडे, सुदामतीताई गुट्टे, ड. माधव जाधव हे परळी तालुक्यातील विविध गावात प्रचारा निमित्त मतदारांच्या गाठीभेटी घेत कॉर्नर बैठका घेत आहेत.

पिंपळगाव गाढे या परळी येथे बोलताना बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की, ज्या भाजपच्या नेत्यांनी पूर्वी शेतकऱ्यांच्या पिकाला हमी भाव मिळावा म्हणून नाटकीपणाचा आव आणीत कृषि मूल्य आयोगाचे पाशा पटेल, देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या बीड लोकसभेच्या उमेदवारांनी गळ्यात टाळ घालून कृषी दिंडी काढली. मात्र त्यांची राज्यात आणि केंद्रात सत्ता येताच हमी भाव, कृषी मूल्य आणि एमएसपी याविषयी चकार शब्द बोलत नाहीत. त्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केल्याची सडकून टिका केली. तसेच भाजपच्या उमेदवार म्हणतात की, त्या जिल्ह्याचे प्रारब्ध ठरवितात; पण एखाद्याचे

ज्या जनतेने तुम्हाला आज पर्यंत डोक्यावर घेतले. तीच जनता पायाखाली घ्यायला देखील कमी करणार नाही. असे परखड मतही यावेळी बजरंग बप्पा यांनी व्यक्त केले . भाजपच्या नेत्या निवडून आल्यानंतर लोकांना भेटत नसल्यामुळेच त्यांना विधान सभेला पराभव पत्करावा लागल्याचा घाणाघातही त्यांनी केला . जो बंजारा समाज पिढ्यानपिढ्या ऊसतोड कामगार आहे त्या समाजाला देखील तुम्ही ऊसतोड मंडळात प्रतिनिधित्व दिले नाही यातूनच तुमचे आदिवासी ओबीसी समाजाविषयी असलेली आपुलकी आणि प्रेम हे बेगडी असल्याचे प्रकर्षाने दिसते असा आरोपही केला . ज्यांनी शेतकरी कामगार आणि मजूरांचे पैसे बुडविले त्यांना मतदारांना तोंड दाखवायला जागा नसल्याने ते कोणत्या तोंडाने मतदान मागणार ? असा खणखणीत सवाल केला. तसेच उसाच्या बाबतीत कोणाचीही अडवणूक होणार नाही असे स्पष्ट आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

## ६, १०, ११ आणि १२ मे रोजी पोस्टल मतदान करता येणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ एप्रिल**

बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत येणारे २३० बीड विधानसभा मतदारसंघात दि.६, दि.१०, दि.११ आणि दि.१२ मे रोजी पोस्टल मतदान घेण्यात येणार आहे.भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार बीड लोकसभा मतदारसंघात इतर दहा जिल्ह्यातील मतदार असलेले मतदारांना यामध्ये अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस यांचा समावेश असून ते दि.६, दि.१० आणि दि.११ मे रोजी तहसील कार्यालयातील, तहसीलदार यांच्या दालनात पोस्टल मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे तेथे मतदान करू शकतात.तर दि.१२ मे रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती ( एपीएमसी) येथे सुविधा केंद्र स्थापन करण्यात येणार असून येथेही उर्वरित अधिकारी, कर्मचारी मतदान करू शकतील.

## ११ दिव्यांग तर २२ युवा मतदान केंद्र

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ एप्रिल**

बीड लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा निहाय एकूण २३५५ मतदान केंद्र असणार आहेत. यापैकी ११ मतदान केंद्रांवर दिव्यांग तर २२ मतदान केंद्रांवर युवा मतदान अधिकारी कर्मचारी असणार आहेत.

भारतीय निवडणूक आयोगाने मतदानाच्या प्रक्रियेला अधिक सुरळीत आणि व्यापक करण्यासाठी काही नाविन्यपूर्ण उपक्रम आखलेल्या आहेत. या अंतर्गत तरुण मतदारांनी मतदान प्रक्रियेचा भाग व्हावा यासाठी युवा मतदान केंद्र उभारलेली आहेत. दिव्यांग नागरिकांनाही मुख्य प्रवाहात आणून त्यांनी मतदान प्रक्रियेचा भाग व्हावा यासाठी दिव्यांग मतदान केंद्र नियोजित केले आहे.

दिव्यांग मतदान केंद्रावर १ मतदान केंद्र अध्यक्ष, १ सहाय्यक मतदान केंद्र अध्यक्ष व २ इतर मतदान अधिकारी असे एकूण ४ दिव्यांग अधिकारी, कर्मचारी असतील. असे प्रत्येक तालुक्यात ०१ दिव्यांग मतदान केंद्र आहे. असे एकूण ११ मतदान केंद्र बीड लोकसभा मतदारसंघात आहेत.तसेच बीड लोकसभा मतदार संघातील एकूण सहा विधानसभा मतदार संघात २२ मतदान केंद्र ही युवा (स्त्री/पुरुष) मतदान केंद्र असणार आहेत. प्रत्येकी ०१ तालुक्यात ०२ युवा मतदान केंद्र असणार आहेत. ज्यांचे वय ३५ पेक्षा कमी असेल असे नागरिक हे युवा मतदान केंद्र चालवणार आहेत या मतदान केंद्रातही १ मतदान केंद्र अध्यक्ष, १ सहाय्यक मतदान केंद्र अध्यक्ष २ इतर मतदान अधिकारी असे ४ युवा (स्त्री/पुरुष) मतदान अधिकारी कर्मचारी असणार आहेत.बीड लोकसभा मतदारसंघात अल्पसंख्यांक लोकसंख्या अधिक असून यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात परदानशीन बुथ् उभारण्यात आलेले आहेत. म्हणजे प्रत्येक बुथवर एक महिला सहाय्यक अधिकारी असणे आवश्यक आहे. याप्रमाणे गेवराई विधानसभा मतदारसंघात २७, माजलगाव विधानसभा मतदार संघात ४८, बीड विधानसभा मतदारसंघात १३६, आष्टी विधानसभा मतदारसंघात २६, केज (राखीव) विधानसभा मतदारसंघात ३९, परळी विधानसभा मतदारसंघात ४२ असे एकूण ३१८ परदानशीन बुथ उभारण्यात आलेले आहेत.बीड लोकसभा मतदारसंघात एकूण सहा विधानसभा मतदार संघ आहेत. गेवराई विधानसभा मतदारसंघात ३९७ मतदान केंद्र, माजलगाव विधानसभा मतदारसंघात ३७९, बीड विधानसभा मतदारसंघात ३८२, आष्टी विधानसभा मतदारसंघात ४४०, केज विधानसभा मतदारसंघात ४१५, परळी विधानसभा मतदारसंघात ३४२ असे एकूण २३५५ मतदान केंद्र बीड लोकसभा मतदारसंघात असणार आहेत.

## येडेश्वरीच्या माध्यमातून ऊसाला सर्वाधिक भाव देणारे बजरंग सोनवणे खरे शेतकरी पुत्र

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ एप्रिल**

जिल्ह्यात राजकीय नेत्यांचे कारखाने आहेत. मात्र या कारखान्यांकडून शेतकर्यांच्या ऊसाला योग्य भाव देण्यास वारवांर टाळाटाळ केली जाते. स्थानिक शेतकर्यांचा ऊस घेण्याऐवजी बाहेर राज्यातून ऊसाची आवक जिल्ह्यातील कारखाने करत असताना बीड लोकसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी २०११ मध्ये येडेश्वरी साखर कारखान्याचे भुमिपुजन केले आणि बघता बघता कारखाना उभा राहिला. शेतकर्यांच्या प्रश्नांची कायम जाणिव असणार्या बप्पांनी आपला कारखाना शेतकर्यांच्या पाठिशी उभा केला. जिल्ह्यातील कारखान्यांकडून ऊसाला योग्य भाव मिळत नसताना बजरंग सोनवणे यांनी दुष्काळी परिस्थितीतही जिल्ह्यातील ऊसाला सर्वाधिक भाव दिला. यामुळे बजरंग सोनवणे हेच खरे शेतकरीपुत्र असल्याचे दिसून येते.

एकीकडे उन्हाच्या तीव्रतेने वातावरण उष्ण होत आहे तर दुसरकीडे बीड लोकसभा निवडणुकीचे वातावरणही ढवळून निघत आहे. सामान्य माणसांसोबत त्यांनी जोडलेली नाळ पाहून बजरंग सोनवणे यांना जिल्हाभरात मतदारांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. यंदाही शेतकरी पुत्र विरुध्द धनशक्ती अशी लढत होत आहे. विरोधकांकडून जातीय राजकारण करुन सोनवणे यांचा एकतर्फी उल्लेख करत प्रचार होत असताना सोनवणे मात्र जातीवादावर प्रचार न करता विकासात्मक मुद्यांवर प्रचार करत आहेत. स्वत:च्या हिंमतीवर शेतकर्यांच्या ऊसाला सर्वाधिक भाव देणे आणि पारदर्शक कारभार या जोरावर शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे बीड लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. आहेत. याच शेतकरी पुत्राने अवघ्या नऊ महिन्यात येडेश्वरी साखर कारखान्याची उभारणी केली. सुरुवातीला ऊसाच्या प्रश्नापासून आर्थिक अडचणींवर मात करत कारखाना सुरु केला. आज येडेश्वरी बीड जिल्ह्यात सर्वाधिक उसाला भाव देणारा कारखाना म्हणून गेल्या कित्येक वर्षापासून बहुमान मिळवत आहे. शेतकरी पुत्राचा कारखाना, रोख व पारदर्शक व्यवहार यामुळे शेतकर्यांचीही येडेश्वरीला पहिली पसंती आहे. वडवणी, धारुर, केज, अंबाजोगाई, परळी या भागातील ऊसासह बीड, गेवराई तालुक्यातील ऊस उत्पादकांनाही येडेश्वरीचा आधार मिळत आहे. सर्वसामान्य माणूस आणि शेतकरी केंद्रबिंदू मानून बजरंग सोनवणे यांनी आजपर्यंतच्या राजकीय जीवनात



केलेले प्रामाणिक कार्य आज त्यांच्या कामाला आले आहे. त्यांनी शेतकर्यांना दिलेला विश्वास यामुळे शेतकरी व सामान्य माणूस आज बजरंग सोनवणे यांच्या पाठिशी उभा आहे.

दरम्यान येडेश्वरीकडून ४ ऑगस्ट २०२१ रोजी चिपळूण तालुक्यातील चिपळूण, कोलकेवाडी, वडारवस्ती, कळमबसते या गावातील पूरग्रस्त कुटूंबांना १५ दिवस पुरेल अशा जीवनावश्यक किराणाचे किटचे १२५ गरजू पूरग्रस्त कुटूंबांना वाटप करण्यात आले. सामान्य माणसापासून शेतकर्यांपर्यंत सर्व प्रश्नांची जाण असलेल्या या शेतकरी पुत्राचा आवाज यंदा लोकसभेत घुमणार हे स्पष्ट आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीतही शरद पवारांनी बजरंग सोनवणे यांना उमेदवारी दिली होती. पवार यांनी दाखवलेला विश्वास बजरंग सोनवणे यांनी सार्थ ठरवत तब्बल पाच लाखापेक्षा अधिकची मते घेवून काट्याची टक्कर दिली. २०१९ मध्ये बप्पांचा पराभव झाला असला तरी सामान्य माणसाला उमेदवारी दिल्यानंतर जनता कशापद्धतीने साथ देते हे अवघ्या राज्याने पाहिले. आताही शेतकरीपुत्र विरुध्द धनशक्ती निवडणूक होत आहे. प्रस्थापितांच्या विरोधात पुन्हा एकदा शरद पवारांनी शेतकरी पुत्र असलेला, जमिनीवरच्या सामान्य कार्यकर्त्याला संधी दिल्याचे मतदार बोलू लागला. बजरंग सोनवणे यांना जिल्हाभरात मिळत असलेला प्रतिसाद पाहून यंदाची निवडणूक आता शेतकरी आणि सामान्य माणसाने हाती घेतल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

## चोरट्यांचा धुमाकूळ : चक्क ‘एटीएम’ मशीनचं केले लंपास

### १९ लाख रुपये लंपास

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ एप्रिल**

अंबाजोगाई शहरासह परिसरात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, दिवसागणिक चोरीच्या घटना सातत्याने घडत आहेत. शहरात अजून एक चोरीच्या घटना समोर आली आहे.यात चोरट्यांनी चक्क ‘एटीएम’ मशीनचं लंपास केले आहे. ही घटना शनिवारी ४ मे ला मध्यरात्री घडली असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

या बाबत प्राप्त माहिती अशी की, अंबाजोगाई शहरातील यशवंतराव चव्हाण चौक परिसरात ‘इंडिया १’ कंपनीचे खाजगी ‘एटीएम’ आहे. शनिवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी या ‘एटीएम’ वर दरोडा घालत चक्क ‘एटीएम’ मशीनचं लंपास केले आहे. दरम्यान, या ‘एटीएम’ मध्ये संबंधित बँकेच्या एटीएम मशीन मधून १९ लाख रुपये चोरट्यांनी लंपास केले आहेत. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून घटनेचा अधिक तपास करीत आहेत. दरम्यान, अंबाजोगाई शहरात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावीत, अशी मागणी सामान्य जनतेतून करण्यात येत आहे.

## मराठा समाज विकासासाठी पंकजाताईंच्या सोबत-आ.आजबे

### ताईंनी जो विकास केला तो कोणीही केला नाही, त्याची परतफेड त्यांना संसदेत पाठवून करा

**तभा वृत्तसेवा**
**पाटोदा दि.५ एप्रिल**

पंकजाताई मुंडे यांनी कायम जिल्ह्याचा विकास डोळ्यासमोर ठेवून काम केले. त्यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात त्यांनी विकास हेच ध्येय समोर ठेवून जिल्ह्यात काम केले.स्वपक्षाच्या कार्यकर्त्यांसह इतर विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांचाही सन्मान केला. विकास कामात कधीही राजकारण आड येवू दिले नाही, त्यांनी समाजातील सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत घेतले आहे. मुंडे परिवार आणि मराठा समाजाचे नाते कायम स्नेहाचे आणि सन्मानाचे राहिले. म्हणूनच या देशाच्या महत्वाच्या निवडणूकीत जिल्ह्यातील मराठा समाज बांधव जिल्ह्याच्या विकासासाठी भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांच्यासोबत असल्याचे प्रतिपादन आष्टी-पाटोदा-शिरुरकासार मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी केले.

भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांनी आज पाटोदा तालुक्यातील कुसळंब, पारगाव घुमरा, पारनेर, गवळवाडी या भागात जावून प्रचार दौरा पुर्ण करत मतदारांशी संवाद साधला. या दौर्यात त्यांच्यासमवेत महायुतीचे नेते आ.बाळासाहेब आजबे यांच्यासह जिल्हा परिषद गटातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी आ.आजबे काका बोलत होते. ते म्हणाले, पंकजाताईंनी बीड जिल्ह्यात यापूर्वी जो विकास केला, ती कामे जनतेला अजूनही फायद्याची ठरत आहेत. जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ते मंजूर केले. पिकविमा असेल अतिवृष्टीचे अनुदान असेल, शेतकर्यांना कोणतेही अनुदान देण्याचे काम ताईंच्या माध्यमातून झाले आहे. अनेक मोठी कामे पंकजाताईंच्या नेतृत्वात यापूर्वी मार्गी लागली आहेत. पंकजाताईंनी जो विकास केला तो कोणीही केला नाही, त्याची परतफेड त्यांना संसदेत पाठवून करा. भविष्यातील बीड जिल्ह्यातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी पंकजाताईच सक्षम नेतृत्व आहेत, याची



जाण ठेवून आपण सर्वांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी पंकजाताईंना या भागातील प्रचंड मताधिक्य देवून विजयी करावे असे आवाहन याप्रसंगी आ.बाळासाहेब आजबे यांनी केले.

## आयुष्यमान भारत योजनेचा लाभ पांढऱ्या व केशरी कार्ड धारकांना पण-डॉ ओमप्रकाश शेटे

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ एप्रिल**

सुधारित योजनेनुसार पिवळ्या रेशन कार्ड सोबत पांढऱ्या व केशरी कार्ड धारकांना पण आयुष्यमान भारत कार्ड योजनेचा लाभ होणार असून सर्वांनी आपले कार्ड काढून घ्यावे असे आवाहन डॉ ओमप्रकाश शेटे यांनी आयुष्यमान भारत दिन साजरा करताना यशवंत हॉस्पिटल येथे केले.

यावेळी व्यासपीठावर डॉ यशवंत राजेंभोसले, डॉ संदीप राणे, उमेश मोगरेकर उपस्थित होते.पुढे बोलताना ओमप्रकाश शेटे म्हणाले आयुष्मान भारत हा माननीय पंतप्रधान यांची महत्त्वाकांशी योजना आहे.समाजातील शेवटच्या माणसापर्यंत दर्जेदार व उत्तम आरोग्य सुविधा पोहोचविणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे.महाराष्ट्रातील १००० रुग्णालय या योजनेमध्ये समाविष्ट आहेत.विविध १३५६ हजारावर या योजनेमधून मोफत उपचार मिळतात. आयुष्मान भारत मध्ये महाराष्ट्र अग्रेसर व्हावा व राज्यातील लोकांना जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी पीएमओ ने डॉ.ओमप्रकाश शेटे यांना खास महाराष्ट्रासाठी पाठवले आहे. आयुष्मान भारत मध्ये केंद्र आणि राज्याचा समन्वय यातून राखला जाणार आहे. यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली



राज्यात २ नोव्हेंबर २०२३ रोजी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र नावाची समिती गठित झाली आहे. रुग्णांना थेट समितीची संपर्क करता यावा व सहजपणे त्यांना विचार मिळावेत यासाठी टोल फ्री क्रमांक व त्याच्या १०० लाईन्स बसवण्यात आले आहेत.लवकरच या टोल फ्री क्रमांक योजनेचे लोकार्पण नामदार देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.आयुष्मान भारत कार्ड चा उपयोग लोकांना हॉस्पिटलमध्ये एटीएम कार्ड प्रमाणे व्हावा अशी इच्छा डॉ ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केली.

राणे हॉस्पिटलला सर्व सुविधा मोफत

यावेळी बोलताना डॉ. संदीप राणे यांनी राणे हॉस्पिटल मुबंई येथे आतापर्यंत १००० बायपास३००० एंजिओपलास्टी झाल्याचे सांगितले शिवाय मोफत उपचारासोबत ३० दिवसापर्यंत मोफत राहण्याची व ५रुपयात जेवणाची सुविधा असल्याचे सांगितले यशवंत हॉस्पिटल येथे २० हृदयरुग्णाची तपासणी व ६ अंजीओग्राफी या दिवशी करण्यात आल्या.

## चावडी भेटीत पंकजाताई मुंडेंनी साधला मतदारांशी संवाद

बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांचा जिल्ह्याच्या विकासाचा आलेख उंचावत ठेवण्यासाठी त्या खासदार होणे आता आवश्यक आहे. पंकजाताई म्हणजे विकास याची खात्री आम्हा सर्वांना आलेली आहे. यापूर्वी त्यांनी येथील खंडोबा मंदिरासाठी मोठा निधी देवून उपकार केले. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित आहे, असा आत्मविश्वास ज्येष्ठ नेते शिवनाथ पवार यांनी बोलून दाखवला.



पाटोदा तालुक्यातील कुसळंब, पारगाव घुमरा, पारनेर, गवळवाडी आदी गावात आज पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ चावडी भेट कार्यक्रमासह महायुतीच्या कार्यकर्त्यांशी संवाद आणि बैठकी घेण्यात आल्या. या सर्वच ठिकाणच्या बैठकांमध्ये पंकजाताईंना विजयी करण्यासाठी कार्यकर्त्यांमधील प्रचंड उत्साह अन् जिद्द दिसून आली. विरोधकांकडे विकासाचे कुठलेही धोरण नसल्याने ग्रामीण जनता आता भूलथापांना बळी पडणार नसल्याने विरोधकांकडून जातीवादाचा मुद्दा समोर आणला जातोय असे सांगत शिवनाथ पवार म्हणाले, आमच्या भागाचा विकास करण्यासाठी पंकजाताई मुंडे सक्षम नेतृत्व आहेत. यापूर्वी त्यांनी गावातील खंडोबा मंदिरासाठी मागणी करताच निधी दिला होता, त्यांची कामाची ही उरक आम्ही विसरलेलो नाहीत. रस्ते असो की, सिंचन, शेती अनुदान ते आपल्या जिल्ह्यातील शेतकर्यांना मिळावे यासाठी पंकजाताई पालकमंत्री असताना कायम आग्रही राहिल्या, लोकांचे म्हणने त्या ऐकून घेवून समस्यांचे समाधान शोधतात, म्हणूनच त्यांच्या जनसेवेचे फळ म्हणून आम्ही त्यांना येत्या १३ तारखेला प्रचंड मतांनी विजयी करणार असा शिवनाथ अण्णा पवार यांनी व्यक्त केला. यावेळी कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मंदीर पदभरतीत स्थानिक पुजाऱ्यांना ५० टक्के जागा द्या

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ मे -**

श्री तुळजाभवानी मंदीर संस्थानमधील कर्मचारी भरतीमध्ये पुजाऱ्यांना पन्नास टक्के जागा भरतीत प्राधान्य देण्याची मागणी श्री तुळजाभवानी पुजारी मंडळाने मंदीर संस्थानचे अध्यक्ष डॉ. सचिन ओम्बासे व विश्वस्त तथा आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, श्री तुळजाभवानी मंदीर संस्थानमध्ये जाहिरातीद्वारे कर्मचारी भरती प्रक्रिया सुरु केली आहे. मंदीर संस्थानला धार्मिक विधीकर, तसेच भक्तांना सर्व सुविधा देण्याचे काम पुजारी बांधवा मार्फत केले जाते. त्यामुळेच मंदीर संस्थानला मोठ्या प्रमाणात देणग्या, सोने, चांदी आदी भाविकांकडून अर्पण होते. मंदीर संस्थान मार्फत होणाऱ्या कर्मचारी भरतीत स्थानिक पुजारी बांधवाना पन्नास टक्के जागा उपलब्ध करुन देण्यात यावेत. धार्मिक व्यवस्थापक हे पद भरताना तिन्ही मंडळाच्या सहमतीने निवड करण्यात यावी जेणे करुन श्री तुळजाभवानी मातेचे वर्षभर विविध धार्मिक विधी होत असतात त्याची संपूर्ण माहीती संबंधित अधिकाऱ्यास असणे आवश्यक आहे. तसेच श्री तुळजाभवानी मंदीर हे १९०९ मध्ये पुजारी बांधवांच्या आपसातील वादामुळे त्यावेळीच्या निजाम सरकारकडे देण्यात आले. त्यावेळी निजाम सरकारने 'कवायत' कायदा करुन पुजाऱ्यांचे हक्क, अधिकार, कवायत नुसार निश्चित केले आहेत. त्यामुळे या कायद्याची धार्मिक व्यवस्थापकास माहिती असावी, त्यामुळे धार्मिक व्यवस्थापक हे पद पुजाऱ्यांसाठी राखीव ठेवावे अशी मागणी श्री तुळजाभवानी पुजारी मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### तुळजापुरात शिक्षकाकडून रोज मतदान जनजागृती

**तुळजापूर, दि.५ मे -**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने स्वीप अंतर्गत तुळजापूर शहरातील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ चे सहशिक्षक तथा महेंद्र कावरे यांच्या वतीने विविध माध्यमातून मतदानाचा टक्का वाढावा, मतदाराने मतदान करण्यासाठी घराबाहेर पडावे यासाठी रोज विविध माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून विविध लग्न समारंभात, बाजारपेठेत, सार्वजनिक कार्यालयात, विविध गल्लीतून बस स्थानकात, मंदिररात इत्यादी भागांमध्ये महेंद्र कावरे मतदारांना मतदान करण्यासाठी आवाहन करीत आहेत.मी मतदान करणार तुम्हीपण मतदान करा, छोडकर सारे काम, चलो करे मतदान अशा संदेशात्मक संदेश विविध माध्यमातून मतदारांना मतदान करण्यासाठी आवाहन करीत आहेत. यासाठी त्यांना नोडल अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी एम.एम. यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

### मतदान जनजागृतीसाठी भूममध्ये मोटारसायकल रॅली

**भूम, दि.५ मे -**

तालुका स्वीप कक्ष गटशिक्षण कार्यालय भूमच्या वतीने शनिवारी मतदार जनजागृती मोटारसायकल रॅली काढण्यात आली. यावेळी पंचायत समिती भूम येथून उपस्थित शिक्षकांच्या मोटारसायकल रॅलीला तहसीलदार जयवंत पाटील, गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी, विस्तार अधिकारी सोमनाथ टकले यांनी शुभेच्छा दिल्या. समर्थनगर, शिवाजीनगर, गांधी चौक, कसबा पेठ, भीमनगर, वेताळ रोड, साठे चौक, रामहरी नगर, शंकरराव पाटील महाविद्यालय, आलमप्रभु रोड, इंदिरानगरमार्गे तहसील भूम येथे या रॅलीचा समारोप करण्यात आला. रॅलीमध्ये उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील ह्या उपस्थित होत्या. मोटार सायकल रॅलीमध्ये केंद्रमुख उगलमुगले, कांबळे यांच्यासह शिक्षक, शिक्षीका उपस्थित होते.

### नवविवाहीत दापंत्यांची श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनास गर्दी

**तुळजापूर, दि.५ मे -**



श्री तुळजाभवानी मंदिरात शनिवारी नवविवाहीत दांपत्यांची दर्शनासाठी तसेच वाहुर जत्रेसाठी गर्दी झाली होती. गुरू आणि शुक्र यांचा अस्त असल्याने लग्न सोहळ्याच्या तारखा नाही. लग्न सोहळ्याच्या तारखा संपलेल्या आहेत. २ मेपर्यंत झालेले विवाह सोहळ्यातील दांपत्य सध्या श्री तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी गर्दी येत आहे.

# मागास जिल्ह्याची ओळख पुसण्यासाठी महायुतीच सक्षम : पालकमंत्री सावंत

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ मे -**



पाच वर्षे ज्यांना खासदार केले, त्यांनी संसदेत जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी काहीही केलेले नाही. खोटे बोलून, दुसऱ्यांवर टीकाटिप्पणी करून विकास होत नसतो. त्यामुळे आता मतदारांनी थोडा विचार करून मतदान करावे. आपल्या जिल्ह्याची मागास जिल्हा म्हणून ओळख पुसण्यासाठी महायुतीच सक्षम आहे. त्यामुळे महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांना निवडून देत मोदींचे हात बळकट करावेत, असे आवाहन पालकमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी केले.

महायुतीच्या उमेदवार अर्चना राणाजगजितसिंह पाटील पाटील यांच्या प्रचारार्थ परंडा तालुक्यातील जवळा नि. येथे पालकमंत्री तथा शिवसेना नेते प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी प्रचारसभेच्या माध्यमातून ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, जवळा नि. ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

पुढे बोलताना पालमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत म्हणाले की, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून माजी अध्यक्षा तथा लोकसभेच्या उमेदवार अर्चना पाटील, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष धनंजय सावंत यांनी खेडोपाड्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला.

या भागाची दुष्काळी ओळख पुसण्यासाठी जी योजना राबविता येईल, ती राबवून जनतेचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न त्यांनी केला. काम करण्याची धमक अर्चना पाटील यांच्यामध्ये आहे. विद्यमान खासदार तथा विरोधी उमेदवार जनतेत गावखेड्यातील भाषा वापरून दुसऱ्या उमेदवारांवर आणि कुटुंबावर टीका करून मते मागत आहे. परंतु वैयक्तिक आणि कौटुंबीक टिका करून मत मागण्यापेक्षा त्यांनी लोकसभेत काय कामे करणार? जिल्ह्यासाठी आजवर काही विशेष काम केले आणि केंद्राचा मोठा निधी आणून जिल्ह्याच्या विकासासाठी कामे केली, असे कधीही झालेले नाही.

त्यामुळे आता विरोधी उमेदवाराला घरी बसवून महायुतीच्या उमेदवाराला साथ द्यावी, असे आवाहन पालकमंत्री प्रा. डॉ. सावंत यांनी केले.

# नायगाव येथे पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत यांची धावती भेट



**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि.५ मे -**

कळंब तालुक्यातील नायगांव येथे नुकतीच शिराढोण येथील जाहिर सभा संपल्यानंतर रात्री १०:३० च्या सुमारास येथिल सरपंच वनमाला उद्धवराव शितोळे यांच्या घरी भेट देऊन महायुतीच्या प्रचारार्थ उपस्थित कार्यकर्त्यांची भेट घेऊन गावातील परिस्थितीची चौकशी केली व यावेळी आयोजित चहापाणी कार्यक्रमात त्यांनी सर्व कार्यकर्त्यांना तुम्ही जोमाने कामाला लागा मी तूमच्या पाठीशी आहे. प्रचारात अजिबात निष्काळजीपणा करु नये व या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांच्या निवडणूक काळात कोणीही कुठल्याही भुलथापांना बळी न पडता आणी नाराज न होता कामाला लागा व त्यांना बहूमताने विजयी करा व फिर एक बार चारशे पार ची सर्वांना आठवण करून पुन्हा मोदी पंतप्रधान झालेच पाहिजे असेही यावेळी बोलताना ते म्हणाले.

याप्रसंगी उपस्थित प्रमुख कार्यकर्ते यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अनिल खोचरे सह उद्धवराव शितोळे पाटील, माजी संचालक भरत शितोळे पाटील, माजी सरपंच प्रल्हाद शितोळे, व्यंकट शितोळे, नारायण शितोळे पाटील उपसरपंच अशोक गोरे, एडबा मेनकुदळे, अनिल गोरे, विकास वाघ कुलकर्णी, अभिजित शितोळे पाटील, आनंद शितोळे पाटील, हनुमंत गरड, राजाभाऊ झिरमिरे, सोमनाथ घोडके, संतोष होदाडे सह असंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# सध्याचे सरकार हे शेतकऱ्यांच्या मुळावरचे सरकार : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**




धाराशिव तालुक्यातील येडशी, तडवळा (क), पळसप याठिकाणी महाविकास आघाडीचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ आमदार कैलास पाटील यांची सभा पार पडली.

मतदार संघातील निधी संदर्भात आमदार कैलास पाटील यांनी खर्च झालेला निधी जनतेसमोर मांडला. वरोधकांना जाहीर आवाहन केलं तुम्ही केलेले काम सांगा माझंही काम सांगतो. पाटील कुटुंबांन फक्त आपल्या परिवाराचा फक्त विकास केला. शेतकरी विरोधी या सरकारला येत्या ७ तारखेला मशाल या चिन्हावर शिक्कामोर्तब करून बहुमताने खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना विजयी करा असे आवाहन केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर, उपजिल्हाप्रमुख विजयकुमार सस्ते, धाराशिव तालुका प्रमुख सतिश सोमाणी, वागलास काळे, संग्राम देशमुख, रवि कोरे आळणीकर, प्रदिप नाना सस्ते, बाळासाहेब मेटे, विनोद पवार, सुनिल शेळके, संजय काका पाटील, दिलीप पवार,पमू पवार, अमर पवार, विष्णू पवार, शहाजी देशमुख, तडवळा येथे तानाजी जमाले, देवदत्त मोरे, तुळशीदास जमाले, चंदू जमाले, राजाभाऊ लोंढे, विशाल जमाले, शंकर होगले, दिलीप करंजकर, किशोर ढाळे, काकासाहेब शिनगारे, मुश्रीफ मुजावर यांच्यासह शिवसैनिक नागरिक उपस्थित होते.

✻ **धाराशिव, दि.५ मे -**

उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या अधिकृत उमेदवार अर्चना राणाजगजितसिंह पाटील यांनी या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी दशसूत्री जाहीर केली आहे. महायुतीकडून जाहीर करण्यात आलेल्या वचननाम्यात मतदारसंघाच्या विकासाच्या प्रमुख मुद्यांचा केंद्रात पाठपुरावा करून जिल्ह्याची मागास ओळख पुसण्याचा मनोदय महायुतीच्या उमेदवार अर्चना राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# एकाच कुटुंबातील घराणेशाही या बाबी माझ्या विजयासाठी पुरक ठरणाऱ्या : निंबाळकर



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ मे -**

वाढती महागाईने त्रस्त झालेली जनता, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे खोटे आश्वासन यामुळे लोकांमध्ये प्रचंड नकारात्मक भूमिका आहेत आणि एकाच कुटुंबातील घराणेशाही या बाबी माझ्या विजयासाठी पुरक ठरणाऱ्या असुन मतदारांच्या प्रचंड सहानभुतीमुळे त्यात आणखी भर पडेल; तरीही मतदारांनी जागरूकतेने मशाल चिन्हाला दिल्लीत पाठवावे आवाहन उस्मानाबाद (धाराशिव) लोकसभा निवडणुकीचे उमेदवार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी केले.

निवडणूक प्रचारार्थ कसगी, बलसुर व तुरोरी येथे आयोजीत सभेत खासदार निंबाळकर बोलत होते. यावेळी बाबा पाटील, अश्लेष मोरे, अँड. शितल चव्हाण, अँड. सुभाष बसवराज वरनाळे, विकास हराळकर, संजय चालुक्य, रज्जाक अत्तार, संजय पवार, बाबुराव शहापुरे, विजय वाघमारे, सुधाकर पाटील, विलास व्हटकर, अजिंक्य पाटील आदींची उपस्थिती होती.

खासदार ओमराजे पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील विकासासाठी मी केव्हांही तयार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंबातील सदस्या सोबत माझे कौटुंबिक नाते तयार झाले आहे. सामान्य माणूस मला विसरू शकत नाही, हीच माझी कमाई आहे. सर्व जातीधर्मातील लोकांचे प्रश्न, विशेषतः शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी माझा लढा कायम राहिल. मशाली ला मतदान करुन विकासाचा प्रकाश निर्माण करण्याची संधी देण्याचे आवाहन निंबाळकर यांनी यावेळी केले. दरम्यान ओमराजेंनी वकिल, व्यापारी व डॉक्टर्स मंडळीशी साधला संवाद साधून मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी अँड. शितल चव्हाण यांचे भाषण झाले, ते म्हणाले की, देशातील महागाईमुळे आणि भारतीय संविधान बदलण्याच्या षडयंत्रामुळे मोदी विरोधी लाट आहे.

जागरूक मतदाराने सध्याच्या स्थितीचे अवलोकन करुन महाविकास आघाडीचे उमेदवार ओमराजेंना विजयी करावे, असे आवादन केले. माजी नगराध्यक्ष अत्तार, सुधाकर पाटील यांची यावेळी भाषणे झाली.

# जय बजरंग ग्रुपच्या कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

विश्वगुरू नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर प्रभावित होऊन, विकासात्मक, रचनात्मक कार्य करणारे लोकनेते आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून व आमदार विक्रम काळे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे यांच्या प्रमुख उपस्थीत मध्ये व राजसिंहा राजेनिंबाळकर जिल्हाध्यक्ष भाजप युवा मोर्चा व माजी सरपंच प्रमोद पाटील यांच्या पुढाकाराने जय बजरंग ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये जाहिर प्रवेश केला.

धाराशिव शहरातील जय बजरंग ग्रुप संस्थापक अध्यक्ष गणेश घोडके, अमर जाधव, संजय चौगुले, प्रशांत पवार, सचिन कदम, ईश्वर पवार, कपिल घोडके, बालाजी कुमटे, कृष्णा घोडके, तुषार चव्हाण, राहुल बोडके, शिवाजी जाधव, कार्तिक घोडके यांच्यासह युवकांनी प्रवेश केला.

उस्मानाबाद लोकसभा महायुतीचे उमेदवार अर्चना राणाजगजितसिंह पाटील यांना निवडुण आण्याचा द्रुड निश्चय युवकांनी केला.

# स्वआधार फाईल मेकिंग वर्कशॉपचे न्यायाधिश ए.एस. शेंडे यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**



स्वआधार मतिमंद मुलींचे बालगृह, विमानतळ रोड आळणी येथे वय वर्ष १८ च्या पुढील वयोगटासाठी स्वआधार फाईल मेकिंग वर्कशॉप हा एक नवीन व स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आला. या प्रोजेक्टच्या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख मान्यवर व उद्घाटक म्हणून ए.एस. शेंडे (प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश धाराशिव) यांच्या हस्ते फाईल मेकिंग वर्कशॉपचे उद्घाटन करून करण्यात आली. बालगृहातील मुलींनी इतिहास के रंग रूप हे स्वागत गीत सादर करून व बुके देऊन प्रमुख पाहुण्यांचे व मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी आर.एस. गुप्ता (जिल्हा व सत्र न्यायाधीश-१), एस.एस. माने (प्रमुख न्याय दंडाधिकारी धाराशिव), वसंत यादव (सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण धाराशिव), बी.एम. कोठावळे (प्रमुख न्यायाधीश बाल न्याय मंडळ धाराशिव) तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. अभय शहापूरकर (अध्यक्ष सल्लागार समिती तुळजाई प्रतिष्ठान), तसेच डॉ. अश्रुबा कदम (सदस्य बालन्याय मंडळ) आत्माराम पवार (प्रमुख जीवन विकास मुलांचे वस्तीगृह तडवळा) इ.मान्यवर तसेच शहाजी चव्हाण (सचिव तुळजाई प्रतिष्ठान), गुरूनाथ थोडसरे (मुख्याध्यापक स्वाआधार मतिमंद मुलींचे बालगृह) तसेच सर्व कर्मचारी वृंद व सर्व मुली इ. उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थेचे सचिव चव्हाण यांनी फाईल मेकिंग वर्कशॉप हा नवीन उपक्रम सुरू करण्यामागे वय वर्षे १८ च्या पुढील वयोगटातील मुलींसाठी व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करणे व त्यांना स्वावलंबी बनवणे हा उद्देश असल्याचे स्पष्ट केले. बालगृहामध्ये सध्या १८ च्या पुढील वयोगटातील मुलींची संख्या ३५ ते ४० एवढी आहे. विशेष शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण हे काळाची गरज आहे.

या मुलींना व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे व्यवहार ज्ञान देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे. यासाठी यापूर्वीही प्रकल्पामध्ये रोपवाटिका फळझाडे, लाकडी तेल घाण्याचा उपक्रम तसेच पार्लरचा उपक्रम इत्यादी विविध प्रोजेक्ट सुरू करण्यात आल्याचे सांगितले. वय वर्षे १८ च्या पुढील वयोगटातील मुलींना आत्मनिर्भर बनवण्यासाठी फाईल मेकिंग वर्कशॉप प्रोजेक्ट उभा करण्याचा संस्थेचा मानस होता. परंतु त्याची प्रत्यक्षरीत्या अंमलबजावणी करण्यासाठी निधीची आवश्यकता होती. गरजू आणि आव्हानांना तोंड देणाऱ्या लोकांना मदत करणे ही मानवतेची मोठी सेवा आहे.

इतरांना यशस्वी होण्यात मदत करणे हे सर्वात मोठे यश आहे. असा विचार करणाऱ्या लीना राजेंद्र येवलेकर आणि शोभा विजयकुमार बेदमुथा या समाजातील दोन सुहृदयी व्यक्ती पुढे आल्या आणि त्यांनी मदतीचा हात पुढे केला. फाईल मेकिंग वर्कशॉपच्या उभारणी करिता लागणाऱ्या साहित्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी केल्या सहकार्याबद्दल संस्थेचे सचिव चव्हाण यांनी येवलेकर तसेच बेदमुथा यांचे आभार व्यक्त केले.

ए.एस. शेंडे यांनी बाल गृहातील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना या मुलांना प्रेमाने आपलंसं केलं तर या मुलांच्या चेहऱ्यावर निरागस हास्य उमटू शकते आणि हा प्रामाणिक प्रयत्न येथील कर्मचारी करत आहेत असे त्यांनी व्यक्त केले. तसेच मुलींना स्वतःच्या पायावर उभे करून त्यांची ओळख निर्माण करण्याकरता हा नवीन उपक्रम सुरू करण्याबाबत त्यांनी संस्थेचे कौतुक ही केले.

तसेच या मुलीबरोबर वेळ घालविण्याकरता सामान्य शाळेतील बालकांना येथे आणण्यास परवानगी मिळावी असा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या समोर ठेवण्यासाठी प्रयत्न करावे असे त्यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यातील काही पतसंस्था किंवा इतर कार्यालयांनी या बालगृहातील मुलींनी बनवलेल्या फाईल्स विकत घेऊन त्यांना सहकार्य करावे असे आव्हान देखील शेंडे यांनी केले.

आर.एस. गुप्ता यांनी बालगृहामध्ये कधीही आल्यानंतर येथील वातावरण हे अतिशय उल्हासित असते व येथे वारंवार येण्याची इच्छा देखील होते. खूप कमी वेळामध्ये संस्थेने या नवीन उपक्रमाची तयारी करून हा प्रोजेक्ट सुरू केल्याबद्दल त्यांनी येथील कर्मचारी व बालगृहातील मुलींचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन माने यांनी केले.

# बिलोली येथे सर्वधर्मीय, सर्व जातीय सामूहिक विवाह सोहळा थाटात

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, ५ मे -**

बिलोली येथे सर्वधर्मीय आणि सर्वपक्षीय सामूहिक विवाह सोहळ्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विवाह सोहळ्यात विविध जाती आणि धर्मातील सहा जोडप्यांचा शाही पद्धतीने मोठ्या थाटामाटात विवाह संपन्न झाला.

कथितपणे स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी लग्नाच्या कार्यक्रमात खर्च करण्याची पद्धत अनेक वर्षापासून सुरू आहे. ही कथित प्रतिष्ठेसाठी वधू किंवा वर पक्षाला मोठ्या प्रमाणात याचा फटका बसतो. काही ठिकाणी दोघांनाही आर्थिक झळ मोठ्या प्रमाणात बसत असते. स्थळ जुळवण्याच्या आणि प्रतिष्ठेच्या नावाखाली काहींना तर निव्वळ कर्ज काढून असा उपक्रम आटोपावा लागतो. सामूहिक विवाह सोहळ्यात लग्न करणे ही समाजात नाचक्कीचे बाब काही कथित खोटी प्रतिष्ठा बाळगणाऱ्यांना वाटते. अशातही तब्बल वीस वर्षापासून सामूहिक विवाह सोहळा ठक्करवाड परिवार आणि सामूहिक विवाह सोहळा समितीच्या वतीने दरवर्षी घेण्यात येतो. यात सगरोळी,बिलोली आणि कुंडलवाडी तसेच कासराळी येथील व्यापारी मोठ्या प्रमाणात योगदान देत असतात. यावर्षी गंगाराम ठक्करवाड यांचे दुःखद निधन ही घटना आणि निवडणुकांची धामधूम लक्षात घेता यावर्षी विवाह सोहळा संपन्न होणे कठीणच नव्हे तर अशक्य वाटत होते. मात्र अरविंद ठाकरवाड यासह बिलोली, कुंडलवाडी, कासराळी, सगरोळी येथील व्यापारासह समाजातील महत्त्वपूर्ण मंडळींनी पायंडा खंडित पडू नये म्हणून कमी वेळेत सहा विवाह जोडप्यांचा विवाह सोहळा संपन्न करण्यात यश मिळवले. यावर्षी हा विवाह सोहळा दि. १ मे रोजी बिलोली येथील माजी नगराध्यक्ष विजयकुमार कुंचनवार यांच्या वातानुकूलित शाही हॉलमध्ये घेण्यात आला. जेथे प्रतिष्ठित आणि दिग्गज कुटुंबाचे विवाह सोहळे वातानुकूलित हॉलमध्ये करण्यात येत होते तेथे या वर्षीचा सामूहिक विवाह सोहळा संपन्न झाला. विवाह सोहळा समितीच्यावतीने भोजन, विवाह कक्ष मनी मंगळसूत्र यासह वधू-वरांना आहेर करण्यात आले. असा विवाह सोहळा लक्षात घेता अनेकांनी यात सहभागी होणे आणि सर्व धर्मीय विवाह सोहळ्यात विवाह संपन्न करणे याविषयी सकारात्मक विचार मांडले. याप्रसंगी लक्ष्मणराव ठक्करवाड, विजयकुमार कुंचनवार, गोविंद मुंडकर, साईनाथ उत्तरवाड, चंद्रशेखर पाटील यांनी आपले विचार प्रभावीपणे मांडले. या कार्यक्रमात वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित असलेले बिलोली येथील वैश्य समाजातील व्यापारी म्हणाले की, अशा कार्यक्रमात माझी केवळ उपस्थित राहणे हीच इच्छा नसून अशा कार्यक्रमात माझ्या कुटुंबातील मुलांचे विवाह संपन्न करण्याचा मानस आहे. सर्व स्तरातील सर्व क्षेत्रातील सर्व जातीतील व्यक्तींनी अशा कार्यक्रमाचे आयोजनच करणे नव्हे तर स्वतःच्या कुटुंबातील मुलांचे आणि मुलींचे विवाहाचे कार्यक्रम करणे ही खरी गरज असल्याचे बिलोली येथील प्रतिष्ठित व्यापारी यांनी व्यक्त केले.

विशेष म्हणजे कै. गंगाराम ठक्करवाड यांनी तसे केले होते. या कार्यक्रमासाठी विश्वनाथ अण्णा दाचावार, अशोक गरुडकर, प्राध्यापक कमटलवार, किशोर गरुडकर यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी बिलोली तालुक्यासह जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील लोक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# रोहित्रा अभावी शेतकऱ्यांचे काळीज जळतेय

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ५ मे -**



शेतकऱ्यांच्या बाबतीत कायमच प्रशासन उंटावरून शेळ्या हाकण्याच्या प्रयत्नात असतो. याची प्रचिती बारड भागातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना पुन्हा पुन्हा येत असून रोहित्री अभावी केळीच्या भागच करपत नसुन शेतकऱ्यांचे काळीजही जळतेय अशी परिस्थिती असताना महावितरणचे अधिकारी उष्णतेच्या लाटेत गारेगार होण्यासाठी चौपाटीचा आसरा घेताना दिसत आहेत. त्यामुळे एकीकडे रोहित्रा अभावी शेतकऱ्यांचा दैवदुर्विलास पहावयास मिळत असताना महावितरणचे अधिकारी मात्र थंड हवेची ठिकाण शोधत आहेत.

बारड ३३ के व्ही उपकेंद्र अंतर्गत तीन रोहित्र जळल्याने केळीच्या उभ्या बागा जाग्यावर करपत आहेत. देवी डीपी, नारायण डीपी, के एम डीपी चा समावेश असून महावितरणच्या तगाद्यामुळे शेतकऱ्यांनी सावकारी व्याजाने पैसे काढून रक्कम अदा केली असून या संबंधीचा अहवाल संबंधित कार्यालयाने वरिष्ठांकडे पाठवला आहे. परंतु वरिष्ठ अधिकारी मात्र ऑइल नाही, रोहित्र नाही अशी कारणे दाखवून शेतकऱ्यांचा कडेलोट करीत आहेत. स्थानिकचे महावितरणचे अधिकारी मात्र अहवाल पाठविल्याचे सांगून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना कोलदांडा दाखवत आहेत. लोकप्रतिनिधी मात्र निवडणूक संपली या तोऱ्यात आहेत तर स्थानिक लोकप्रतिनिधी मतदानाच्या जोगव्यासाठी दारोदार फिरताना दिसत आहेत. परंतु आता शेतकऱ्यांच्या रोहित्रासाठी कुणीच प्रयत्न करीत नाही म्हणून जगाचा पोशिंदा हवालदिल दिसून येत आहे.

या भागात केळीच्या बागा मोठ्या प्रमाणात आहेत परंतु रोहित्र जळल्याने आता त्या करपत असून शेतकरी जणू काळीज जळते आहे अशा दुःखात दिसून येत आहे. आठ तास शेतकऱ्यांना वीज उपलब्ध होत असते त्यातही आता रोहित्रच नसल्याने १२ महिने जोपासलेले पिक डोळ्यासमोर वाळून जात असताना शेतकऱ्यांचे अश्रूच ओघळत नसून आता रक्तही ओघळत असल्याचे चित्र बारड भागात दिसून येत आहे. कुंभकर्णीय झोपेत असलेली महावितरणची व्यवस्था कधी जागी होणार हेच पाहावे लागेल!

**शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यास सरकार जबाबदार : संजय मुलंगे**

गेल्या आठ दहा दिवसापासून रोहित्री उपलब्ध नाहीत. केळ्या वाळून गेल्या आहेत. शेतकऱ्यांचे नुकसान सरकार भरून देणार आहे का ? या दरमान्य शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यास सरकार जबाबदार राहणार असल्याचे शेतकरी संजय मुलंगे बारडकर म्हणाले.

# शिष्यवृती परीक्षेत गिरीष भाऊ देशमुख इंग्लिश स्कुलचे यश

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, ५ मे -**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे च्या वतीने २०२३-२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृती परीक्षेत गिरीषभाऊ देशमुख इंग्लिश स्कुल संलग्नित विद्याभारती ज्यु.कॉ.उमरी चे सात विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे.

या शाळेच्या विदयार्थ्यांनी गेल्या वर्षाभरात कला संचालनालयाच्या एलिमेंटरी, इंटर्मिजियट या परीक्षेत ५० विद्यार्थी विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झाले असून , एस ओ एफ ऑलिम्पियाड परीक्षेत १०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले , बाल गांधर्व संगीत महाविद्यालयाच्या प्रारंभिक व प्रवेशिका परीक्षेत १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विश्र्वंम अब्याकस लॅब्स च्या जिल्हास्तर परीक्षेसाठी ४० विद्यार्थी पात्र झाले. राज्यस्तरीय परीक्षेत ३ व राष्ट्रीय पातळीवर रेहान शेख व श्रेयस गळगे यांनी यश मिळविले. नुकत्याच लागलेल्या स्कॉलरशिप परीक्षेच्याच्या निकालात गणेश जाधव, तनुजा शिंदे, श्रेया आवरदे, स्नेहल कुलकर्णी, कौमुदी मुक्कावार, वैजयंती राखेवार,नरेंद्र टिप्रेसवार हे विदयार्थी पात्र ठरले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.विक्रम देशमुख , शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्वाती वचेवार मॅडम , प्राचार्य विश्वजीत देशमुख यांनी अभिनंदन केले.

## संक्षिप्त वृत्त

### लोहा विधानसभा मतदारसंघामध्ये मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड -** नांदेड दि. ४ मे :- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ प्रक्रियेदरम्यान नांदेड जिल्ह्यातील ८८-लोहा विधानसभा मतदार संघामध्ये ७ मे रोजी ज्याठिकाणी मतदान केंद्रावर मतदान होणार आहे, त्याठिकाणा पासून २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहे.

### महात्मा फुले विद्यालयात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवापुर्ति निमित्त सत्कार



**किनवट -** मिलिंद शिक्षण प्रसारक मंडळ, अंबाडी (ता.किनवट व्दारा संचलित महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गोकुंदा (किनवट) येथिल सेवानिवृत्त मुख्याध्यापक, उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सेवापुर्ती सोहळा महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनी (दि.१) रात्री आठ वाजता मातोश्री कमलताई ठमके शैक्षणिक संकुल, कोठारी (ता.किनवट) येथे उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून आमदार भीमराव केराम हे होते. प्रमुख पाहुणे आनंदराव वाढे, सेवानिवृत्ती शिक्षणाधिकारी,नांदेड, अनिल महामुने, अधिक्षक, शालेय पोषण आहार,किनवट, शुभांगीताई ठमके, प्राचार्या म.ज्यो.फुले क.म.वि.घोटी,म.ज्यो.फुले.मा.व.उमावि. गोकुंदा, किनवट संस्थेचे सचिव तथा मातोश्री कमलताई ठमके बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, गोकुंदा, किनवट चे अध्यक्ष अभि.प्रशांत ठमके,आनंद मच्छेवार,माजी नगराध्यक्ष,किनवट आदी विचारमंचावर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य आर. ए. जाधव, उपमुख्याध्यापक पी.जी.मुनेशवर, पर्यवेक्षक किशोर डांगे, पर्यवेक्षक सूर्यवंशी, बंडु भाटशंकर, एच. एल. सोनकांबळे, प्रशांत डवरे आदींनी परिश्रम घेतले.या सेवापुर्ती समारंभास मोठ्या संख्येने पत्रकार बांधव, शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी,सेवक, मित्र परिवार उपस्थित होते सदर कार्यक्रमा सूत्रसंचलन पर्यवेक्षक प्रा.एस.ए.बैसठाकुर यांनी केले तर आभार प्रज्ञा मॅडम यांनी मानले.

# लोह्यात कळसकर बंधुची ४० वर्षापासून जलसेवा

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ५ मे -**



उन्हाळ्याच्या काळात जीव पाणी पाणी होतो. शहरात येणाऱ्या प्रत्येकांसाठी थंड पिण्याचे पाणी देणारे ठिकाण म्हणजे बसस्टॅण्ड समोरील कळसकर बंधूंचे भोजनालय आहे. गेल्या ४० वर्षा पासून अविरतपणे गुढीपाडवा ते मृगाचा पाऊस पडे पर्यंत पाणीपोई व्यवस्था करण्यात येते.

आताच्या काळात शुद्ध फिल्टरचे थंड पाणी म्हणुन दररोज ४०-५० जार भोजनालय समोर ठेवले जातात. पाणी पिल्यानंतर बॉटल भरून नेणारे खूप जण असतात. तहानलेल्याना पाणी देण्याच्या बालाजी कळसकर यांची सामाजिक दायित्व दरवर्षी सुरू असते. सामाजिक घटकांची सेवा करताना अनेक जण त्याची प्रसिद्धी करत नाहीत.आपण स्वतः स्वीकारलेले कर्तव्य मानून ते कार्य पुढे सुरू ठेवतात.लोह्यातील विठ्ठल कळसकर, बालाजी कळसकर, मारोती राजू व व्यंकट कळसकर ही पाच भावंडे मोठ्या मेहनतीने हॉटेल व्यवसायात पुढे आलेले आहेत.आजही त्याच्या भोजनालय मध्ये खिचडी खाऊन बिल न देता दररोज चार-पाच जण तसेच जातात बस स्टँडच्या कॅन्टीन मध्ये राजू कळसकर यांना सुद्धा असाच अनुभव येतो. बसस्थानका समोरच कळसकर यांचे भोजनालय आहे. दरवर्षी गुढी पाडवा झाला की दुसऱ्या दिवसापासून बालाजी कळसकर बंधू येणाऱ्या जाणाऱ्या लोकांसाठी शुद्ध थंड पाण्याची व्यवस्था करतात. भोजनालय बंद होईपर्यंत थंड पाण्याची सोय करतात. दररोज किमान आठशे-हजार रुपये खर्चून लोकांसाठी तहानलेल्या साठी पिण्याच्या पाण्याची सोय करतात. शहरात लोकांसाठी- तहानलेल्यासाठी अविरतपणे पाण्याची सोय स्वखर्चाने करणारे कोणीच पुढे येत नाहीत .पण बालाजी कळसकर बंधुना गरिबीची कष्ठाची जाणीव आसल्याने गरिब लोक बाटली घेऊन पाणी पिऊ शकत नाही आशा लोकासाठी हामखास सोय करत आसतात. दरवर्षी पिण्याचे थंड पाण्याची सोय करतात. जनतेची तहान भागविणारे कळसकर बंधू गेल्या ४० वर्षा पासून उन्हाळ्यात पाणपोईची सोय करतात. दुसरीकडे गावात पाणी देण्यासाठी अधिग्रहण करून पैसे घेणारे अनेकजण असतात.अशा व्यवस्थेत कळसकर बंधूंची ४० वर्षा पासूनची मोफत पाणपोई व्यवस्था निश्चितच प्रेरणादायी आहे.

# पोलीस भरतीच्या सरावासाठी मैदान उपलब्ध करून देणार : खा. चिखलीकर



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ५ मे -**

पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या उमेदवारांना सरावासाठी मैदान नसल्यामुळे त्यांना मोफत मैदान उपलब्ध करून देण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेऊन प्रयत्न करू आणि त्यांना सरावासाठी मोदी मैदान उपलब्ध करून देऊ अशी ग्वाही खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आज दिली आहे .पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सरावासाठी मैदान मिळत नसल्याने आज हजार विद्यार्थ्यांनी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची भेट घेतली . या भेटीत चिखलीकर यांनी या विद्यार्थ्यांना मैदान उपलब्ध करून देण्याचा विश्वास दिला.

महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांमध्ये नांदेड जिल्हा अव्वल स्थानावर आहे. यात पोलीस भरतीची तयारी करणारे हजारो विद्यार्थी आहेत . गोरगरीब ,शेतकरी, सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना पोलीस भरतीचे वेध लागले असून असंख्य विद्यार्थी नांदेड मध्ये ही तयारी करत असतात . सर्वसामान्य आणि गोरगरीब कुटुंबातून असलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येक वेळी पैसे देऊन तयारी करणे शक्य नसल्याने त्यांना सरावासाठी मोफत मैदान मिळावे या हेतूने आज तोडेवाड अकॅडमीसह विविध अकॅडमीच्या हजारो विद्यार्थ्यांनी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे साई सुभाष निवस्थान गाठले . सरावासाठी पैसे देणे शक्य नाही त्यामुळे आम्हाला मोफत मैदान उपलब्ध करून द्यावे अशी विनंती विद्यार्थ्यांनी खा. चिखलीकर यांच्याकडे केली .

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना खा. प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, निश्चितपणे बेरोजगारीवर मात करून पोलीस भरतीसाठी आपण करत असलेला प्रयत्न गौरीवस्पद आहे. बेकारीवर मात करत पोलीस भरतीसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सरावासाठी मैदान उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने आपला सकारात्मक विचार आहे. यासाठी कुलगुरूंशी आपली चर्चा झालेली आहे . त्यामुळे असर्जन भागातील मोदी मैदान विद्यार्थ्यांना पोलीस भरतीच्या सरावासाठी उपलब्ध करून देण्यासाठी आपण सकारात्मक भूमिका घेऊ. विद्यार्थ्यांनी जोमाने तयारीला लागून आपले ध्येय गाठावे आणि देश सेवेत सहभागी व्हावे असे आवाहनही खा. चिखलीकर यांनी केले आहे . खा. चिखलीकर यांनी पोलीस भरती सरावासाठी मैदान उपलब्ध करून देण्याच्या दिलेल्या विश्वासानंतर विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# सिडकोत डॉ. आंबेडकर जयंती निमित्त भीम गीतांचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,५ मे -**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती सोहळ्यानिमित्त दि. ६ मे रोजी सायंकाळी ६ वाजता जेतवन बुद्ध विहार गुरुवार बाजार सिडको येथे महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक 'मला आमदार झाल्यासारखं वाटतंय' या गीताचे फेम संकल्प गोळे यांच्या भीम गीतांचा भव्य कार्यक्रम सामाजिक कार्यकर्ते राजूभाऊ लांडगे व त्यांच्या मित्र परिवाराने आयोजीत केला आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक भिकू संघ यांच्या हस्ते होणार आहे तर या जयंती सोहळ्याच्या अध्यक्ष आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते पी. एस. गवळी हे असून या जयंती सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून आ. मोहनराव हंबर्डे, माजी आ. अमर राजूरकर, प्रवीण चिखलीकर, मनोहर पा. शिंदे, दिलीप कंदकुर्ते, देविदास राठोड, बालाजी पाटील पुणेगावकर, वच्छलाताई पुयड, जीवन पा. घोगरे, संदीप पा. चिखलीकर, विनय गिरडे, इंदुताई घोगरे, ललिता शिंदे, राजू गोरे, राजू काळे, सौ. बेबीताई गुपीले, श्रीनिवास जाधव, करुणा जमदाडे, चित्राताई गायकवाड यांच्यासह सिडको-हडको परिसरातील सामाजिक, राजकीय, वैद्यकीय क्षेत्रातील दिग्गज मानेवर उपस्थित राहणार आहेत. सदरील जयंती सोहळा पार पाडण्यासाठी संयोजन समिती परिश्रम घेत असून या जयंती सोहळ्यास जास्तीत जास्त परिसरातील समाज बांधवांनी उपस्थित राहून भीम गीतांच्या कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आव्हान जयंती सोहळ्याचे आयोजक व सामाजिक कार्यकर्ते राजूभाऊ लांडगे व त्यांच्या मित्र परिवाराने केले आहे.

# ग्रामीण भागातील तरुणाई रील्स बनवण्यात व्यस्त

## सोशल मीडियाचा वाढला वापर शैक्षणिक, ध्येय-धोरणांकडे तरुणांनी फिरवली पाठ

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, ५ मे -**

आजच्या ह्या आधुनिक युगाच्या छायेखाली असेलली सद्याची हि तरुणाई देगलूर शहर तसेच ग्रामीण भागात शाळा व महाविद्यालयाला सुट्टया लागताच शाळकरी मुले तसेच तरुणाई विविध खेळामध्ये रंगून जायची. परंतु ते प्राचीन संस्कृती चे खेळ आता संपुष्टात आले असून ऑनलाईन खेळ व इंस्टाग्राम, तसेच फेसबुक रील्स बनवण्यात तरुणाई गुंतल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. या मध्ये फेसबुक तसेच इंस्टाग्राम च्या माध्यमातून सर्वाधिक रील्स बनवणाऱ्या मध्ये तरुणाईचे प्रमाण जास्त असून रिल्सच्या माध्यमातून अनेकांचे भवितव्य अंधारात आले तर अनेकांचे कौटुंबिक वाद विकोपाला गेले आहेत.

ग्रामीण भागात पूर्वी लहान थोर मंडळी दीपावली, उन्हाळी सुट्टी लागतात शाळा, कॉलेजचे तरुण हे विटी दांडू, गोट्या, कबड्डी असे विविध खेळाचे खेळ खेळत सुट्टीचे दिवस घालवायचे. त्यामुळे व्यायाम शरीर तंदुरुस्त राहत होते.

काळ झपाट्याने बदलत गेला असून खेळातही बदल होत गेले आहे. कालांतराने कसरतीच्या खेळापासून तरुणाई कोसोदूर जातं असल्याचे चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे.



**रिल्स मुळे अनेकांचे संसार उध्वस्त**

बहुतेक तरुण हे करमणूक म्हणून रिल्स बनवत आहेत. लाईक मिळावे फॉलोवर्स वाढावे यासाठी काही वाईट प्रवृत्ती अंग प्रदर्शन करत रिल्स बनवत आहेत. काही मोकाट तरुण मंडळी मात्र घाण प्रतिक्रिया नोंदवतात. त्या प्रक्रिया पाहून त्या कुटुंबात वाद होत असून अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. पण रिल्स बनवण्याचे त्या व्यक्तींच्या डोक्यातील खुळ मात्र निघत नसल्याचे पाहायला मिळत आहे.कसरतीच्या खेळातून निघालेल्या घामामुळे शरीरसृष्टी चांगली राहायची ते खेळ आज लुप्त झाले असून ग्रामीण भागातील तरुणांची पसंती ही मोबाईलवर खेळल्या जात असलेल्या लाईक फॉलोवर्स साठी तरुणांची वाढली धडपड.

सिनेमा, मालिका, नाटकात काम करणारे कलाकार हा स्टार म्हणून ओळखला जायचे, कालांतराने सोशल मीडियाचा शिरकाव झाला. त्याचा वापर प्रमाणाबाहेर वापर होत गेला अति वापरामुळे गाणे, जोक बनवण्याचे डोक्यात खूळ शिरले प्रत्येक जण पाहिजे त्यावेळी त्या ठिकाणी रिल्स बनू लागले. ज्याला जास्त लाईक फॉलोवर्स तो रील स्टार बनले. त्यातुन चार माणसं ओळखू लागल्यामुळे रील स्टार झाल्याचा तरुण तरुणीला मनोमनी आनंद होत आहे.मोबाईल वरील टिक टॉक हे माध्यम मोबाईल वरून बंद झाल्यामुळे टिक टॉक ची जागा आता इंस्टाग्राम, फेसबुकने घेतली आहे. सध्या शाळा, कॉलेजला सुट्ट्या लागल्या आहेत. तरुण मंडळी ऑनलाईन खेळ खेळत आहेत. त्या सर्वाधिक तरुण हे इंस्टाग्राम, फेसबुक व इतर ॲपच्या माध्यमातून हिंदी मराठी गाणे, जोक तयार करून आनंद घेत आहेत. लहान थोर मंडळी आता तासंतास मोबाईल रिलीज बनवण्यात व्यस्त आहेत. रिल्स बनवणारे इतके गुंग होतात की बाजूला काय चाललेय याकडे सुद्धा त्यांचे लक्ष जात नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे रिल्समुळे तसेच ऑनलाईन खेळामुळे भविष्यात आरोग्यावर दुष्परिणाम होणार हे नक्की आहे.

# लोह्यात भाजपची प्रचार फेरी

## प्राणितातांईचे शहरवासियांना अहवान

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ५ मे -**

लातूर लोकसभा मतदार संघातील भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे याच्या प्रचारार्थ जिल्ह्याचे खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोह्यात भजपा महिला आघाडीच्याप्रदेश उपाध्यक्षा प्राणिताताई देवरे चिखलीकर याच्या नेतृत्वाखाली जुने शहर ते बसस्थानक असे प्रचार फेरी काढण्यात आली.त्यांनी देशाचे खंबीर नेतृत्व मोदीजी याना पुन्हा पंतप्रधान करायचे आहे तेव्हा शहरातील जनतेला भाजपाला साथ द्यावी असे अहवान केले.

यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य माणिकराव मुकदम किरण वट्टमवार, केशवराव मुकदम, तालुकाध्यक्ष आनंदराव शिंदे, माजी उपनगराध्यक्ष रामराव सुर्यवंशी, छत्रपती धुतमल बालाजी खिल्लारे, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख बाळासाहेब कऱ्हाळे माजी उपनगराध्यक्ष दता वाले, राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, मिलिंद पवार, करीम शेख, नारायण येल्लरवाड,भास्कर पाटील पवार,हरिभाऊ चव्हाण, दिनेश तेललवार, अनिल धुतमल,दीपक कानवटे, सचिन मुकदम, बंडू वडजे, सूर्यकांत गायकवाड पार्डीकर , विलास चुडावकर, राम पाटील पवार, इमाम लदाफ, शोभाताई बगडे, रेखा ममिडवार, अनुराधा नागेश्वर, अंजली जंगले, नेहा मोटरवार, प्रियंका बगडे, यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते पदाधिकारी या प्रचार रॅलीत सहभागी झाले होते.

